शनिवार । २ जुलै १९७७
७५ पैसे

# माणूस

हैदराबाद, २१ जून १९७७

स. न. काल सकाळी ६ वा. येथे सुखरूप पोचलो.

कालचा दिवस बरा गेला. ज्यांच्यासाठी पत्रे नेली होती त्या दोघांचीही गाठ पडली व एक बैठक झाली. आज रात्रभर पुन्हा बसण्याचा बेत आहे. विशेष म्हणजे काल थोडयाफार धावपळीनंतर आंध्रचे मुख्यमंत्री जे. वेंगल राव यांची मुलाखत मिळाली. वीसएक मिनिटेच. पण गृहस्थ आपल्याला हवे तेच व तसेच बोलला. शब्दात सापडला आहे. आज. I. G. P. व Secretary for Social Welfare यांना भेटायला निघत आहोत.

तोंडी व मुद्रित साहित्यही खूप मिळत आहे, तेव्हा तुम्हाला लेखमाला जाहीर करायला हरकत नाही. मात्र दोन मुद्दे कृपया लक्षात घ्यावेत–एक : येथील नक्षलवादी गट सहकार्य देत असला तरी वरंगळ, खम्मम व श्रीकाकुलम वगैरे अंतर्भागात ते आम्हाला नेऊ शकणार नाहीत. कारण नक्षलवादी चळवळीने व्यापलेला सर्व भाग पोलिसांनी–राज्य सरकारने प्रवेशबंदी जाहीर करून ताब्यात घेतला आहे. तेव्हा I. G. P. कडून स्पेशल परवानगी काढून स्वतःच्या जबाबदारीवर जाण्याच्या प्रयत्नात आहोत. पण ते न जमले तर त्यांच्या field work चा वृत्तांत देणे कठीण होईल. अर्थात त्यांच्या खेडयातल्या field workers पैकी कुणी येथेच भेटतो का याची शोधाशोध सुरू आहे. मुद्दा दोन : अनिल बर्वेंच्या पुस्तकाचा ९०% भाग आंध्रातील तत्कालीन घडामोडींच्या वर्णनपर होता. आता चळवळीने दिशा बदलल्याचे दिसते. तशा चकमकी, धरपकड, गोळीबार इ. घटना फारशा चालू नाहीत व आम्हाला field work पाहण्याचा Chance कमी. आम्हाला नक्षलवाद्यांपेक्षा नक्षलवादावर Concentration करता येईल, करावे लागेल.

सध्या चर्चासत्रे सुरू आहेत. पाच–सहा मुलाखती झाल्या. अनिल बर्वेंच्या पुस्तकात न आलेली कॉंग्रेसची, सत्ताधाऱ्यांची ( सरकारची ), ब्यूरॉक्रसीची आणि सामान्य शहरवासीयांची बाजू मांडण्याचा व त्यातून लिखाणात समतोल साधण्याचा प्रयत्न चालू आहे......

**१९७० साली ' माणूस'ने अनिल बर्वे यांना तेलंगणात पाठविले व या दौऱ्यावर आधारित त्यांची ' रोखलेल्या बंदुका, उठलेली जनता ' ही लेखमाला प्रसिद्ध केली.**

**आता या चळवळीने तेलंगणात व इतरत्रही एक नवे वळण घेतल्याचे दिसते.**

**हे नवे वळण जाणून घ्यावे म्हणून ' माणूस' ने पुन्हा एकदा या भागात दोन तरुण मित्रांना नुकतेच पाठविले आहे.**

पुढील अंकापासून
ही नवी
लेखमाला
सुरू होत आहे . . .

## नक्षलवादाच्या शोधात

**शिरीष सहस्रबुद्धे**
**चंद्रशेखर पुरंदरे**

# साप्ताहिक माणूस

**वर्ष सतरावे–अंक पाचवा**

**२ जुलै १९७७**

**मूल्य पंचाहत्तर पैसे**



संपादक

**श्री. ग. माजगावकर**

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरदरे

◘

वार्षिक वर्गणी .

**चाळीस रुपये**

◘



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन अकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.



◘

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यानी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

◘

**साप्ताहिक माणूस**

१०२५ सदाशिव पेठ

नागनाथ पाराजवळ

**पुणे ४११ ०३०**

◘

**दूरध्वनी : ४३४५९**


## ‘श्रेष्ठ’ (!) समाजवादी

आपला १८ जूनचा अक उशीरा आला, पण तो वाचल्यावर उद्‌बोधन मात्र बहुत झाले.

पहिल्या पानावर सुरुवात झालेल्या लेखात ‘माहितगार’ म्हणतो की, कॉंग्रेसच्या विघटनाचा (महाराष्ट्रातील) प्रश्न जनसघाच्या कार्यकर्त्यांना अस्वस्थ करून सोडीत आहे रा स्व. सघाच्या शाखेवर रुजविलेले विचार त्याच्या मनात उफाळून येत आहेत समाजवाद्याची स्थिती वेगळी आहे जनसंघाचे स्थान काही भागात आहे तर समाजवाद्याचे कार्य काही शहरात व ग्रामीण भागात बऱ्याच ठिकाणी असल्यामुळे आपल्याला कोणी खाऊन टाकील ही भीती त्याना वाटत नाही मात्र ज्या कॉंग्रेसवाल्याच्या चारित्र्या-विषयी शका आहे त्याना मानाची जागा देता कामा नये, असा तात्त्विक आग्रह समाजवादी धरीत आहेत.

दिल्ली–पटना–बिहार भागात जाऊन आलेले प्रा प्रवीण सप्तर्षी याचे निरीक्षण वेगळे नाही. बिहारमधील जनतापक्षात डोके वर काढू पाहाणाऱ्या गटबाजीची उदाहरणे देताना ते म्हणतात–पूर्वाश्रमीचा जनसघ आपल्या शेजारच्या क्षेत्रातील पूर्वाश्रमीच्या समाजवादी उमेदवाराला मदत न करता बडखोराला करतो बाबूलाल सिग नावाच्या कार्यकर्त्याच्या मते प्रामुख्याने छात्रसघर्षसमिती व जनसघीय लोक अशी गटबाजी करीत आहेत. जनसघाने दुटप्पी रोल केलेला आहे आपल्या ६४ अधिकृत उमेदवाराबरोबर त्याने ६० बडखोर उमेदवार उभे केले आहेत या उमेदवाराना नावे मागे घेण्याचे आवाहन जनसघ करीत आहे, पण कार्यकर्ते म्हणतात–ये उनकी डयुएल पॉलिसी है!’ त्यागी कार्यकर्त्याचे उदाहरण देताना श्री सप्तर्षी लिहितात : नाथनगर-मधून नेहमी निवडून येणारे समाजवादी कार्यकर्ते बनारसीबाबू गुप्ता मात्र तिकिट नाकारून पक्षशिस्तीनुसार सबध जिल्ह्यात दौरा करताना दिसतात.

दोन्ही वृत्तातावरून असे दिसते की त्याग, नीतिमत्ता, शिस्त, प्रामाणिकपणा या सर्व बाबतीत जनसघीयापेक्षा समाजवादी खूपच श्रेष्ठ आहेत अर्थात् बऱ्याच पाहाणीनतर हे लेख लिहिलेले असल्यामुळे लेखकाचे निष्कर्ष खरे असणारच!

प्रश्न असा पडतो की, आणीबाणीतील सत्याग्रहात हे डयुएल पॉलिसीवाले लोक एवढ्या मोठ्या सख्येने का उतरले? आणि त्याच्या तुलनेने समाज–वाद्याची (पूर्वाश्रमीच्या) सख्या अगदीच क्षुल्लक का होती? का, ‘तुम्ही आपली शक्ती सत्याग्रहात खर्च करू नका, आणीबाणीनतर सघ–जनसघाला एक्सपोझ करण्यासाठी ती राखून ठेवा,’ असा आदेश या चारित्र्यवताना जे पी नी दिला होता?

**–एक प्रतिगामी वाचक, मुंबई**

## क्षमस्व

गेल्या अकात एक ढोबळ चूक झालेली आहे मुखपृष्ठावर ‘बाबा आढाव याना अनावृत पत्र’ व ‘भारतीय कुष्ठनिवारक सघ’ असे दोन मथळे दिले गेले, परतु आत हे दोन्ही विषय मात्र काही कारणास्तव देता आले नाहीत. तशी सूचनाही ऐनवेळी अकात कुठे दिली गेली नाही.

तसेच पृष्ठ २२ वर श्री. के क्षी. यानी परीक्षण केलेल्या ‘कॉटिनेन्टल प्रकाशन’च्या पुस्तकाचे नाव चुकून ‘इनामदाराचा औरंगझेब’ असे पडले आहे. ते ‘शहेनशहा’–लेखक ‘ना. स. इनामदार’ असे हवे.

वरील दोन्ही विषय या अकात घेतले आहेत.

गेल्या अकातील वरील दोन चुकाबद्दल क्षमस्व!

**–संपादक.**

# शंकरराव—यशवंतराव यांची ओबेरॉय-शेरेटनमधील भेट

**माहितगार**

लोकसभेच्या निवडणुकीनंतर महाराष्ट्र काँग्रेसमध्ये धुमसू लागलेली आग पूर्ण पेटून विझण्याच्या मार्गावर आली आहे. काँग्रेसचा लोकसभानिवडणुकीत महाराष्ट्रामध्ये पराभव झाला. त्याचे निमित्त करून त्या वेळचे मुख्य मंत्री शंकरराव चव्हाण यांना पदच्युत करण्याचे कारस्थान यशस्वी झाले. शंकररावांना काढण्यासाठी जो प्रयत्न करण्यात आला त्यामध्ये विधानसभा बरखास्त करण्याचा सल्ला शंकरराव राज्यपालांना देणार आहेत असाही एक प्रचार होता. हा प्रचार आजचे मुख्यमंत्री वसंतराव पाटील व माजी मुख्य मंत्री वसंतराव नाईक यांनीच प्रामुख्याने केला होता. विधानसभा बरखास्त केल्यावर तुमचे अस्तित्व कोठे राहणार आहे असे सांगून अधिकाधिक आमदारांचा पाठिंबा मिळविण्याचा मार्गही चोखाळला गेला होता. वसंतदादा पाटील मुख्य मंत्री झाल्यावर शंकरराव चव्हाण-गटाला पक्षात काहीच स्थान राहिले नाही. ज्या संस्थेत स्थान नाही त्या संस्थेत राहण्याऐवजी ती संस्था सोडण्याशिवाय या गटाला पर्याय नव्हता. शंकरराव चव्हाण व त्यांच्या सहकाऱ्यांना जी वागणूक दिली गेली तिचाही परिणाम होणे स्वाभाविक होते. हे लोक काँग्रेस सोडणार हे निश्चित झाले, पण प्रत्यक्ष तसा निर्णय ते जाहीर करीत नव्हते उत्तर भारतात विधानसभा निवडणुका घेण्यात आल्या. तेथील निकालाची वाट पाहावी व पुढचे राजकारण करावे हा विचार शंकरराव चव्हाण गटाने केला. ज्या वेळी या गटाने पक्ष सोडण्याचा प्रथम विचार केला तेव्हा जगजीवनराम यांचा लोकशाही काँग्रेसपक्ष अस्तित्वात होता; पण या पक्षाने १ मे १९७७ रोजी अचानक जनतापक्षात विलीन होण्याचे ठरविले. बाहेर पडणारे बंडखोर काँग्रेसजन लोकशाही काँग्रेसपक्षात जाणार होते याच पक्षाने जनतापक्षात विलिनीकरण करण्याचे ठरविल्याने महाराष्ट्रातील काँग्रेसजनांची पंचाईत झाली काँग्रेसमधून बाहेर पडून जायचे कोठे, हा प्रश्न त्यांच्यापुढे होता. जनतापक्षात जनसंघीय वर्चस्व त्यांना जाणवले मुंबईत बी. सी. कांबळे यांच्या उमेदवारीला जनसंघ-गटाने हरकत घेऊन त्या जागी वसंतकुमार पंडित यांच्या नावाचा आग्रह धरला होता. मग जनसंघाचे प्राबल्य राहणाऱ्या जनतापक्षात जावयाचे की नाही हा प्रश्न बंडखोरांना भेडसावीत होता नेमके कोणते पाऊल उचलावे हा प्रश्न पडल्याने त्यांचा पक्ष सोडण्याचा निर्णय होत नव्हता. याच सुमारास महाराष्ट्र काँग्रेसने शिबिर आयोजित केले. जनतापक्ष म्हणजे जनसंघच आहे हा विचार महाराष्ट्रात तरी यशवंतराव चव्हाण सातत्याने मांडीत आले. शिबिरातही त्यांनी तोच विचार मांडला. त्यांच्या भाषणाचा नाही म्हटले तरी काँग्रेसजनांवर चांगलाच परिणाम झाला. जनतापक्षात जाण्याच्या काँग्रेस कार्यकर्त्यांच्या विचाराला यामुळे थोडा पायबंद बसला हे मानावेच लागेल. यशवंतराव यांनी काँग्रेसजनांना रोखण्याचा दोन गोष्टींसाठी प्रयत्न केला. महाराष्ट्रात काँग्रेस सावरून धरण्यात यश मिळाले तर त्याचा लाभ अखिल भारतीय पातळीवर आपल्या राजकारणाकरिता करून घ्यावयाचा. दुसरे कारण असे की, शुगर सिंडिकेटचे नेते वसंतराव पाटील व कॉटन लॉबी—बागायतदार बडे जमीनदार यांचे हितकर्ते वसंतराव नाईक यांच्या युतीला पक्षात प्रभावी होऊ द्यावयाचे नसेल तर त्यांच्या विरोधातील गट बाहेर पडता कामा नयेत. दोन वसंतरावांची युती पक्षावर कबजा मिळवील व आपल्या नेतृत्वाला आव्हान ठरेल. हे टाळण्यासाठीही यशवंतराव पक्ष सोडण्यापासून बंडखोरांना परावृत्त करीत होते वसंतराव पाटील जाहीरपणे काहीही म्हणत असले तरी जे लोक पक्ष सोडण्याच्या विचारात आहेत त्यांना खुशाल जाऊ द्यावे या मताचेच वसंतराव पाटील आहेत. वि. स. पागे यांनी शिबिरासाठी लिहिलेल्या मूळ प्रबंधात हाच विचार मांडला होता व त्याला वसंतरावदादांची पाठिंबाही होता. यशवंतराव चव्हाण यांनी प्रबंधातील हा भाग काढविलाच, पण छापलेला तो प्रबंध कोणाच्याही हातात जाऊ नये म्हणून जाळून टाकण्यासही सांगितले होते. शंकररावांना मुख्य मंत्रिपदावरून काढून टाकण्याच्या घटनेपासून पक्षात असंतोषाची आग धुमसत होती. धुमसत असलेल्या या आगीने पेट घेतला असून शंकरराव चव्हाण, पी के सावंत, बी जे खताळ, वि. गो. प्रभुणावकर, प्रभाकर कुंटे, अलीहसन ममदानी हे मंत्री, राज्यमंत्री व उपमंत्री यांच्यासह वीस जणांनी पक्ष सोडण्याचे ठरविले आहे ३ जुलै रोजी बंडखोरांची व्यापक बैठक भरणार आहे. त्या दिवशी आणखी काही आमदारांना बरोबर घेऊन हे सर्वजण पक्षातून बाहेर पडतील आणि पेटलेली आग विझण्याची प्रक्रिया सुरू होईल. आग विझेल; पण निखाऱ्याची धगधग काँग्रेसला बराच काळ जाणवल्याशिवाय राहणार नाही.

□

बाहेर पडणाऱ्या काँग्रेसजनांनी प्रथम वेगळा पक्ष स्थापन करण्याचा विचार केला होता, पण आता तो विचार बाजूला पडला आहे. विधानसभा-निवडणुका येईपर्यंत बंडखोर आमदार विधानसभेत स्वतंत्र गट म्हणून बसतील. १९ जूनच्या बैठकीत वीस आमदारांनी बाहेर पडण्याचे ठरविले आहे. ३ जुलैच्या बैठकीत आणखी २५--३० आमदार पक्ष सोडण्याचा निर्णय घेतील. म्हणजे ४५—५० बंडखोरांचा नवा गट विधानसभेत तयार होईल. विधानसभेत आज विरोधी पक्षाची जी संख्या आहे त्याच्या दुप्पट मोठी संख्या बंडखोर आम-

दारांच्या गटाची होईल. ७०–८० आमदार पक्ष सोडून गेले तर विधानसभेत कांग्रेसपक्षाचे बहुमत संपेल असे नाही; पण त्यामुळे कांग्रेसला जबरदस्त तडाखे बसू लागतील. आधीच खिळखिळया झालेल्या कांग्रेसला हे तडाखे सहन करता येणार नाहीत. विधानपरिषदेतील चित्र मात्र एकदम पालटून जाईल अशी अवस्था आहे. परिषदेत एकूण सदस्य ७०–७१ आहेत. त्यात विरोधी पक्षाची संख्या २४ आहे कांग्रेसची संख्या ४६ होते. त्यातील पंधराएक आमदार जरी बाहेर पडले तरी परिषदेत कांग्रेसचे बहुमत संपुष्टात येते परिषदेतील बहुमत गेले म्हणून सरकार कोसळत नाही; परंतु कांग्रेस आमदाराचे नीतिधैर्य खचण्याच्या दृष्टीने परिषदेतील बहुमत जावे ही महत्त्वाची घटना ठरेल.

## बहुजनसमाज आणि सत्ता

उत्तर भारतात झालेल्या विधानसभा–निवडणुकीत जनतापक्ष विजयी झाल्यामुळे महाराष्ट्रातील बंडखोराच्या हालचालीना गती मिळाली बंडखोरानी आपल्या पक्षात यावे हा प्रयत्न जनतापक्षाच्या काही नेत्यांमुळे झालाच नाही बहुजनसमाज जनतापक्षात आल्याशिवाय त्या पक्षाची पाळेमुळे ग्रामीण भागात रुजणार नाहीत हे सत्य आहे. आपल्याला स्थान मिळते आहे असे वाटल्याशिवाय बहुजनसमाज जनतापक्षात येणार नाही. समाजवादी मंडळी बहुजनसमाजाशी समरस झाली होती; पण त्या पक्षाचे नेतृत्व विशिष्ट वर्गातील लोकांकडे राहिले होते. त्यामुळे जनता समाजवादी पक्षाकडे आकर्षली गेली नव्हती या पक्षातील माणसे स्वच्छ, ध्येयनिष्ठ होती तरीही पक्षाचे रोपटे वाढले नाही. महाराष्ट्र कांग्रेसचे नेतृत्वही जोपर्यंत ब्राह्मण–पुढाऱ्याकडे होते तोपर्यंत (म. गांधीमुळे कांग्रेस ग्रामीण भागापर्यंत पोचली होती तरीही) जनतेला कांग्रेस हा आपला पक्ष आहे असे वाटले नव्हते. (स्वातंत्र्यानंतरची काही वर्षे हीच भावना जनतेत होती.) १९४८ साली शेतकरी कामगार पक्ष निघाला तेव्हा कांग्रेसला शह देण्याइतके सामर्थ्य या पक्षाने मिळविले होते. याचे कारण बहुजनसमाज या पक्षाच्या मागे होता हे आहे. कांग्रेसच्या नेतृत्वात बदल झाल्यानतर कांग्रेसने आपली ताकद पुन मिळविली होती. बहुजनसमाज बरोबर असल्याशिवाय नवीन पक्ष सत्ता काबीज करू शकणार नाही किंवा त्या पक्षाला पर्यायी पक्षाचे स्थान मिळणार नाही. एस. एम. जोशी आदी समाजवाद्याना याची जाणीव आहे. म्हणूनच त्यानी शेतकरी कामगार पक्षाला बरोबर घेण्याचा प्रयत्न केला. १९७१ च्या लोकसभा–निवडणुकीत ज्याप्रमाणे शे. का. पक्षाने स्वत.च्या ताकदीवर निवडणूक लढविली त्याप्रमाणे १९७७ च्या लोकसभा–निवडणुका लढवाव्यात असा निर्णय शे. का. पक्षाचे चिटणीस-मंडळ घेत होते; पण एस. एम. जोशी यानी त्यांच्या निर्णयात बदल घडवून आणला. या सबंधात उद्धवराव पाटील म्हणाले, 'एसेम हा व्यवहारी माणूस आहे. १९७७ च्या लोकसभा–निवडणुका स्वत.च्या ताकदीवर लढविण्याचा निर्णय आम्ही घेत होतो. तेवढ्यात एसेमनी फोन केला आणि मी येईपर्यंत निर्णय घेऊ नका असे सांगितले. या निवडणुकीत लोकशाही की हुकूमशाही हाच प्रश्न आहे. याच प्रश्नावर निवडणुका लढविल्या पाहिजेत. त्यासाठी जनतापक्ष व शे. का. पक्षाने एकत्र निवडणुका लढविल्या पाहिजेत. एसेमनी हे सांगितले आणि आम्ही लगेच त्याप्रमाणे निर्णय घेतला!' ◻

शे. का. पक्षाला बरोबर घेऊन निवडणुका लढविल्या त्याचा फायदा जनतापक्षाला झाला हे जनतापक्षाने विसरून चालणार नाही. कांग्रेसमधून बाहेर पडणाराना पक्षात घेतले तर आपल्या स्थानाचे काय हा विचार पक्षवाढीसाठी उपयोगी होणारा नाही. बंडखोर कांग्रेसजन शे. का पक्षात गेले तर त्या पक्षाची ताकद वाढेल आणि जनतापक्षाला जनसंघाचे रूप तर येईलच, पण लाट जनतापक्षाची व त्यावर शे. का. पक्ष आरूढ झालेला अशी परिस्थिती होईल. शे. का. पक्षाच्या नेत्यानी बंडखोराबरोबर बोलणी केली आहेत तशी जनतापक्षानेही केली पाहिजेत जनतापक्षाचे उत्तमराव पाटील यानी बंडखोरांशी बोलणी केली, पण ती मर्यादित स्वरूपाची आहेत. प्रथम पक्षातून बाहेर पडा, असा सल्ला उत्तमरावानी बंडखोराना दिला आहे. राजकारणात आमदारकी– खासदारकी यांचा हिशेब केला जातो. बाहेर पडणाऱ्या बंडखोराना त्यासंबंधी आश्वासन दिले पाहिजे. ते न देताच बंडखोराना बाहेर पडण्याचा सल्ला दिला तर त्यामागे प्रामाणिक हेतू आहे का असा प्रश्न निर्माण होतो बंडखोरांनी कांग्रेस सोडली की मग त्याना काहीही स्थाने वा पदे दिली नाहीत तरी ते जाणार कुठे ? परत कांग्रेसमध्ये ते जाऊ शकत नाहीत व जनतापक्षात त्याना स्थान गौणच राहणार. मग आपलेच प्राबल्य पक्षात कायम राहील हा हिशोब करून बंडखोराशी चर्चा केली तर ती सन्माननीय तडजोड म्हणता येणार नाही व पुढचे राजकारणही उत्तरभारताप्रमाणे यशस्वी होणार नाही. १९ जून १९७७ रोजी रात्री बंडखोरानी पक्षातून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला. त्या दिवशी उत्तमराव पाटील यानी बराच वेळ बंडखोरांशी चर्चा केली. बंडखोर पक्षातून बाहेर पडण्यासाठी भ्रष्ट मंत्र्याना काढून टाकावे, गरिबाचा कार्यक्रम राबवावा अशासारख्या मागण्याचे निमित्त करणार होते. त्यासाठी एक निवेदन मुख्य मंत्री व प्रदेश कांग्रेस अध्यक्ष याना देणार होते उत्तमराव पाटील यानी चर्चा केली त्यावेळी अशा निवेदनाचे काय परिणाम होतील हे त्यानी दाखवून दिले. बंडखोरानी उत्तमरावाचा युक्तिवाद मान्यही केला. 'तुम्ही तुमच्या निवेदनात भ्रष्ट मंत्र्यांना काढून टाका अशी मागणी केलीत व त्याप्रमाणे काही मंत्र्याना काढण्याची तयारी मुख्य मंत्र्यानी दाखविली तर, मग तुम्हाला तडजोडीची भूमिका घ्यावी लागेल त्यापेक्षा तुम्ही मागण्याचे निवेदन देऊ नका ' असा सल्ला उत्तमराव पाटलानी दिला व बंडखोरानी तो मान्यही केला. बंडखोर निवेदन देणार असे जाहीर झाले होते; पण त्यानी निवेदन देण्याचा विचार बदलला त्याचे कारण हे आहे.

## प्रादेशिक प्रश्नांचे वाढते प्राबल्य

शेतकरी कामगार पक्षाने बंडखोराशी वाटाघाटी करून बंडखोरापैकी बहुतेकाना विधानसभा-निवडणुकीची तिकिटे देण्याचे आश्वासन दिले आहे. त्यामुळे बंडखोरांपैकी बहुतेकजण शे. का. पक्षात जातील. फारच थोडे लोक जनतापक्षात सामील होतील. यामुळे जनता पक्षाची ताकद वाढेल की शे. का. पक्षाची ? याचा विचार जनतापक्षाने केला पाहिजे आणीबाणीमध्ये माजी मुख्य मंत्री

शंकरराव चव्हाण यांच्याकडून काही चुका झाल्या आहेत, पण शंकरराव चव्हाण विधानसभेची निवडणूक लढवणार नाहीत. आज तरी त्यांचा असा विचार आहे. त्यामुळे जनतापक्षाला बंडखोरांची अडचण वाटायचे कारण नाही. अडचण व फायदा याचा विचार करता जनतापक्षाला बंडखोरांकडून फायदाच अधिक होईल.

आकाशातून निखळलेली उल्का जाणार कोठे ? ती खालीच पडणार आहे. बंडखोराबाबत जनतापक्षातील काहींची अशीच भूमिका आहे बंडखोरांशी वाटाघाटी करायची जरुरी नाही. प्रथम ते काँग्रेसमधून बाहेर पडू देत ! बाहेर पडले की ते जाणार कोठे ? आमच्यामध्येच त्यांना यावे लागेल असा विचार जनतावाले करीत आहेत. बंडखोर बाहेर पडले की शे. का. पक्षात जातील याचा विचार जनतावाले गंभीरतेने करीत नाहीत आणि शे. का. पक्षवाले बंडखोरांची पाठ सोडीत नाहीत.

शे. का पक्ष जनतापक्षात आला तर जनतापक्षाची ताकद नक्कीच वाढणार आहे. त्याचप्रमाणे बंडखोर काँग्रेस– जनानाही जनतापक्षात येण्याशिवाय मार्ग राहणार नाही शिवाय जनतापक्षात... पुरोगामी विचाराची शक्तीही वाढेल हे लक्षात घेऊन एस एम. जोशी यांनी शे. का. पक्षाने जनतापक्षात विलीन व्हावे असा प्रयत्न केला. त्यासाठी महाराष्ट्र जनतापक्षाचे अध्यक्षपद एन. डी. पाटील यांना देण्याची तयारीही एस. एम. जोशी यांनी दाखविली होती. शे का. पक्षाचे नेते दाजिबा देसाई, केशवराव धोंडगे आदींना हा विचार पटलेला आहे; पण उद्धवराव पाटील व एन. डी पाटील यांचा विलिनीकरणाला विरोध आहे. पंजाबमध्ये अकाली दलाला बहुमत मिळाले असल्यामुळे शे. का पक्षाच्या नेत्यांना महाराष्ट्रातही आपल्या पक्षाला अकाली दलाचे स्थान मिळेल असे वाटत आहे. काँग्रेस विरोधाची लाट, बंडखोरांची ताकद व जनतापक्षातील काहींची बहुजन समाजाकडे पाहण्याची दृष्टी यामुळे शे. का पक्षाला अकाली स्थान मिळविणे सोपे झाले आहे असे वाटत आहे. द्विपक्षीय लोकशाहीमध्ये प्रादेशिक पक्षांना स्थान राहणार नाही. अखिल भारतीय पातळीवरचेच पक्ष राहतील अशी अपेक्षा होती; पण तामीळनाडूमध्ये अण्णा द्र. मु. क. व पंजाबमध्ये अकाली दल यांचा विजय झाला आहे. त्यामुळे इतर राज्यात काही ठिकाणी असलेल्या प्रादेशिक पक्षांच्या आशा पल्लवित झाल्या नसत्या तरच नवल ! महाराष्ट्रात पुरोगामी राजकारण करावयाचे असेल तर जनतेची सहानुभूती व पाठिंबा मिळविण्यास ज्या जनतापक्षाला अनुकूलता निर्माण झाली आहे त्या पक्षात पुरोगामी लोकांनी शिरले पाहिजे. पुरोगामी जनतापक्षापासून अलिप्त राहिले तर प्रतिगाम्यांचे फावणार आहे !

बंडखोरांपैकी बहुसंख्य आमदार शे. का. पक्षात जाण्याचा संभव आहे. त्यामुळे शे. का. चे नेते त्यांच्याशी चर्चा करीत होते त्याच वेळी उजवे कम्युनिस्ट बंडखोरांपैकी काहींची भेट घेऊन 'तुम्ही काँग्रेसपक्ष सोडू नका' असे आवाहन करीत होते. कॉ. चौधरी व कॉ. कारखानीस ( मुंबई ) आदींनी काँग्रेसमधील पूर्वीच्या सोशालिस्ट फोरममधील लोकांची व आमदारांची १९ जून रोजी भेट घेतली आणि त्यांनी महाराष्ट्रात पुरोगामी आघाडी निर्माण करण्यात येत आहे अशा वेळी तुम्ही काँग्रेसपक्ष सोडण्याऐवजी काँग्रेसमध्ये राहून या आघाडीचे वजन वाढविले पाहिजे असा प्रचार सुरू केला होता. पक्ष सोडण्याचा विचार चालू होता, पण प्रत्यक्ष निर्णय घेतला जात नव्हता, अशा काळात महाराष्ट्र काँग्रेसच्या नेत्यांनी बंडखोरांशी वाटाघाटी केल्या नाहीत; पण बंडखोरांचा निर्णय झाल्यावर यशवंतराव चव्हाण यांनी बंडखोरांशी चर्चा करावी असे मुख्य मंत्री पाटील व अध्यक्ष तिडके यांना सांगितले. २१ जून रोजी वसंतराव पाटील व तिडके यांनी शंकरराव चव्हाण, पी के सावंत, वि. गो. प्रभुणावकर आदींशी चर्चा केली. 'शंकररावांशी बोलणी केली तेव्हा त्यांच्या पक्ष सोडण्याच्या निर्णयाबाबत मी स्वत. विषय काढला नाही.' असे मुख्य मंत्री वसंतराव पाटील यांनीच सांगितले. पक्ष सोडणाऱ्यांना जाऊ द्यावे असे म्हणणाऱ्या वि. स. पागे यांच्या विचाराशी दादाही सहमत होते त्यामुळे शंकररावांशी ते पक्षत्यागाविषयी बोलतील हीही शक्यता नव्हती. यशवंतरावांनी सांगितले आणि आपण त्यांचे ऐकले नाही असे होऊ नये यासाठी तिडके यांच्यासह दादा शंकरराव चव्हाण यांच्याकडे गेले, एवढाच त्याचा अर्थ आहे तिडके यांना स्वत.ची काही मते बहुधा नसतात असे दिसते. नाईकांच्या काळी ते नाइकांना मानीत; पुढे शंकररावांशी ते निष्ठा ठेवून राहिले. शंकररावांची उचलबांगडी होताच तिडके दादांचे पाईक झाले ! सत्ताधिशाबरोबर राहणे हेच यामागील धोरण असावे ! तिडके आणि खादी भांडार अथवा हँडलूमहाउसमध्ये स्प्रिंगची मान असलेली लाकडी बाहुली यांच्यात फार साम्य दिसून येईल. त्या बाहुलीचे डोके जरा हलवले की ते कधी या बाजूला तर कधी त्या बाजूला असे बराच वेळ हलत असते तिडके


## नवीन दाखल झालेली पुस्तके

| | |
|---|---|
| 1. Judgement ( Inside story of emergency ) Kuldip Nayar | Rs. 30/- |
| 2. The Peter Plan– Dr Laurence J. Peter | Rs. 18/35 |
| 3. Cockpit– (Bestseller)– Spy Story Jerzy Kosinski | Rs. 21/15 |
| 4. Aspen– ( Bestseller– Novel )– Burt Hirschfeld | Rs 18/35 |
| 5. A Fistful Dynamite– James Lewis | Rs 5/60 |
| १. बंगलोर ते रायबरेली– वि. स. वाळिंबे | रु. २०/- |
| २. मुंबईतील संघटित गुन्हेगारी– ( गुन्हेगार कथा )– जयंत रानडे, राजीव नायर | रु. १८/- |
| ३ जीवनभाष्ये– (भाग दुसरा )– जे कृष्णमूर्ती– अनुवाद सौ. विमलाबाई देशपांडे | रु. १२/५० |
| ४. हमीद– ( परिचय )– अनिल अवचट | रु. ५/- |

**दि फिनिक्स लायब्ररी**

७२७ सदाशिव पोस्टासमोर, पुणे ३०

यांच्याशी तुम्ही कोणताही विषय काढा. ते या बाहुलीच्या हालचालीप्रमाणेच आपली मान हलवतात असे दिसून येईल ! ही व्यक्ती मुख्य मंत्री कोण असेल त्याच्याबरोबर दिसल्याशिवाय राहणार नाही ! माणूस स्वभावाने चांगला, पण त्याच्याजवळ सत्त्व काही आहे की नाही असा प्रश्न पडतो. काही दिवसांपूर्वी शंकररावांबरोबर असलेले तिडके दादांबरोबर राहून शंकररावांना पक्ष सोडू नका असे सांगू लागले तर त्याचा काय प्रभाव पडणार आहे ?

□

शंकरराव चव्हाण मुख्य मंत्री असताना पक्षातील अनेक जणांच्या भ्रष्टाचाराची प्रकरणे त्यांना जवळून हाताळावी लागली आहेत. त्यांचे धागेदोरे चव्हाणांकडे आहेत. या धाग्यादोऱ्यांचा वापर बंडखोर करणार आहेत. पक्ष सोडताना पत्रकारांना जे निवेदन दिले जाईल त्या वेळी किंवा विधानसभेत या धाग्यादोऱ्यांच्या आधारावरच कॉंग्रेस पक्षातील भ्रष्टाचारावर बॉंबशेल टाकला जाईल. यशवंतराव चव्हाण यांना ही माहिती मिळाली होती. म्हणजे बंडखोरांच्या गोटात वावरणाऱ्यांकडून न कळत ही माहिती यशवंतरावांना लागली. काही प्रकरणे पुढे आली तर पक्षाची उरलीसुरली इभ्रतही कमी होणार आहे. निवडणुकीत त्याच्या जोरावर कॉंग्रेसविरोधी वातावरण निर्माण केलं जाईल म्हणूनच पक्ष सोडताना कटुता निर्माण करू नका असे यशवंतराव सांगत आहेत. त्यांचा आता तोच प्रयत्न आहे. शंकररावांचे त्यासाठीच मत वळविण्याचा यशवंतरावांनी प्रयत्न केला. ओबेराय-शेरेटन या पंचतारांकित हॉटेलात शंकरराव व यशवंतराव चव्हाण यांची २२ जून १९७७ रोजी सकाळी भेट झाली. शंकररावांच्या भेटीसाठी यशवंतराव शंकररावांच्या आणि शंकरराव यशवंतराव चव्हाण यांच्या घरी जाण्यास तयार नव्हते. शेवटी उद्योगपती बी. एम. गोगटे यांना मध्ये घालून ओबेराय शेरेटनमध्ये चहापानाचा कार्यक्रम आयोजित केला गेला.

**या भेटीत शंकररावांनी यशवंतरावांना अत्यंत कडवटपणे काही गोष्टी सुनावल्या. 'लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रामध्ये कॉंग्रेसचा पराभव झाला त्याच दिवशी मी तुम्हाला फोन करून पराभवाची जबाबदारी घेऊन मुख्य मंत्रीपदाचा मी राजीनामा देतो असे सांगितले होते त्या वेळी तुम्हीच (यशवंतरावांनी) मला 'पराभवाची जबाबदारी एकट्याची नाही म्हणून मुख्य मंत्रीपदाचा राजीनामा देऊ नका' असा सल्ला दिलात. नंतर मात्र वसंतरावदादा व मोहिते यांना माझा राजीनामा मागण्यास सांगितलेत.' असे शंकररावांनी यशवंतराव चव्हाण यांना म्हटल्याचे कळले आहे.**

'लोकसभा निवडणुकीच्यानंतर तुम्ही (यशवंतरावांनी) दुटप्पी धोरण स्वीकारले, हे मी विसरू शकत नाही' असेही शंकररावांनी यशवंतरावांना ऐकविले. त्यामुळे पक्षातून बाहेर पडण्याचा शंकररावांचा निर्णय बदलेल असे मानण्याचे कारण नाही. बंडखोरांचा गट पक्षातून बाहेर पडल्यावर यशवंतरावांच्या पक्षातील स्थानाला धक्का बसल्याशिवाय राहणार नाही. त्यांची पक्षातील ताकद खच्ची होणार आहे. वसंतराव नाइकांनी अकरा वर्षे कारभार करून बडे जमीनदार-बागायतदार यांना आपल्या बाजूने उभे केले आहे तर शुगर सिंडिकेट दादांच्या मागे आहे. यशवंतरावांच्या मागे या शक्ती नाहीत. त्यामुळे महाराष्ट्राच्या राजकारणात कॉंग्रेसमध्ये दादा-नाईक यांचे प्राबल्य राहील. यशवंतरावांचा महाराष्ट्रात आता पडता काळ सुरू झाला आहे. आजपर्यंत यशवंतरावांचे ऐकले जात होते, आता त्यांनाच ऐकविले जात आहे !

□





**लेखक : पु. ल. इनामदार । राजहंस प्रकाशन, पुणे । मूल्य : वीस रुपये**

# अवती-भवती

शरद कृष्णन्

## □ पुन्हा एकदा इंदिरापर्व

गरमागरम राजकीय पुस्तकांनी पुस्तकांची बाजारपेठ गजबजून गेली असली तरी कुलदीप नायर याचे 'द जजमेंट' हे पुस्तक विशेष गाजत आहे. चक्रमचक्रीमध्ये त्या पुस्तकावर गेल्याच अकामध्ये टीकाटिप्पणी केली आहे. लक्ष वेधून घेणारे आणखी एक पुस्तक म्हणजे मकेकर पतिपत्नींचे 'डिक्लाइन अँन्ड फॉल ऑफ इंदिरा गांधी.' आणीबाणीपूर्वकाळापासून ते निवडणुकीमधील पराभवापर्यंतचा सारा खळबळजनक भाग या पुस्तकामध्ये राजकीय टीकाटिप्पणीसह सादर केला आहे आणीबाणी घोषित झाली आणि लगोलग जे धरपकडीचे सत्र सुरू झाले त्याचा तपशील मोठा मनोवेधक आहे.

रामलीला-मैदानावरील ऐतिहासिक सभेमध्ये 'भाषण करून अत्यंत समाधानी मनोवृत्तीने जयप्रकाशजी २५ जून १९७५ रोजी दीनदयाळ उपाध्याय-मार्गावरील गांधी पीस-फौंडेशनच्या इमारतीमध्ये परत आले. चित्तवृत्ती प्रसन्न असल्या तरी प्रदीर्घ प्रवास, सत्रस्त करणारी राजकीय चर्चासत्रे, प्रचंड सभामुळे होणारी दगदग आणि बारा ते चौदा तास काम करण्याची वृत्ती यामुळे जेपी सत्रस्त झाले होते. तथापि त्या दिवशी रामलीला-मैदानावर झालेल्या सभेला जो प्रचड प्रतिसाद मिळाला त्यामुळे ते विशेष प्रसन्न होते. जनतेची नाडी ओळखणाऱ्या त्या नेत्याने जनमानसातील वाढत जाणारी अस्वस्थता अचूक हेरली होती. चंद्रशेखरमार्फत त्यानी बाबुजीबरोबर सतत सपर्क ठेवला होता त्या दिवशीही त्यानी चंद्रशेखर यांना पुन्हा बाबुजीकडे पाठविले निरोप होता, 'अजूनही उशीर झालेला नाही. लोकाचा प्रतिसाद आम्ही प्रत्यक्ष अनुभवला आहे.' परंतु साहसी निर्णय घेण्यास बाबुजी अजूनही प्रवृत्त होत नव्हते. जेपीना दुसऱ्या दिवशी पाटण्याला जायचे होते म्हणून त्याचे स्नेही आणि सहकारी राधाकृष्ण यानी जेपीना विश्रांतीचा सल्ला दिला रात्री ११॥ वाजता बाहेर मोकळ्या अंगणामध्ये झोपलेला राधाकृष्णजीचा मुलगा चंद्रहर घाईगर्दीने आत आला आणि बाहेर पोलिस आले असल्याची खबर त्याने आपल्या पिताजीना दिली. जिल्हा न्यायाधीश सुशिलकुमार याच्या सहीचे वॉरंट पोलिसअधिकाऱ्यानी दाखविले. राधाकृष्ण म्हणाले-जेपी विश्रांती घेत आहेत. आपणाला पहाटे तीन-चारपर्यंत थाबणे शक्य आहे का? पोलिसानी विनंती मान्य केली. राधाकृष्णजीनी फोन हाती घेतला आणि जेवढ्या मंडळीशी संपर्क साधणे शक्य होते तेवढ्याच्या घरी फोन लावला। मोरारजीभाईंच्या घरी पोलिस येऊन पोचल्याचे समजले तर चंद्रशेखरने आपण येत असल्याचे सागून फोन ठेवला.

तीन वाजता पोलिसाचे पुनरागमन झाले. अजून जेपीना का पकडण्यात आले नाही, अशी विचारणा त्याच्याकडे वारवार करण्यात येत होती. आता वेळ काढणे शक्य नाही हे ओळखून राधाकृष्ण जेपीच्या खोलीत गेले. शातचित्ताने झोपलेल्या या लोकनेत्याला त्रास देण्याचे त्याच्या जिवावर आले; पण गोष्टी आता त्याच्या हातात नव्हत्या. त्यानी जेपीना उठविले. परिस्थितीची कल्पना दिली. इंदिराबाई असले साहसी पाऊल उचलतील हे जेपीना खरे वाटत नव्हते आपल्या अटकेचे वॉरंट पाहून ते आश्चर्यचकित झाले. राधाकृष्ण आणि जेपी याच्यामध्ये काही जास्त बोलणे होण्यापूर्वीच अटक करण्यासाठी आलेला पोलिसअधिकारी पुढे आला 'माफ करा,' तो म्हणाला...' आमचा नाइलाज आहे. आपल्याला अटक करण्याचा वरून हुकूम आहे.' जेपीनी मान डोलावली आणि म्हणाले, 'मला तयार होण्यास अर्ध्या तासाचा अवधी द्या!' राधाकृष्ण अस्वस्थपणे आपल्या सहकाऱ्यांची वाट पाहत होते. निदान चंद्रशेखर तरी यावेत अशी त्याची अपेक्षा होती, पण अद्यापि कोणी आले नव्हते जेपी इमारतीच्या आवारामध्ये आले त्या वेळी त्यांच्या लक्षात आले की, सपूर्ण आवार पोलिसानी व्यापलेले होते. किमान तीन लॉऱ्या भरून पोलिस आणण्यात आले असावेत जे. पी. पोलिसाच्या गाडीमध्ये जाऊन बसतात तोच वेगाने आलेली एक टॅक्सी गाधी फौंडेशनच्या इमारतीसमोर येऊन उभी राहिली चंद्रशेखरला हात हालवून खूण करण्याखेरीज जेपी काही करू शकले नाहीत जेपीना पार्लमेंट स्ट्रीटवरील पोलिसचौकीमध्ये आणण्यात आले. पोलिसअधिकाऱ्याच्या वागण्याबोलण्यात विलक्षण नम्रता होती. या वेळपर्यंत काही पुढारी व पत्रकार याना जेपीच्या अटकेचे वृत्त समजले होते. उपस्थितामध्ये चंद्रशेखरही हजर होते इतक्यात फोन आला म्हणून वरिष्ठ पोलिसअधिकारी बाजूला गेले पाचच मिनिटामध्ये ते पुन्हा येऊन हजर झाले आणि चंद्रशेखर याच्याकडे वळून म्हणाले, 'आपल्याला अटक करण्यासाठी एक तुकडी आपल्या घरी रवाना झाली आहे!' चंद्रशेखर म्हणाले, 'मग वेळ कशाला घालवता? मी येथे हजर आहेच. मला इथेच अटक करा!' या सगळ्या प्रकाराचे जयप्रकाशजीना आश्चर्य वाटल्याचे दिसले. त्याची अशी कल्पना होती की, फक्त काही मोठ्या पुढाऱ्यानाच अटक करण्याची आज्ञा असावी; परतु चंद्रशेखर यानाही अटक झाल्याचे पाहून शासन कोणताही धोका पत्करण्यास तयार नसल्याचे सिद्ध झाले.

### नानाजींची वेगळी चाल

लोकसंघर्षसमितीचे चिटणीस नानाजी देशमुख पंचवीस जूनच्या रात्री शातपणे झोपले होते. खणखणणाऱ्या फोनकडे प्रथम त्यानी दुर्लक्ष केले, परतु तो सतत वाजत आहे हे लक्षात आल्यावर त्यांनी फोन उचलला. फोनवरून एक बाई घाईघाईने बोलत होती...ती म्हणाली, 'लक्षात ठेवा, तुम्हाला एक तासापेक्षा कमी अवधी आहे.

तुम्हाला निसटून जाणे शक्य व्हावे म्हणून मुद्दाम मी आधी फोन करीत आहे. या सूचनेपेक्षा आपल्याला जास्त काही करता येणार नाही !' असे म्हणून बाईंनी फोन खाली ठेवला नानाजी क्षणभर चक्रावून गेले. विचार करण्यास जास्त अवधी नव्हता. त्यानी घाई-गर्दीने कुडता चढवला आणि दहा मैल दूर असलेल्या एका गुप्त ठिकाणी ते रवाना झाले फोनवरून परस्परांशी सपर्क साधला जात होता नानाजी जात होते त्या बंगल्यावर कोणी कोणी जायचे याचे इशारे दिले गेले होते बघता बघता फोनवर दिल्या गेलेल्या सूचनां-प्रमाणे एम एल सुराना, सुब्रह्मण्यम स्वामी, रवींद्र वर्मा, दत्तोपंत ठेंगडी, राधाकृष्ण, सुरेंद्र मोहन, सुरेंद्रसिंग भंडारी, दिल्लीचे माजी महापौर केदारनाथ सहानी ही सगळी मंडळी एकत्र आली. अटकेचे सत्र सुरू असतानाच भूमिगत चळवळीची मुहूर्तमेढ रोवली गेली. ऑगस्ट १९७५ मध्ये लोकसंघर्षसमितीची मुंबईमध्ये जी बैठक झाली त्या बैठकीमध्येच सार्वत्रिक सत्याग्रहाचा निर्णय घेण्यात आला. तसेच भूमिगत चळवळ चालू ठेवण्यासाठी आणि अटक झालेल्या कार्य-कर्त्यांच्या कुटुंबियाना सहकार्य करण्यासाठी निधी जमा करण्याचे ठरविण्यात आले. तुरुगामध्ये असलेल्याशी सपर्क ठेवणे आणि लोकांना खऱ्या परिस्थितीची जाणीव करून देणारी पत्रके प्रसिद्ध करणे हे दोन अन्य कार्यक्रमही डोळ्यासमोर ठेवण्यात आले आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे शासनाची करडी नजर असूनही ठरल्या योजनेप्रमाणे कार्य करण्यात लोकसंघर्षसमितीने नेत्रदीपक यश मिळविले

## इंदिराबाईंची कार्यपद्धती

इंदिराबाईंची काम करण्याची पद्धत मोठी अजब होती. स्वतःला वाईटपणा न घेता त्या कडवट कामे परस्पर करवून घेत असत. समजा, 'अ' या सहकाऱ्याबरोबर त्याचे संबंध जिव्हाळ्याचे आहेत आणि तरीही एखादा कडवट निर्णय त्या व्यक्तीला कळवायचा असेल तर बाई त्या व्यक्तीशी प्रत्यक्ष बोलताना तो अप्रिय विषय चुकूनही काढीत नसत. 'ब' या व्यक्तीला त्यासाठी त्या हाताशी धरीत. या 'ब'ला हाताशी धरण्याने अनेक उद्देश साध्य होत असत. या 'ब'ची निवड परिस्थितिसापेक्ष असे. सर्वसाधारणपणे या 'ब'चे 'अ'बरोबर चागले सबंध असले तरी त्याला 'अ'बद्दल असूया वाटते आहे अशी खात्री करून घेतल्यावर बाई त्याची निवड करीत. अत्यंत जबाबदारीचे काम आपल्यावर सोपविले जात आहे याची त्याला जाणीव असे. आपण पंतप्रधानाचा विश्वास संपादन केला आहे या भावनेने खूप होऊन तो आपल्यावर सोपविलेली कामगिरी यशस्वीपणे पार पाडीत असे. मोहनुलहक चौधरी याना मंत्रिमंडळा-तून वगळण्याचा निर्णय घेतल्यावर बाईंनी यशपाल कपूर याच्या-मार्फत तो निर्णय त्याच्यापर्यंत पोचविला. राजबहादूर याना मंत्रि-मंडळातून वगळण्यात आल्याचे वृत्तही यशपाल कपूर याच्यामार्फतच कळविण्यात आले. ही कार्यपद्धती योजण्याचे मुख्य कारण — फारसे त्रासदायक न ठरता कोणतेही निर्णय बाईंना सबधित व्यक्तीपर्यंत पोचविणे सुलभ जात असे. तसेच प्रत्यक्ष त्याचे नाव अथवा लेखी पत्र नसल्याने पुढे आवश्यकता वाटल्यास या निर्णयाची सुलभतेने फेर-तपासणी करता येत असे आणि आवश्यकता वाटल्यास हे निर्णय बदलले जात असत. कित्येक वेळा केवळ दडपणाखाली ठेवण्यासाठी निर्णय घेतल्याचे नाटक केले जाई. त्यामुळे सबधित व्यक्ति सावध होऊन बाईंना अनुकूल ठरतील अशी पावले टाकीत असे. आपल्या सहकाऱ्यांचा, स्नेह्यांचा आणि हितचिंतकाचा सल्ला बाई शांतपणे ऐकून घेत असत. त्या वेळी त्याच्या चेहऱ्यावर कोणतेही भाव नसत. त्यामुळे सल्ला देणाराला बाईंची प्रतिक्रिया कधीच समजू शकत नसे. मंत्रिमडळाची बैठक हा एक अजब प्रकार असे. सहकाऱ्याना विश्वा-सात घेऊन काम करण्याची बाईंची वृत्ती नसल्यामुळे या बैठकी केवळ औपचारिक ठरत असत. आपल्या दोन ज्येष्ठ मंत्र्याना तिने कधीही एकत्र येऊ दिले नाही. तसेच आपण कोणा एकावर अवलंबून आहोत असा समजही इंदिराजींनी कधीही निर्माण होऊ दिला नाही दिनेश सिंग, पी एन. हक्सर, रमेश थापर, इंदर गुजराल, उमाशंकर दीक्षित, डी. पी. मिश्रा, सिद्धार्थ शंकर रे, रजनी पटेल अशी किती तरी मडळी इंदिराजींच्या अतस्थ वर्तुळामध्ये आली आणि गेली; परंतु कायमचे स्थान मात्र कोणालाही मिळाले नाही. आणीबाणीनतर मात्र सजयचा वरचष्मा झाला आणि संजय–शुक्ला, ओम मेहता, आर्. के. धवन ही मंडळी कारभाराची सूत्रे हलवू लागली. पैकी धवन रेल्वेखात्यामध्ये एक सर्वसाधारण नोकरी करीत होते यशपाल कपूर याचे ते जवळचे आप्त. त्याच्या मार्फतच त्यांचा पतप्रधानाच्या सचिवालयामध्ये प्रवेश झाला आणि पतप्रधानांचे खाजगी सचिव म्हणून त्याची नियुक्ती झाली राजकीय प्रकरणे हाताळणाऱ्या धवन-बाबूचा पतप्रधानाच्या सचिवालयामध्ये एवढा वरचष्मा होता की— त्याच्या सल्ल्याबाहेर जाण्याचे धारिष्ट कोणालाही दाखविता येत नसे. कोणावरही दीर्घकाळ विश्वास नसल्याने बाई] आपल्या निकट-वर्तीय सहकाऱ्यामध्ये सतत बदल करीत असत. एखादे मामुली कारणही त्यासाठी पुरेसे होई. संकटकाळी उत्तम साथ देणाऱ्या सल्लागाराची अथवा मित्राची एखादी गोष्ट पटली नाही तर बाई त्याला झिडकारून टाकीत असत. त्यातल्या त्यात कपूर दीर्घकाळ बाईंच्या विश्वासात राहू शकले. अलीकडे म्हणजे निवडणुकीनतरच्या काळामध्ये त्याचेही महत्त्व शून्यवत झाले आहे. अर्थात आता सत्ताच नाही त्यामुळे बाईंना त्याच्याबद्दल काय वाटते याला काहीही किंमत नाही. बाईंचा स्वभाव जराही क्षमाशील नव्हता आपल्यापेक्षा वेगळा सूर लावणारी माणसे त्याना जराही आवडत नसत. त्यामुळे त्याच्या भोवती सतत होयबाचे कडबोळे हात जोडून हुकुमाची वाट पहात तयार असे. एक पद्मजा नायडू याचा अपवाद सोडला तर त्याना कायमचा मित्र नव्हताच. पद्मजा नायडू याना मात्र इंदिराजीच्या आयुष्यामध्ये विशेष स्थान होते. त्या त्यांच्या अत्यत जिवलग स्नेही होत्या आणि त्याच्याकडून दिल्या जाणाऱ्या सल्ल्याची बाई कदर करीत असते. पद्मजा नायडूच्या निधनानतर त्यानी आपल्या मुलाला-सजयला जवळ केले. परंतु खरी गोष्ट ही की पद्मजाच्या निधनानंतर त्या पूर्ण एकाकी बनल्या. उत्तम व्यक्तिमत्त्व आणि दैवदत्त आकर्षकपणा या दोन्ही गोष्टींचा त्यानी भरपूर उपयोग करून घेतला. बाईंच्या एका हास्यासाठी—मी मी म्हणणारी मडळी आतुर असत. एखाद्या मंत्र्याला जर बाईंनी घरी बोलावले तर त्याचे स्वागत–सुहास्यवदनाने झाले काय हे जाणून घेण्यास संबधित मंत्र्याच्या पत्नी अतिशय उत्सुक असत संमोहित करणारे व्यक्तिमत्त्व लाभले असूनही—त्याच्या जुल-माला कंटाळून रायबरेलीमधील त्याच्या अनेक मतदारानी त्याच्या विरोधी मतदान केले आणि तरीही ज्या वेळी बाई निवडणुकीमध्ये पडल्या त्या वेळी असे व्हायला नको होते असे उद्गार त्यांच्या विरोधात मत नोंदणाऱ्या अनेक मतदारांनी काढले.

सर्वसामान्य माणसाला आपलासा करून घेण्याचे कै. पंडितजीचे

एक खास तंत्र होते. बाईंनी ते उत्तम आत्मसात केले होते आणि त्या वेळच्या अमेरिकन वकिलानी–जनसंपर्क कसा साधावा हे या बाई-कडून शिकावे असे उद्गार काढले होते गुजराथमधील दौऱ्यावर गुजराथी पेहराव–आणि गुजराथची सून असल्याचा वारवार उल्लेख, पंजाबमध्ये गेल्यावर भांगडा नृत्यामध्ये सहभागी होण्याचे धार्ष्टर्य दाखवण्याची वृत्ती, तर महाराष्ट्रात आल्यावर पुण्याचा गौरव या गोष्टी त्या हेतुपूर्वक करीत असत आणि लोकाना संमोहित करीत असत. आणीबाणीमुळे मिळालेले फायदे, प्रचारयंत्रणेवर संपूर्ण नियंत्रण असल्याने सतत होणारा उदोउदो, विस्कळित विरोधी पक्ष, नियंत्रणा-मुळे धास्तावलेली वृत्तपत्रे आणि जनता आपल्या पाठीशी असल्याचा फाजील आत्मविश्वास यामुळे त्यानी–निवडणुकीचा जुगार मांडला. शेवटी सगळेच हिशेब चुकले आणि म्हणून तर बाई खऱ्या अर्थाने प्रकाशात येऊ शकल्या !

□

## □ संजयच्या सासऱ्याची गोष्ट

स्वत संजयनेच पोलिसप्रमुख भवानीमल याना फोन केला आणि आपल्या सासऱ्याचे प्रेत शेतामध्ये पडले असून, या कृत्यामागे काही काळेबेरे असावे असा संशय व्यक्त केला. त्यापूर्वी अर्धाच तास एका अना-हूत व्यक्तीने फोन करून संजयचे श्वशुर लेफ्ट. कर्नल आनंद याचा मृतदेह कोठे पडला आहे याचा संपूर्ण तपशील पुरवला होता. प्रारंभी या प्रकाराची ‘खुनाचा प्रकार’ अशी नोंद करून घेण्यात आली असली तरी हा ‘आत्महत्येचा प्रकार’ असल्याचे पोलिसानी जाहीर केले, पण लोकाना तसेच वर्तमानपत्रवाल्यानाही ही गोष्ट खरी वाटली नाही नि मग विविध वृत्तपत्रातून–साप्ताहिकामधून स्पेशल रिपोर्टचे सत्र सुरू झाले.आपल्या जावयाचा पराभव झाल्यापासून देशामधील हा सगळयात प्रसिद्ध सासरा विलक्षण निराश झाला होता. मार्च ३० रोजी त्याना बेशुद्धावस्थेमध्ये हॉस्पिटलमध्ये आणण्यात आले. ही बेशुद्धावस्था कशामुळे प्राप्त झाली ? डॉक्टर म्हणतात की, नेमके कारण देणे कठीण असले तरी — औषधाच्या अतिसेवनामुळे ही बेशुद्धावस्था आली असण संभवनीय आहे. मात्र हॉस्पिटलचे अधिकारी आनंद-जींच्या आजाराबाबतचे कागदपत्र पत्रकाराना दाखविण्यास तयार नाहीत. दोन एप्रिल रोजी लेफ्टनंट कर्नल आनंद शुद्धीवर आले. अधिक तपास केल्यावर असेही आढळून आले आहे की, निवडणूक-पराभवानंतर ले. कर्नल आनंद आणि त्याचे जावई संजय याच्यामध्ये तीव्र स्वरूपाचे मतभेद होते. मानसिक ताण कमी व्हावा म्हणून ले. कर्नल आनंद दोन जून रोजी पंजाबमधील खोर या गावी असलेल्या आपल्या शेतामध्ये गेले. त्याच दिवशी सायंकाळी सात वाजता फिरून येण्यासाठी म्हणून ते बाहेर पडले आणि परत आलेच नाहीत त्या-नंतर अठ्ठेचाळीस तासानी म्हणजेच चार जून रोजी पोलिसाना त्याचा मृतदेह मिळाला. अत्यंत जवळून गोळी लागल्यामुळे कर्नल आनंद याना मृत्यू आल्याचे स्पष्टपणे दिसत होते. चार जून रोजी रात्री सव्वाआठ वाजता ले. कर्नल आनंद याचे आप्तेष्ट आले आणि त्यानी मृतदेह ओळखला. पोलिसतपासामध्ये मृतदेहाजवळ कोणतेही हत्यार आढळून आले नाही. ले. कर्नल आनंद याचा मृतदेह प्रथम त्याचा ड्रायव्हर गुरुदेव सिंग याने ओळखला–परंतु चार जून रोजी दुपारी चार वाजता त्याला समजलेले हे वृत्त त्याने पोलिसाना कळवले नाही. तो बसने शहरामध्ये यण्यासाठी परत निघाला असताना त्याला कर्नल आनंद याचा भाऊ आणि त्याची पत्नी भेटली त्याना त्याने हे वृत्त सांगितले.

बंदूक, पिस्तूल, अथवा गोळी न सापडल्याने पोलिसानी गुरुदेव सिंगला अटक केली आणि हत्यार पळविल्याचा आरोप त्याच्यावर ठेवला. पुढे पोलिसतपासामध्ये असेही आढळून आले की कर्नल आनंद यानी परदेशातून एक पिस्तूल आणले होते, परंतु त्याची अधिकृत नोंद मात्र कुठेही नव्हती. खुल्या शेतामध्ये दोन दिवस मृत-देह राहूनही त्याला जनावरानी तोंड लावले नाही हे आश्चर्य मानावे लागेल. या गोष्टीचा समाधानकारक खुलासा पोलीस देऊ शकत नाहीत. त्यामुळे कर्नल आनंद याचा अन्यत्र खून करण्यात येऊन नंतर त्याचा मृतदेह काळजीपूर्वक शेतामध्ये आणून ठेवण्यात आला असा संशय घेण्यास जागा निर्माण झाली. तथापि खुल्या मैदानामध्ये प्रेत सुरक्षित राहिल्याची अनेक उदाहरणे पोलिसाजवळ आहेत. संजयच्या दुष्कृत्याचा तपशील असलेली तीन वृत्तपत्रे मृतदेहाजवळ आढळली. त्यावरून हा सारा मजकूर वाचल्यावर आनंद निराश झाले आणि त्यानी आत्महत्या केली. तथापि आपल्या जावयाबाबत प्रसिद्ध होणारा मजकूर त्याच्या पहाण्यात असलाच पाहिजे आणि तो दैन-दिन वृत्तपत्रातून पाहात असल्यामुळे संजयबद्दलच्या मजकुराने एक-दम धक्का बसला व त्यानी निराश होऊन आत्महत्या केली हे पटू शकत नाही. संजयबद्दलच्या वृत्तामुळे अस्वस्थ होऊन त्यानी आत्म-हत्या केली असा भास निर्माण करण्यासाठी खुनी माणसाने ही सर्व वृत्तपत्रे मुद्दाम त्याच्या मृतदेहाभोवती आणून ठेवली असेही अनुमान काढता येते ‘संजयबद्दलची चिंता असह्य झाली आहे’ ही चिठ्ठी कर्नल आनंद यानी लिहिली आहे हे खरे असले तरी ही चिठ्ठी ही कर्नल आनंद यानी आत्महत्या केला असे निर्विवादपणे सिद्ध करू शकत नाही. कर्नल आनंद याच्यासारखा सुशिक्षित, लष्करी शिस्ती-मध्ये वाढलेला मनुष्य आत्महत्येचा उल्लेखही नसलेले बोटभर चिठुरडे लिहील हे खरे वाटत नाही. समजा, त्यानी आत्महत्या करण्याचे ठरविले असले तरी सविस्तर पत्र लिहून ते योग्य त्या पोलिसअधिकाऱ्याला मिळेल अशी खात्री करून घेऊन मगच त्यानी जगाचा निरोप घेतला असता पोलिसाचे म्हणणे असे की–कर्नल आनंद मानसिकदृष्ट्या खचलेले होते त्यानी अचानक आत्महत्येचा निर्णय घेतला आणि आपण काय करतो आहोत हे लक्षात येण्यापूर्वीच चार शब्दाची ही चिठ्ठी खरडून त्यानी आत्महत्या केली.

मृतदेह जिथे सापडला–तिथे हाणामारी झाल्याचे अथवा शारीरिक झटापट झाल्याचे कोणतेही लक्षण नाही. म्हणजेच घटनास्थळी अन्य कोणी असणे संभवनीय नाही खेरीज जखमेची जागा अशी आहे की स्वतः पिस्तूल चालवून त्या जागी गोळी चालविणे शक्य आहे. कर्नल आनंद याचे निधन कशामुळे झाले ? त्यानी आत्महत्या केली की तो एक निर्घृण खून होता ? याबाबत लोकाच्या मनामध्ये संदेह आहे. पोलिसानी हा आत्महत्येचा प्रकार असल्याचे गृहीत धरले असून तशी घोषणाही केली आहे, परंतु हे प्रकरण दप्तरी दाखल केलेले नाही. याचाच अर्थ असा की–कर्नल आनंद याचा मृत्यू आत्महत्याच आहे असे पोलिसाना निश्चितपणे सांगता येत नाही. ही आत्महत्याच आहे अशी पोलिसाची जर शभर टक्के खात्री पटली असती तर त्यानी हे प्रकरण दप्तरी दाखल केले असते. अगदी असे गृहीत धरले की उपलब्ध झालेला सगळा पुरावा हा खुनाचा प्रकार असल्याचे सूचित करतो तरी खुनाची शक्यता नाकारता येत नाही उत्तरीय तपासणीमध्ये नेमके काय सिद्ध झाले हे पोलिसानी प्रसिद्ध केलेले नाही. कदाचित् कर्नल आनंद याना भरपूर मद्य पाजून ते बेसावध असताना अत्यंत जवळच्या व्यक्तीने अनपेक्षितपणे त्याच्यावर गोळी चालविली असावी ही शक्यता नाकारता येत नाही. कर्नल आनंद यानी मृत्यूपूर्वी मद्यपान केल्याचे उत्तरीय तपासणीमध्ये सिद्ध झाले आहे काय ? असा प्रश्न विचारला असता पोलिसानी त्याचे उत्तर दिलेले नाही. संजयबद्दलच्या विविध बातम्यांमुळे लोकाचे त्याच्याबद्दल प्रतिकूल मत आहे आणि म्हणूनच–त्याच्या सासऱ्याच्या या मृत्यू-बाबत पूर्ण तपास करून मगच पोलिसानी निर्णयाप्रत यावे असे सर्वसाधारण लोकमत आहे या प्रकरणामध्ये संजय अकारण गोवला

जाऊ नये हे जितके खरे तितकेच या प्रकरणामध्ये त्याचा हात असेल तर तो सुटू नये हेही खरेच. □

## □ राज्यसभेची पंचवीस वर्षे

**१९५२** साली राज्यसभा अस्तित्वात आली. म्हणजेच चालू वर्ष हे राज्यसभेचे रौप्यमहोत्सवी वर्ष. १९५२ पासून राज्यसभेचे सभासद असलेल्या भुपेश गुप्ता याचा सत्कारही करण्यात आला. राज्याना प्रतिनिधित्व देणारी सभा म्हणूनच या वरिष्ठ सभागृहाला राज्यसभा असे नाव देण्यात आले. राज्यांच्या हितसंबधाचे व अधिकाराचे रक्षण करणे, राष्ट्रीय प्रश्नावर निरनिराळ्या राज्याची मते स्पष्ट करणे यासाठी या व्यासपीठाचा वापर होतो. राज्यसभेचे एक सदस्य सी. जी. के. रेड्डी यानी अलीकडेच राज्यसभेची सुधारणा कशी करता येईल यासंबंधी एक लेख इंडियन एक्सप्रेसमध्ये लिहिला आहे. आपल्या लेखामध्ये त्यानी म्हटले आहे की, राज्यसभेच्या सदस्याची वर नमूद केलेली कामे आणि राज्यसभेचे प्रत्यक्ष कामकाज यामध्ये फार तफावत आढळते. लोकसभेप्रमाणेच कामकाज करणारे वरिष्ठ सभागृह असे आजच्या राज्यसभेचे स्वरूप आहे. त्यामुळे लोकसभेने मजूर केलेली बिले पास करणे एवढेच या सभागृहाचे कामकाज होऊन बसते. काही वेळा राज्यसभेने केलेल्या सूचना मान्य झाल्या आहेत हे खरे असले तरी येऊ घातलेल्या कायद्याना–अधिक विचाराचे बधन घालणे एवढेच कार्य राज्यसभा करते. राज्यामधील राजकीय परिस्थितीचे प्रतिबिंब राज्यसभेमध्ये उतरावे यासाठी राज्यांच्या विधानसभा व विधानपरिषदेमार्फत प्रमाणबद्ध प्रतिनिधित्वाच्या तत्वानुसार निवडणुका होतात राज्यसभेच्या सदस्यामध्ये नेमणुका झालेले सदस्यही असतात. त्यांच्या क्षेत्रामधील त्याच्या अनुभवाचा फायदा मिळावा हाच त्यांच्या नेमणुकीमागे उद्देश असतो, परंतु नेमणुका झालेली ही मंडळी शासकीय धोरणाचा पुरस्कार करीत राहतात त्याचे स्वत चे निर्भीड मत क्वचितच व्यक्त होते. राज्यसभेवरील नेमणुका राजकीय हेतूने प्रेरित होऊन केल्या जातात. राज्यसभा कशी असावी, सभासदानी कशा प्रकारे काम करावे याबाबत घटनाकारांना अभिप्रेत असलेल्या कल्पना वाऱ्यावर उडाल्या असून राज्यसभा ही सत्ताधारी पक्षाचे वाहुले झाली आहे. राज्यांच्या अधिकाररक्षणाचे कार्य राज्यसभेने कधीही केले नाही.

राज्यसभा हे कायम सभागृह असून, निवडून आलेल्या सदस्याची मुदत सहा वर्षांची असते. द्वैवार्षिक निवडणुका होऊन नवीन सदस्याची भरती होते. सर्व विधानसभा, विधान–परिषदामधून–विरोधी पक्षाचे जे बळ असते तेवढीच राज्यसभेमध्ये विरोधी पक्षाची ताकद असली पाहिजे. १९५२ साली तशी ती होती; परंतु पुढे कॉंग्रेसचा वरचष्मा झपाट्याने वाढत गेला. १९५४ साली त्या वेळच्या म्हैसूर राज्यामधील सभागृहामध्ये विरोधी पक्षाचे जे बळ होते ते लक्षात घेता–द्वैवार्षिक निवडणुकामध्ये सहा विरोधी उमेदवार निवडून येणे आवश्यक होते; परतु प्रत्यक्षामध्ये केवळ दोन विरोधी उमेदवार निवडून येऊ शकले. एक वेळ अशी येईल, की राज्यसभेमध्ये सत्ताधारी पक्षाचे प्रचंड वर्चस्व निर्माण होईल असे मी राज्यसभेमध्ये सांगितले त्यावेळी त्याची दखल घेतली गेली नाही; पण आज त्याचा प्रत्यय येत आहे. सत्ताधारी कॉंग्रेसपक्ष निवडणुकामध्ये फेकला गेला; परंतु राज्यसभेमधील त्याचे प्रचड बहुमत अबाधित राहिले आणि जनतापक्षाला राज्यसभेमध्ये जो केविलवाणा पाठिंबा मिळतो त्यामुळे शासनासमोर अनेक अडचणी निर्माण होतात. राज्याच्या विधानसभाच्या निवडणुका घेण्यामागे जनतापक्षाची राज्यसभेमधील परिस्थिती शक्य तितक्या लवकर सुधारावी हाही एक उद्देश आहेच. जनतापक्षाला सात राज्यामध्ये बहुमत मिळाल्याने १९७८ साली होणाऱ्या निवडणुकामुळे या पक्षाला राज्यसभेमधील स्वत.ची परिस्थिती सुधारणे शक्य होणार आहे. खेरीज–कॉंग्रेसपक्ष सोडणाराना खुले आवाहन जनतापक्षाने केलेच आहे. तथापि–फाटाफुटीच्या आवाहनाला म्हणावा तसा प्रतिसाद मिळाला नाही तर राज्यसभेमध्ये निर्विवाद बहुमत प्राप्त करून घेण्यासाठी जनतापक्षाला १९८० साली होणाऱ्या निवडणुकापर्यंत थांबावे लागेल आणि १९८२ मध्ये जनतापक्षाचे राज्यसभेवर पूर्ण वर्चस्व प्रस्थापित होईल. १९८२ साली होणाऱ्या लोकसभा–निवडणुकामध्ये समजा कॉंग्रेस विजयी झाली तर आज जनतापक्षाला कॉंग्रेससदस्याचे वर्चस्व असलेली राज्यसभा ही जशी डोकेदुखी आहे तशीच अवस्था कॉंग्रेसवर येईल. कारण लोकसभा–निवडणुकामध्ये जर कॉंग्रेस यशस्वी झाली तर लोकसभेमध्ये कॉंग्रेस आणि राज्यसभेमध्ये जनतापक्ष अशी परिस्थिती निर्माण होईल. प्रचंड बहुमताने निवडून आलेल्या शासनाच्या कार्यामध्ये अडथळे आणण्याची प्रक्रिया राज्यसभा करू शकते.

राज्यसभेने अभिप्रेत असलेले काम केले नाही–आणि लोकसभेमधील कामाची पुनरावृत्ती होत राहिली तर–राज्यसभा चालविणे ही एक अनावश्यक आर्थिक जबाबदारी होऊन बसेल. म्हणूनच राज्याबाबतच्या प्रश्नावरच राज्यसभेचा नकाराधिकार चालावा. ज्याप्रमाणे राज्यसभा–अंदाजपत्रकामध्ये दुरुस्ती सुचवू शकत नाही अथवा ते नाकारू शकत नाही त्याचप्रमाणे राज्याचा सदर्भ नसलेले सर्व कायदेकानू राज्यसभेमध्ये केवळ मंजुरीसाठी पाठविले जावेत. त्याबाबतचा नकाराधिकार राज्यसभेला नसावा. राज्यामधील वाहतूक, दोन राज्याच्या प्रश्नाचा निवाडा करणारे कायदे, प्रादेशिक वाद, पाणीवाटपाचे प्रश्न या गोष्टीबाबत मात्र राज्यसभेची मजुरी आवश्यक ठरवावी. राज्यांच्या अधिकारकक्षेवर आक्रमण करणाऱ्या कोणत्याही कायद्याबाबत राज्यसभेला व्यापक अधिकार असावेत आणि हे कायदे पूर्णपणे फेटाळून लावणेही राज्यसभेला शक्य व्हावे आणि राज्यसभेने तसे केल्यास राज्यसभेमधील मतदान हाच अतिम निर्णय समजला जावा. राज्यसभेची सध्याची अधिकारकक्षा मान्य केली तर बी. जी. राव यानी केलेली सूचना अधिक व्यवहार्य वाटते त्यांच्या मते ज्या विधानसभेमधून राज्यसभेचा सदस्य निवडून आला असेल त्या विधानसभेच्या मुदतीइतकीच त्याच्या सदस्यत्वाची मुदत असावी. संबधित विधानसभा अथवा विधानपरिषद बरखास्त झाल्यास त्याचे सदस्यत्वही रद्द व्हावे. नवीन विधानसभा अस्तित्वात येताच अर्थातच नवीन सदस्याची निवड करण्यात यावी. अशी सुधारणा केल्यास लोकमताचे प्रतिबिंब राज्यसभेतही पहावयास मिळेल आणि विधानसभेमधील बदललेली परिस्थिती–राज्यसभेत लगोलग पहावयास मिळेल. राज्यसभेबाबतच्या या सूचना याच सभागृहाच्या जबाबदार सदस्याने केल्या असून, त्याचा विचार करून अमलबजावणी करणे निश्चितपणे हितावह ठरणारे आहे. कायदामंत्री शातिभूषण याबाबत काही करता येईल काय हे पाहात आहेत. कोणत्याही परिस्थितीमध्ये लोकसभा आणि राज्यसभा यामध्ये सामजस्य नादणे आवश्यक आहे. □

साप्ताहिक 'विवेक' १९ जून ७७ अंकावरून पुनर्मुद्रित

# बाबा आढाव यांना अनावृत पत्र

**माननीय बाबा आढाव यांसी—**

महाराष्ट्र प्रदेश मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या वतीने नुकत्याच झालेल्या मेळाव्यातील आपले भाषण वाचून खेद झाला. आणीबाणी-पूर्वी रा. स्व. संघ व जनसंघ यांच्याविषयीची आपली मते भरपूर पूर्वग्रहदूषित होती; पण येरवडा तुरुंगात समाजवाद्यांबरोबर संघाचे कार्यकर्ते व जनसंघीयही डांबले गेले आणीबाणीचा प्रारंभ ते सत्याग्रह या दरम्यान काही कालावधी गेला. या वेळी आपल्या मित्राशी बोलताना 'हे संघवाले काय करणार? त्यांची संघटना दिखाऊ आहे' असे आपण म्हणाल्याचे मी आपल्या निकटवर्तीयाकडून ऐकले आहे; पण संघ व जनसंघाची मंडळी डझनाच्या नव्हे तर शेकड्यांच्या संख्येने सत्याग्रहात उतरली व तुरुंगात गेली आपलं मन स्वच्छ असतं तर स्वत:चं भविष्य चुकल्याबद्दल आपणास आनंद व्हायला हवा होता. आपल्या अनेक समाजवादी साथींना तसा आनंद झाला. कारागृहातील प्रदीर्घ सहवासानंतर त्यांचे संघ व जनसंघाबद्दलचे गैरसमज मावळले; त्यांच्याशी हातात हात घालून हुकूमशाहीशी, अन्यायाशी लढायला ते सिद्ध झाले. दुर्दैवाने, आपल्या मनातील संघ-जनसंघाबद्दलची ठसठस मात्र गेलेली दिसत नाही.

पुण्याच्या त्या सभेत आपण म्हणालात की, आणीबाणी व श्रीमती इंदिरा गांधींचे राजकारण यामुळे विरोधी राजकीय पक्षाचे ऐक्य अपरिहार्य बनले, पण या ऐक्यामुळे जातीयवादी संघटनांना नैतिक बळ प्राप्त झाले, एवढेच नव्हे तर त्यामुळे सामाजिक व राजकीय प्रबोधनाची चळवळ ३०–४० वर्षे मागे गेली असे वाटू लागले आहे!

ही हानी लक्षात घेऊनच हे ऐक्य (जनता पक्ष) कायम स्वरूपाचे असावे का, हा खरा प्रश्न आहे, असे तुम्ही पुढे म्हणालात.

जातीयवादी संघटना असे म्हणताना आपल्या डोळ्यांसमोर जनसंघ व रा. स्व संघ या दोनच संघटना आहेत हे उघड आहे कारण, जनता पक्षात आलेल्या समाजवादी, भालोद व संघटना कॉंग्रेस यांना आपण कधी जातीयवादी ठरविल्याचे ऐकिवात नाही आता संघ व जनसंघ जातीयवादी कसे? खुद्द जनता आंदोलनाचे अध्वर्यू श्री. जयप्रकाश नारायण यांनी संघ-जनसंघ दोघानाही ते जातीय नसल्याचे सर्टिफिकेट वारंवार दिले आहे संघ जातीय असेल तर मीही जातीय आहे, असे म्हणायला जयप्रकाशांना संकोच वाटला नाही जयप्रकाशांना आपण मानता असे समजते त्यांच्याशी चर्चा करून जयप्रकाश या मताप्रत का आले हे कृपया समजावून घेतलेत तर बरे!

संघ–जनसंघातील मंडळींचा सामाजिक परिवर्तनाला विरोध आहे, असे आपले ठाम मत दिसते. याबाबत एक प्रश्न विचारायला संकोच वाटला तरी विचारणे जरूर आहे की, आपण सामाजिक परिवर्तन घडवून आणण्यासाठी असे काय विलक्षण केले आहे की, जे आजपर्यंत कोणी केले नाही? श्री. म. माटांनी, ते सामान्य शाळामास्तर असूनही स्वतःच्या पदरचे वीस-पंचवीस हजार रुपये खर्चून अस्पृश्यांना शिक्षण दिले आणि त्यांच्या पोटात चांगल्या अन्नाचे दोन घास घालण्याचेही प्रयत्न केले. स्वातंत्र्यवीर सावरकरांनी आपल्या रत्नागिरीच्या वास्तव्यात अस्पृश्योद्धारासाठी जंगजंग पछाडले आणि अशा एका पातळीवर ती चळवळ नेऊन ठेवली की बाबासाहेब आंबेडकरांनीही त्यांच तोंड भरून कौतुक केलं. कर्मवीर विठ्ठल रामजी शिंद्यांनी याच कार्यात आपलं आयुष्य वेचलं. आपलं 'एक गाव एक पाणवठा' हे आंदोलन प्रशंसनीय असलं तरी वर उल्लेखिलेल्या पूर्वसूरींच्या कार्याच्या पलीकडील ती फार मोठी झेप आहे असं मानण्याचं कारण नाही. म्हैसाळला नुकतेच तुम्ही जाऊन आलात असं वाचलं तेथे श्री. मधुकरराव देवलांनी गेली ७–८ वर्षे खपून जे काम उभं केलं आहे ते आपण डोळ्याखालून घातलं असणारच एक पाणवठ्याच्या खूप पलीकडे तेथील मंडळी गेली आहेत. तेथील हरिजन बांधव अनेक स्पृश्यांच्या घरात थेट चुलीपर्यंत जाऊ शकतात तेथे स्पृश्य अस्पृश्यांना पाणी देत नाहीत, तर अस्पृश्यांच्या नळावर स्पृश्य पाणी भरतात नि अस्पृश्यांच्या हातचे दूधही आनंदाने घेतात याच हरिजनांनी पिकविलेली द्राक्ष पुण्या–मुंबईच्या ग्राहक पंचायतीने मुद्दाम आणवून त्यांची विक्री केली माझ्या माहितीप्रमाणे श्री देवल काय, ग्राहक पंचायतीचे बिंदुमाधव जोशी काय वा मधुकर मंत्री काय, सारे संघाच्या मांडवाखालून गेलेले आहेत.

ज्या मुस्लिम सत्यशोधक समाजाची हमीद दलवाईंनी स्थापना केली, त्या दलवाईंनी संघ–जनसंघाला कधीच परके मानले नाही. काही वर्षांपूर्वी हमीदभाई राज्य विधिमंडळातर्फे राज्यसभेसाठी उभे राहणार होते त्या वेळी जनसंघाच्या सर्व आमदारांनी आपले मत त्यांना देण्याचे ठरविले होते. याची खात्री अनेक माहितगार देऊ शकतील ऑर्गनायझर हे दिल्लीचे संघ-विचाराचे साप्ताहिक. ते हमीदभाईंचे लेख प्रसिद्ध करी. आपल्या ताज्या अंकात त्या साप्ताहिकाने हमीदभाईंना श्रद्धांजली अर्पण केली आहे– 'मूलगामी विचार मांडणारा ध्येयवादी व शैलीदार लेखक.'

संघाच्या प्रेरणेने महाराष्ट्रात तलासरीसारख्या अनेक ठिकाणी आदिवासींसाठी वसतिगृहे चालू आहेत. यात मुलांबरोबर मुलीही असतात. त्यातली काही मुले वसतिगृहाची जबाबदारी चालविण्याएवढी तयार झाली आहेत मध्यप्रदेशात संघाने काही कुष्ठधामेही चालविली आहेत नागभूमीतील शाळांमध्ये शिक्षक म्हणून काम करण्यासाठी संघाचे अनेक तरुण पोहोचले आहेत. बाबा, आपण या गोष्टींना समाज–प्रबोधन मानीत नाही का?

सामाजिक सुधारणा ही कोणा गटाची, पक्षाची मक्तेदारी होऊ

पृष्ठ २२ वर

# जनतेने कौल दिला

## आता कसोटी कार्यकर्त्यांची

वा. दा. रानडे

लोकसभेच्या मागोमाग झालेल्या विधानसभा निवडणुकीत दहापैकी सात राज्यात दोनतृतीयांशापेक्षा अधिक जागा जिंकून जनतापक्षाने आपल्या विजयाची पुनरावृत्ती केली. १९७२ च्या इंदिरा–लाटेच्या निवडणुकातही कॉंग्रेसला फक्त तीनच राज्यात दोनतृतीयांश जागा मिळाल्या होत्या जनतापक्षाच्या या वेळच्या यशाने त्या वेळच्या कॉंग्रेसविजयालाही मागे सारले आहे. पंजाब, हरियाना, हिमाचलप्रदेश, उत्तरप्रदेश, व बिहार या पाच राज्यात लोकसभेची एकही जागा कॉंग्रेसला मिळाली नव्हती. त्यामानाने विधानसभा–निवडणुकात काही थोडया जागा मिळविल्याबद्दल कॉंग्रेसनेते केविलवाणे समाधान व्यक्त करीत आहेत; पण कॉंग्रेसपक्ष पुन्हा सावरण्याची ती सुरुवात आहे असा याचा अर्थ मुळीच लावता येणार नाही. उमेदवाराची यादी निश्चित करण्यास वेळ लागल्याने अनेक ठिकाणी जनतापक्षाच्या अधिकृत उमेदवाराविरुद्ध बडखोर उभे होते त्याचा फायदा कॉंग्रेसला काही ठिकाणी मिळून तिला थोडया जागा मिळाल्या असाव्यात असे दिसते. मतदारसंघवार निकालाचे आकडे उपलब्ध झाल्यावर यासंबंधी अधिक निश्चित स्वरूपाचे विधान करता येईल. मतदानाचे शेकडा प्रमाण, तसेच राजकीय पक्षाना मिळालेली शेकडा मते याचे सर्व राज्याचे आकडेही हा लेख लिहीपर्यंत उपलब्ध नाहीत. लोकसभा–निवडणुकात राजकीय पक्षाच्या पाठिंब्यात काय फरक पडला हे त्याशिवाय निश्चितपणे सागता येणार नाही, पण या विजयामुळे राष्ट्रपति–निवडणुकीत जनतापक्ष व त्याचे मित्रपक्ष याचा उमेदवार निवडून येण्याची शक्यता बरीच वाढली आहे.

मागील ८ निवडणुकाच्या पार्श्वभूमीवर प्रत्येक राज्यात लोकमत कसे बदलले हे पाहायला हवे. पजाब, हरियाना व हिमाचल प्रदेशच्या बाबतीत १९६७ पूर्वीच्या निवडणुका येथे विचारात घेतलेल्या नाहीत. १९६५ मध्ये पजाबची वरील तीन राज्यात विभागणी झाल्यानंतर पहिल्या निवडणुका १९६७ साली झाल्या.

पंजाब विधानसभेत कॉंग्रेसला या वेळी मिळालेल्या १६ जागा १९६७ च्या निवडणुकीपासूनच्या सर्वात कमी जागा आहेत. १९६७ मध्ये ४८, १९६९ मध्ये ३८ याप्रमाणे कॉंग्रेसची होत असलेली घसरगुंडी १९७२ च्या इंदिरा–लाटेत १०४ पैकी ६६ जागा जिंकून तिने सावरली, पण १९७७ मध्ये जागाची सख्या ११७ पर्यंत वाढली असता कॉंग्रेसच्या जागा मात्र ५० नी घटून १६ पर्यंत खाली आल्या. जागांच्या दृष्टीने कॉंग्रेसने सर्वात खालची पातळी गाठली तर अकालीदलाने सर्वांत वरची पातळी गाठली. १९६७ मध्ये अकालीचे दोन्ही गट मिळून २६, १९६९ मध्ये ४३ व १९७२ मध्ये पुन २४ अशा त्याच्या जागा होत्या त्या या वेळी वरपर्यंत वाढत्या निर्णायक बहुमतास फक्त *एक जागा कमी पडली.* जनतापक्षाने यावेळी २४ जागा जिंकल्या. या पक्षात विलीन असलेल्या पूर्वीच्या पक्षाना मिळालेल्या जागा एकत्र केल्या तर १९६७ मध्ये १०, १९६९ मध्ये १२ जागा मिळाल्या, १९७२ मध्ये एकही जागा मिळाली नाही. याचा अर्थ जनतापक्षाच्या रूपाने या पक्षाचे वजन पंजाबमध्ये वाढत असून या वेळी मिळालेल्या २४ जागा हा उच्चांक आहे.

दोन्ही कम्युनिस्ट पक्षांपैकी कॉंग्रेसशी युती करणाऱ्या उजव्या कम्युनिस्टांना ७ तर जनताआघाडीत सहभागी झालेल्या मार्क्सवाद्याना ८ जागा मिळाल्या. उजव्या कम्युनिस्टांना १९६७ मध्ये ५, १९६९ मध्ये ४ आणि १९७२ मध्ये १० जागा मिळाल्या होत्या. या वेळी त्या ७ पर्यंत घटल्या, तरी कॉंग्रेसच्या घसरगुडीच्या मानाने ही घसरगुडी मोठी म्हणता येणार नाही. १९६७ व १९६९ पेक्षा त्याना मिळालेल्या जागा जास्तच आहेत. मार्क्सवाद्याचे बळ १९६७ मध्ये ३, १९६९ मध्ये २ व १९७२ मध्ये १ याप्रमाणे कमी होत गेले होते, पण या वेळी ८ जागा मिळाल्या हे त्याचे सामर्थ्य वाढल्याचे निदर्शक आहे.

हरियानामध्ये ९० पैकी ७५ जागा जनतापक्षाने जिंकल्या. आतापर्यंत एवढया मोठया सख्येने कोणताच पक्ष तेथे निवडून आला नव्हता. जनतापक्षात आता विलीन झालेल्या पक्षाना मिळून १९६७ मध्ये १५, १९६८ मध्ये ७ आणि १९७२ मध्ये अवघ्या २ जागा मिळाल्या. या पार्श्वभूमीवर जनतापक्षाच्या आजच्या ४५ जागा म्हणजे जनमताचा कौल स्पष्टपणे जनतापक्षाकडे झुकल्याचे निदर्शक आहे कॉंग्रेसला १९६७ मध्ये ४८, १९६८ मध्ये ४८ व १९७२ मध्ये ५२ जागा मिळाल्या आणि ५२ वरून आता एकदम ३ पर्यंत ही संख्या घटली. बन्सीलाल राजवटीतील दडपशाही व अत्याचार आणि विरोधी पक्षाची एकजूट ही कॉंग्रेसच्या पराभवाची मुख्य कारणे आहेत. त्यातून वर येणे कॉंग्रेसला फार कठीण जाणार आहे दोन्ही कम्युनिस्टपक्षाना हरियानामध्ये काही स्थान नाही १९६७ पासून एकाही निवडणुकीत एकही जागा त्यानी मिळविलेली नाही. या वेळीही त्यात फरक पडला नाही.

हिमाचलप्रदेश कॉंग्रेसचा सुरक्षित बालेकिल्ला मानला जात होता, पण १९७५ च्या लोकसभा निवडणुकीपासून तो ढासळला आणि विधानसभा–निवडणुकीत त्याचीच पुनरावृत्ती झाली. एकूण ६८ जागांपैकी कॉंग्रेसला फक्त ९ मिळाल्या. यापूर्वी १९६७ मध्ये ३४ व १९७२ मध्ये ५१ जागा कॉंग्रेसने जिंकल्या होत्या. सध्याच्या जनतापक्षातर्गत पक्षाना १९६७ मध्ये ८ व १९७२ मध्ये फक्त ५ जागा मिळाल्या होत्या, पण या वेळी जनतापक्षाने ५३ जागा जिंकून कॉंग्रेसच्या *१९७२ मधील यशालाही मागे सारले.* हिमाचलप्रदेशात उजव्या कम्युनिस्ट पक्षाने १९६७ मध्ये २ जागा जिंकल्या, पण १९७२

पृष्ठ २६ वर

# कलकत्ता मेल

तारा पंडित

कलकत्त्यातील मतदानपर्व सपले. पक्षापक्षाच्या प्रचारार्थ ठिकठिकाणी लटकलेल्या, चिकटलेल्या पोस्टर्सचे क्षणिक आयुष्यही संपले आता त्याचे स्थान केवळ कचऱ्याच्या डब्यात ! ११ जून रोजी मतदान झाले. त्याच दिवसापासून पोस्टर्स काढून टाकण्यास सुरुवातही झाली होती.

लोकसभेची मागची निवडणूक आणि आताची विधानसभेची निवडणूक ह्या दोहोत जेमतेम दोन–तीन महिन्याचे अतर असले तरी दोन्ही वेळच्या वातावरणात महदतर जाणवले त्या वेळी झाडून सारे लोक आपापला मतदानाचा हक्क बजावून गेले होते. तासतास रागेत उभे राहूनही तक्रार करीत नव्हते. ह्याचे कारण जनता-लाट जोराने उसळली होती. त्या धुंदीत सारे लोक वावरत होते. एखाद्या महान उत्सवाचे स्वरूप ह्या महानगरीला तेव्हा प्राप्त झाले होते आणि आज ? त्या वातावरणाचा मागमूसही कुठे दिसत नव्हता. लाट ओसरून गेली होती. ठिकठिकाणच्या मतदानकेंद्रावर शुकशुकाट होता. चार–दोन तुरळक माणसे मतदान करण्यासाठी केंद्राच्या दिशेने जाताना दिसत होती. एरवी मतदानानिमित्त मिळालेल्या सुटीचा उपभोग घेण्यातच लोक अधिक दग असलेले दिसत होते. सिनेमागृहासमोरच्या रागामध्ये अलोट गर्दी होती.

मतदानाच्या बाबतीत लोक एवढे एकाएकी उदासीन का झाले ? लोकसभेच्या वेळचे मतदान ह्या तुलनेत सारखे नजरेसमोर येते आणि म्हणावेसे वाटते की, त्या वेळी झाले ते केवळ 'निगेटिव्ह व्होटिंग.' 'काँग्रेस सत्तेवर नको' हा एकच दृष्टिकोन समोर ठेवून लोकानी मतदान केले होते हे निर्विवाद सत्य होय

ह्या वेळी पश्चिम बंगालमध्ये तिरगी चुरस होती. त्यातही कॉंग्रेस इतर दोहोंच्या मानाने कमी पडण्याची चिन्हे स्पष्टच दिसत होती. त्यामुळे खरी लढत जनता आणि डावे पक्ष याच्यातच होती डाव्या पक्षातही मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे बळ सर्वांत अधिक. ११ जून रोजी कलकत्त्यात मतदान झाले ते काही भागात ६० टक्के तर काही ठिकाणी जेमतेम ३० टक्के. प्रत्येक पक्षाच्या कार्यकर्त्यांमध्ये मात्र उत्साह भरपूर दिसला. आश्चर्याची गोष्ट म्हणजे प्रत्येक पक्ष छातीठोकपणे सागत असे की, आम्हीच जिंकणार म्हणून आणि त्याच वेळी हे सागणारी माणसेच मनात साशंक होत असत. हवा खरोखरच कोणत्या दिशेने वाहणार ते मतदानाच्या खटपाळ नजरेवरून चटकन अजमावणेच कठीण होते.

दक्षिण कलकत्त्यात मार्क्सवादाचे फार प्रस्थ आहे विशेष म्हणजे सर्व बुद्धिमान वर्ग मार्क्सवादी विचारसरणीचा आहे. जादवपूर विद्यापीठातील विद्याविभूषित अध्यापकवर्गाचा पुरेपूर पाठिंबा मार्क्सवाद्यानाच आहे. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षातर्फे (पण अ–पक्षीय म्हणून) उभे असलेले डॉ अशोक मित्र हे अत्यत विद्वान गृहस्थ. फार मोठे अर्थशास्त्रज्ञ एक वेळ भारतसरकारचे ते अर्थनीतीविषयक सल्लागार होते; परंतु लवकरच त्यानी त्या नोकरीचा राजीनामा दिला. दिल्लीच्या School of Economics मध्ये ते काही वर्षे प्राध्यापक होते व सध्या कलकत्त्याच्या Indian Institute of Management ह्या सस्थेत नोकरीला आहेत. ते प्रथमपासूनच डाव्या विचारसरणीचे होते. विद्यार्थ्यांचे फार आवडते. त्यांच्या दोन विद्यार्थिनी त्याच्याकरिता प्रचारार्थ हिंडण्यासाठी म्हणून मुद्दाम दिल्लीहून इथे आल्या होत्या हे त्या मुलींनी स्वत च सांगितले तव्हा आश्चर्यच वाटले. आपल्या प्राध्यापकाविषयी त्या अत्यंत आदराने बोलत होत्या व अशाच लायक व्यक्तीला आपले मौल्यवान मत देण्याचा विचार करून पाहा म्हणून घरोघरी विनवून जात होत्या.

जनता पार्टीचे श्री. अशोक कृष्णदत्त ह्याच्या भेटीचा सुयोग प्राप्त झाला त्या वेळी १७० सीट्स् ( २९४ पैकी ) आम्हाला ( जनता पक्षाला ) मिळणारच असे त्यानी ठासून सागितले. अलीशान बंगल्यातील भव्य हॉलमध्ये ते बसले होते. घराला सगमरवरी फरशी होती. हॉलच्या एका टोकाला स्टेज बनविलेले तेथे नेहमी सगीताच्या मैफिली किंवा नृत्य–नाटयादि कार्यक्रम होत असतात असे कळले. श्री. दत्ताच्या भोवती अनेक लोकाचे वर्तुळ होते. येणारे-जाणारे प्रत्येक वेळी त्यांच्या चरणाना स्पर्श करून बगाली पद्धतीचा नमस्कार करीत होते. तेथील एकदर वातावरण पाहून जरासे खटकलेच. जनता पक्षाचा हा नेता म्हणवीत असेल तर अलीशान बगला–तीनचार गाड्या–सेवेला माणसे–हे सारे त्याला शोभत नाही असे उगाचच वाटले अशोक कृष्ण दत्त ( जनता ) आणि अशोक मित्र ( CPI-M ) ह्या दोहोत साहजिकच मन तुलना करू लागले. लोकानी जनता पक्षाला मत दिले तर हा नेता त्याना जवळचा वाटणार नाही आणि अशोक मित्रसारख्या योग्य व्यक्तीला निवडून द्यायचे म्हटले तर तो आत्मीयता निर्माण करणाऱ्या जनता पक्षाचा नाही. तेव्हा पक्षाला मत देणे अधिक योग्य की लायक व्यक्तीला मत देणे अधिक योग्य असा सभ्रम अनेकाच्या मनात निर्माण झाला.

कलकत्त्यातील ११ तारखेचे मतदान निर्विघ्नपणे पार पडले असे म्हणावयास हरकत नाही; पण ता १४ रोजी मतदानाचे प्रसगी मोठ्या गमतीदार घटना घडल्या. एकूण सरासरी ५० टक्के मतदान झाले; पण त्यातही मुर्शिदाबादसारख्या ठिकाणी ७० टक्के प्रमाण पडले तर जलपायगुरी व बाकुरा येथे ते जेमतेम ४० टक्के होते. या वेळी पोलिसानी आपली ड्यूटी मात्र चोख बजावली व त्याबद्दल गव्हर्नरकडून त्याना जाहीर शाबासकीही मिळाली. १९७२ नतर ही पहिलीच निवडणूक अशी झाली की ज्या वेळी 'रिंगिंग' अजिबात झाले नाही हे कौतुकास्पद होय.

लाबपूर व बोलपूर ह्या विभागातील चार मतदारसघाकडून एकही मत मतपेटीत पडले नाही याचे कारण तेथील लोकाची अशी पक्की खात्री आहे की केवळ मतदानाने त्याचे प्रश्न सुटणार नाहीत व म्हणूनच त्याना मतदान करण्याची इच्छा नव्हती. तसेच उत्तर बरद्वान विभागातील चार मतदानकेंद्राकडे एकही व्यक्ती फिरकली नाही असे का म्हणून चौकशी केली तेव्हा कळले,

की, एक तर त्याना उभा असलेला एकही उमेदवार पसत नव्हता व दुसरे कारण असे की त्याच्या प्रदेशासाठी कोणत्याही विकास-योजना घडवून न आणल्यामुळे निषेध व्यक्त करण्याच्या हेतूने त्यानी मतदान केले नाही. तसेच दुर्गापूरच्या औद्योगिक परिसरातही मतदान समाधानकारक झाले नाही. चिन्सुरा येथे एका मतदानकेंद्रावरच वीज कोसळून एक माणूस ठार व एक पोलिंगऑफिसर जखमी झाल्यामुळे तेथील मतदान स्थगित करण्यात आले व दुसऱ्या दिवशी (ता. १५ ला) घेण्याचे ठरले. कामारपुकूर येथील रामकृष्ण मिशनच्या सन्याशानी मतदान केलेच नाही कृष्णनगर येथे ३६०० लोकानी मतदानावर बहिष्कार टाकला. त्याच्या विभागात शाळा स्थापन करणे व पाण्यासाठी ट्यूबवेल्सची व्यवस्था करणे ह्या मागण्या पूर्ण झाल्या नाहीत, हीच मतदानावर बहिष्कार टाकण्याची मुख्य कारणे होत. यावरून काय दिसते? भारतीय मतदाराचे चित्र पार बदलून गेले आहे. अत्यत मागासलेला व अज्ञ म्हणून जगभर जो बदनाम होता तो ह्या निवडणुकाचे वेळी फार मोठा विचारशील व परिपक्व म्हणून प्रसिद्ध झाला आहे.

मतदान करण्याची नियोजित वेळ सपताच मतमोजणीला सुरुवात झाली. सर्वांचे डोळे निकालाकडे लागले. ता. १४ च्या सायकाळ-पासूनच निकाल जाहीर होण्यास सुरुवातही झाली आणि सपूर्ण रात्रभर तासाभराच्या अंतराने रेडिओवर इलेक्शनन्यूज जाहीर होत होती. तशी अगोदरही लोकामध्ये बोलणी चालूच होती. त्या सर्वांतून एकच निष्कर्ष निघत होता की, येथे C. P. M चा विलक्षण प्रभाव दिसून येतो आणि हे अदाज खरे ठरू लागले. मार्क्सवाद्यांबद्दल जिव्हाळा बाळगणारे तर छाती फुगवून म्हणतच असत की, विजय त्यांचाच; पण ह्या पक्षाबद्दल आस्था नसलेलेही हताशपणे म्हणत–काय करणार, सी. पी. एम. चे वर्चस्व भयंकर आहे. त्यामुळे त्याच्या हाती सत्ता जाणे अटळ आहे. ते majority करणारच; पण परिणाम मात्र चांगला होणार नाही. असे म्हणणाराना आता जुन्या कटु अनुभवाची पुनरावृत्ती होणार म्हणून धाक वाटू लागला आहे. ते तर सरळ म्हणताततच–ह्या मार्क्स-वाद्यांनी चागले वागण्याची कितीही आश्वासने दिली तरी शेवटी ते आपल्या स्वभावावरच जाणार! त्याना करायचा तो उतमात केल्याशिवाय ते सोडणार आहेत होय? कोणी म्हणतात–अस्थिरता ही आम्हा बगाल्याच्या स्वभावातच रुजली आहे त्याला काय करणार? आता निवडणुकीनंतर पुन्हा अस्थिरता माजली तर तिला तोड द्यायला आम्ही सज्ज होऊ. इतर आणखी काही लोक म्हणतात–फार नाचताहेत हे मार्क्सवादी कम्युनिस्ट! एकदाची सत्ता गिळकृत केली आणि राज्यात धुमाकूळ माजवला म्हणजे याचा जीव शात होईल. होऊ देच एकदा त्याचे समाधान! पुढचे भवितव्य दिसतेच आहे, अराजक माजणे... मग गव्हर्नर्स रूल...एकदा पुरते बदनाम झाले की मग पुन्हा डोक वर काढायचे नाहीत हे सी. पी. एम. वाले. आणखी काही म्हणतात–पी. सी. सेन ह्यानी डाव्याबरोबरच्या वाटाघाटी यशस्वी केल्या असत्या तर आज उभे राहिलेले सकट सर्वतोपरी टळले असते.

आश्चर्याची गोष्ट अशी की, प्रचार-सभामधून जनता पक्षाने डाव्यांवर जेवढा टीकेचा भडिमार केला त्यामानाने डाव्या पक्षानी जनता पक्षाबद्दल फारच सौम्य तक्रारी केल्या होत्या. म्हणूनच सीटस् ॲडजस्टमेंटच्या दृष्टीने जनता पक्ष व डावे गट याच्यामध्ये समझोता व्हावा म्हणून मधु लिमये यानी दोन वेळा प्रयत्न केला होता. मार्क्सवाद्याशी हातमिळवणी करणे अत्यंत आवश्यक असल्याचे केंद्र सरकारने अचूक ओळखले होते, पण प्रफुल्लचद्र सेन ह्यानी आपल्या हट्टापायी ते मानले नाही. ज्योती बसूचा ते उघड उघड द्वेष करीत होते हे चागले झाले नाही. आज त्यामुळेच त्याना कोठेही स्थान उरले नाही. त्या वेळच्या वाटाघाटी यशस्वी झाल्या असत्या तर आजचे पश्चिम बगालचे राजकीय चित्र बरेचसे बदललेले आढळले असते हे निश्चित.

कलकत्त्यापेक्षा उपनगरामध्ये डाव्या पक्षाचे वर्चस्व अधिक जोरदार असले तरी खास कलकत्त्यातही त्याना बरेच उचलून धरले गेले. दक्षिण कलकत्त्यात डॉ. अशोक मित्र ह्या स्वतत्र पण मार्क्सवाद्यातर्फे उभ्या असलेल्या उमेदवाराने जनतापक्षाचे श्री. अशोक मुखर्जी व कॉंग्रेसचे श्री. लक्ष्मीकात बसु याचा जोरदार पराजय केला. चौरगीवरून कॉंग्रेसच्या तिकिटावर उभे असलेल्या डॉ पी. बी. मुखर्जी ह्या कलकत्ता हायकोर्टाच्या भूतपूर्व न्यायमूर्तींना संदीप दास नावाच्या, त्याच्या मानाने सामान्य असलेल्या जनतापक्षाच्या उमेदवाराने पाडले ही लक्षात घेण्यासारखी गोष्ट होय. ह्यावरून एकच दिसते– सर्वसाधारण जनता ही अत्यत डोळस आहे. प्रतिष्ठा, मानसन्मान, हुद्दे व ऐश्वर्य ह्या कशाच्याही प्रभावाने तुम्ही तिला जिंकू शकत नाही.

एवढ्यात लक्ष वेधून घेणारी एक नवीच हालचाल सुरू झाल्याचे कळते. नक्षलवादी हे मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षात सामील होण्याचा विचार करीत असून तेही नक्षल-वाद्याना आपल्यात परत घ्यायला तयार असल्याचे निदर्शनास आले. कारण सी. पी. एम्. तर्फे नुकतेच निवडून आलेले अर्थशास्त्रज्ञ डॉ. अशोक मित्र हे कानू सन्याल– असीम चाटर्जी– जगल सथाल आदी नक्षलनेत्यांना नुकतेच भेटले असून त्यानी ह्या लोकाना आश्वासन दिले की सी. पी. एम्. मध्ये सामील झाल्यानतर तुम्हाला तुमची प्रतिष्ठा कायम ठेवण्याची मुभा राहील. तसेच श्री सत्यनारायण सिन्हाच्या ग्रुपलाही श्री. अशोक मित्र भेटले. त्याचेही फारसे मतभेद आढळले नाहीत.

थोडक्यात, नक्षलवाद्याना बंगालच्या राजकीय रगभूमीवर पदार्पण करण्याची इच्छा आहे, पण त्याचे आपापसात इतके तुकडे तुकडे झाले आहेत की ते सारे एकत्र साधता येणे अत्यत कठीण आहे; परंतु तेच जर सी. पी. एम्. च्या माडवाखाली एकत्र आले तर कदाचित तेही शक्य होईल. श्री. सत्यनारायण सिन्हानी आपले तीन उमेदवार उभे केले (जे अजूनही अटकेत आहेत) व त्यापैकी सतोष राणा हा नक्षल-उमेदवार निवडूनही आला आहे. ह्या सर्व विभक्त झालेल्या नक्षलवादी गटाचे एका मुद्द्यावर मात्र एकमत आहे कै. चारु मजुमदारच्या नेतृत्वाला मानणारी नक्षलवादी विचारसरणी त्या कोणालाच पसंत नाही.

अखिल भारतीय विद्यार्थी सघटनेची मार्क्सवादी शाखाही एकदम जागरूक झाली आहे व राज्यात सर्वत्र शातता राखण्याचे कामी तिने सर्व विद्यार्थ्यांना आवाहन केले आहे. ☐

# खेड्यापाड्यांत, डोंगरदऱ्यांत असे राघव अनेक भेटतात–

दादा शिंदे

हल्ली गावाकड वारंवार जाणं होत नाही. चैत्री यात्रेला गेलो की सर्वांचा समाचार घ्यावा लागतो. लेकुरवाळे झालेले सवगडी, शेतकरीमित्र यांच्यात मिसळून गेलं की, दिवस भर्रकन निघून जातात. यदाही जाणं झालं होतं.

सोमवारचा दिवस असेल दिवस मावळतीला लागला होता. मागुबाच्या मळ्यात, धारदला भेटण्यासाठी मी चाललो होतो. सोनडगरीची चढण चढत होतो. दिवसभरच्या कष्टानंतर घराकड परतणाऱ्या माणसाची वर्दळ कमी झाली होती. मी समोर पाहिलं, माझा डोळ्यावर विश्वास बसेना. राघव समोरून भेलकडत येत होता हातवारे करीत होता त्याचा मित्र रमेश त्याला कसाबसा आवरत होता. मी जवळ गेलो. गावठी दारूचा उग्र वास नाकात शिरला. म्हणजे राघव दारू पिऊन आला होता त्याचा स्वत-वरचा तावा सुटला होता त्या वेळी त्याच्याशी बोलण्यात मतलब नव्हता त्या अवस्थेतही त्यान मला ओळखलं म्हणाला, 'काय दादा, कधी आला?' पण पुढे बोलायला त्याची जीभ वळली नाही. रमेशच्या अंगावर कोसळला रमेशला मी सांगितलं, 'त्याला नीट घरी घेऊन जा!'

डगर पार करताना माझं मन भरकटलं होत एक विचार सारखा डोकावत होता. 'राघवची स्थिती अशी का झाली? एक पदवीधर तरुण दारूच्या आहारी का गेला? राघव हा सालस नि सुस्वभावी मुलगा. कधी कुणाशी भांडण नाही की अरेरावी नाही. माझ्या घरापासून चार घरं सोडली की त्याच घर लागत. आई-वडील मोलमजुरी करून पोट भरायचे. 'दोन घास कमी खायला मिळाले तरी हरकत नाही; पण माझ्या राघवला मी शाळा शिकवणार' अशी त्याच्या वडिलाची जिद्द! राघवनेही त्याच्य कष्टाचे चीज केले. त्याचा वर्गात नेहमी पहिला नंबर असायचा. इंग्रजी शाळेत गेल्यावर त्याला शिष्यवृत्ती मिळाली. पुढ कॉलेजातही घातल. माझ्यापेक्षा दोन इयत्तानी मागे. दरवर्षी नियमाने पुस्तकं मागण्यासाठी यायचा. अभ्यासातील शंका आवर्जून विचारायचा. चर्चा करताना बाजू व्यवस्थित मांडायचा. असा हा राघव कॉलेजमध्येही चमकला. निबंधस्पर्धा, वक्तृत्वस्पर्धा यात त्याने बक्षिस पटकावली; पण आज मी त्याचं वेगळच रूप पाहिलं होतं मनास बोचणी लागली होती, जाणून घ्यायला हवं. राघव दारू का पितो? असं काय घडलंय?

दुसऱ्या दिवशी सकाळीच बाहेर पडलो राघवला भेटण्याच्या इराद्याने कुठे भेटेल हा प्रश्नच होता कदाचित जितोबामदिराच्या गाभाऱ्यात बसला असेल. फावल्या वेळी मुलाचं बसण्याच हेच ठिकाण. पाय मदिराकडे वळले. गाभाऱ्याच्या अनेक आठवणी मनात दाटल्या–

खिसा भरून आणलेल्या चिंचा बोरं याचा फडशा तिथंच गाभाऱ्यात बसून आम्ही पाडत असू मधली सुट्टी झाली की आमचा टारगट कंपू गाभाऱ्याकडे धूम ठोकायचा. शाळेत येताना मळ्यातून पळवलेल्या कैऱ्या, रायबोर, तर कधीकधी नदीकाठावर जाऊन डल्ला मारून आणलेली कलिंगड, टरबुज हा सगळा मालमसाला गाभाऱ्यातील ढेलज्यात लपवून ठेवायचं काम वश्या नि सर्ज्या अगदी इमानेइतबारे करायचे.

लहानपणचा हा चलच्चित्रपट डोळ्यासमोरून सरकत असतानाच मी गाभाऱ्यात प्रवेश केला. अपेक्षेप्रमाणे राघव खांबाला टेकून बसला होता. त्याची माझी दृष्टादृष्ट झाली; पण डोळ्यास डोळा देण्याचे धाडस त्याला झाले नाही. मी जवळ गलो. खांद्यावर हात ठेवला. त्याच्या तोंडातून शब्द फुटत नव्हते, पण त्याच्या डोळ्यात तरळलेले अश्रू खूप्स बोलत होते हळूहळू गप्पाना सुरुवात झाली इकडच्या तिकडच्या गप्पा झाल्या. संभाषणाच्या ओघात मी मुख्य विषयाला हात घातला. त्याला विचारले, 'तू इतका शिकलेला मुलगा, मग या दारूच्या नादी का लागलास?' एकदम स्तब्ध झाला तो. हुंदका कसाबसा दाबीत हलक्या आवाजात बोलू लागला.

'काय सांगायचं या बेकारीमुळे वैतागलो. तोंड दडवाय जागा नाही किती स्वप्नं उराशी बाळगली होती मी भावी आयुष्याबद्दल, पण सर्वांचा चक्काचूर झाला. दु खाच्या भरात दारूला स्पर्श केला. दुःख कमी होत भासलं. पुढ बाटली कायमची हातात आली. न सोसवणार दु.ख दारूच्या घोटात बुडवू लागलो लाज वाटते स्वत.ची पण उमगत नाही जीवनाची अशी कोंडी का झाली?'

'तुम्ही तर जाणताच मी कसे शिक्षण घेतले. आई-बाबानी रक्ताचे पाणी करून मला शिकवलं. सात मैलावर कॉलेजसाठी मी रोज पायी जायचे. मार्कसही चागले मिळाले. हायर सेकंड क्लासमध्ये बी ए. झालो एक शर्ट नि एकच विजार यावर दिवस काढले बी. ए च्या पुढ शिक्षण करणं शक्य नव्हत. नोकरीसाठी अर्ज करण्यास सुरुवात केली आज चार वर्षं झाली शेकडो अर्ज केले; पण एकदाही डिग्रीन हात दिला नाही वशिल्यासाठी छोट्यामोठ्या पुढाऱ्याचे अनेकदा उंबरठे झिजविले.

'तालुक्यात दोन साखरकारखाने, अनेक जिनिंग फॅक्टऱ्या पण प्रत्येक ठिकाणी नात्यागोत्याच्या लोकाचा कारभार! चेअरमचा भाचा, मेहुणा, जावई याची चलती. तिथ डिग्रीला किमत नाही. मार्कांची गरज नाही. फक्त वशिला ही खास गुणवत्ता फार कटू अनुभव आले या चार वर्षात. गरिबी हटविण्याचे भाषण करणारा पुढारी प्रत्यक्षात 'गरिबी ही दैवाची देणगी आहे, त्याला काय करणार?' अशा मानभावी शब्दात अवहेलना करतो शाळेत म्हणतात बी. एड. असल्याशिवाय कस घेणार? बी. एड. करणं मला शक्य नाही.

'आई-बाबा खूप थकलेत. त्याच्यान काम

होत नाही. बसून खायचे त्यांचे हे दिवस. चार पैसे मिळवून त्यांना पोसावं असं खूप वाटतं; पण काय करू? आज कुठं दोन रुपये सुद्धा मी मिळवू शकत नाही चार–पाच वेळा पुण्यामुंबईला मुलाखतीसाठी गेलो. बस-प्रवासासाठी माझ्याजवळ पैसे नव्हते. कर्ज काढून मोठ्या आशेने गेलो. मुलाखतही चांगली झाली; पण घोडं कुठं अडलं कळलं नाही. नेहमी असंच होत राहिलं. आशेवर किती दिवस ढकलायचे? आता कर्जही कुणी देत नाही. घालायला कपडे नाहीत. घरात चटणी–भाकरीची पंचाईत झालीय.'

'आता नवीनच एक समस्या पुढे उभी राहिली. नोकरीसाठी अर्जच करता येत नाही. कारण वय संपलं. मला पंचविसावं संपून सव्विसावं लागलं. नोकरीसाठी जास्तीत जास्त पंचवीस वय लागत. सगळीच आशा मावळली. रोजगारहमीच्या कामावर मजुरीचं काम केल. पुढं शेतमजुरीही केली; पण ती सुद्धा कायम लागत नाही शेजारी-पाजारी म्हणतात. 'काय केलं शिकून? आई-वडिलाना घोड झालाय?' कोणी म्हणत, छोटासा धंदा काढावा. सरकार किंवा बँक मदत करील. खरं आहे, धंद्यासाठी बँक कर्ज देईल, पण धंदा उभारण्यासाठी स्वतःचं पंधरा टक्के भाडवल लागत, त्याशिवाय बँक पैसे देण्यास धजावत नाही. आज माझ्याजवळ दिडकी नाही मग कसं जमवणार भांडवल? मार्ग सापडेना, डोकं सुन्न झालय. अगदी असह्य होतय.'

'रोज संध्याकाळी मळशीला जातो. तास-दोन तास कंजारभटाला दारू काढण्यास मदत केली की तो पहिल्या धारेची पुढे करतो. चार तास झकास जातात. पुनः मग तीच दुःखाची टोचणी. मनाची अस्वस्थता, दिवस मावळतीला लागताच आपोआप पाय मळशीकडे वळतात.'

'मी असा का वागतो हे मलाच कळत नाही. दादा, तुम्हीच सागा या बेकारीच्या चक्रातून कसा बाहेर पडू? नोकरीसाठी कुणाचे पाय धरू?'

निरुत्तर होऊन मी गाभाऱ्यातून बाहेर पडलो बेकारीमुळे बाहेर पडलेला फूत्कार भयानक होता. तो उद्रेक तरुणाचं कोमल मन, आशाआकाक्षा याची जाळून राख करीत होता. खेड्यापाड्यावर डोंगरदऱ्यात असे राघव अनेक भेटतात. जिवाचं रान करून शिकलेले पण बेकारीमुळं वैराग उदासवाणं जीवन जगत असलेले! राघवाची कोंडी कोणी फोडायची? समाजाने, सरकारने की आणखी कुणी? □

---


**यंदाची महाराष्ट्र शासनाची पारितोषिके लाभलेली**

**दोन 'राजहंस' प्रकाशने**

# टॉलस्टॉय एक माणूस

**सुमती देवस्थळे**

# श्रीग्रामायन

**श्री. ग. माजगावकर**

**या दोन्ही पुस्तकांच्या नवीन आवृत्त्या लवकरच प्रकाशित होत आहेत.**

राजहंस प्रकाशन । १०२५ सदाशिव, पुणे ४११ ०३०

'जागा झालेला संथाळ' हा लेखिकेचा या विषयावरील पहिला लेख माणूस ७ जून १९७५ या अंकात प्रसिद्ध झाला होता.

# संथाळांमध्ये पुन्हा फेरफटका

गीता साने

जूनचा पहिला आठवडा संपला. मृग लागले; पण यंदा पावसाचा रंग अजून तरी नाही सूर्य पूर्ण तेजाने सकाळपासुन दुपारी ३ वाजेतो तळपतो. नंतर थोडे पाऊरके–काळसर ढग येतात. ऊन्ह कमी होते; पण वारा पडतो, सारखा घाम येऊन जीव अधिकच कासावीस होऊ लागतो. अशा वेळी टुडीच्या खेडोपाडी जरूर तेथे पाऊलवाटा विचारीत हिंडणे हे एक साहसच; पण ते करणे अवश्य होते. त्यातून ५–६ जूनला थोडे बादळ झाले. पाऊस न पडला तरी थोडे तुषार आले. त्यामुळे मनाला धीर आला. 'उन्हातान्हात खेड्यांतून हिंडायला आपण आता पोरे नाही. जायचे तर गाडी घेऊन जा !' असा निर्वाणीचा आदेश मिळाल्यावर तर भ्रमती बरीच सोपी झाली.

नऊ तारखेला सकाळी साडेसातलाच आम्ही घरातून बाहेर पडलो. बरोबर सात वर्षांची चित्रा, चालावे लागले तर हातात लाठी, वाट सांगायला दिगम मरंडी व प्यावयास गॅलनभर पाणी अशा थाटात आम्ही निघालो होतो. आम्हाला 'बैसी'ची माहिती काढायची होती. बैसी ह्या संथाळाच्या समाज–एकात्म राखणाऱ्या परपरागत पंचायती. भारताच्या इतर जाती-पंचायतीप्रमाणे त्याही काळाच्या उदरात सामावलेल्या; पण शिबू सोरेन त्या संथाळ–पुढाऱ्याने, त्याना पुन्हा नवा प्राण देण्याचे प्रयत्न केले. कुठे–कुठे त्या थोड्या नव्या स्वरूपात उमलल्या व काही महत्त्वाची कार्ये त्यानी साधली.

१९७६ मध्ये शिबू सोरेन मिसाखाली बंदी झाले व बाहेरच्या राजकारणाला परिचित नसलेला, वेळेवर कोणतेही मार्गदर्शन उपलब्ध नसलेला हा तरुण इंदिराबाईंच्या वीस सूत्री कार्यक्रमावर सही करून सुटून आला. जनतेत त्याचे तेज लोपले. संथाळ समाजातही त्याची प्रतिष्ठा कमी झाली. त्याने सुरू केलेल्या विविध activities थाबत गेल्या. 'बैसी' ही त्यापैकीच एक.

धनबादहून निघण्यापूर्वी बैसी कुठे–कुठे अजून कार्य करते आहे, हे मी दिगम मरंडीला विचारले होते व त्याच्या माहितीप्रमाणे टुंडीच्या ब्लॉकमध्ये जाताखूंटा, डडाडीह ही दोन खेडी नजरेखाली घालून, शिबूजीचा पोखरियाचा आश्रम पाहून परत फिरावयाचे ठरविले होते. खेड्यातले रस्ते व अबोल माणसे दोन्हीचा विचार करता, 'सध्याकाळी ६ वाजेपर्यंत परत येईन' असे मी म्हटले होते

वारा पडलेला असला तरी सकाळ थंड होती. त्यामुळे मोटारमध्ये छान वाटत होते. उद्या टुंडी क्षेत्रामधली निवडणूक. त्यामुळे विविध निशाणे लावलेल्या– (येथे आठ उमेदवार उभे आहेत) जीप्स व 'इलेक्शन–ड्यूटी'चे कागद चिकटवलेले ट्रक्स, जीप्स जागोजाग भेटत होते.

टुंडी ओलांडून आणखी पाच मैलावरच्या शिबूजीच्या पोखरिया आश्रमात आम्ही ९ च्या थोडे आधीच पोचलो. शिबूजी निवडणुकीला उभे असल्याने बाहेर जाण्याच्या तयारीत होते. माझ्याजवळ जरा वेळ थाबून काही माहिती देऊन ते बाहेर गेले, नतर तिथे काम करीत असलेल्या कार्यकर्त्यांशी व आश्रमात पाहुणे असलेल्या श्री. केदारनाथ शर्मा ह्यासाठी पार केलेल्या जुन्या फॉरवर्ड ब्लॉकवाल्या गृहस्थाशी बोलून माहिती मिळाली. पोखरियाला बैसी नाही हे समजल्यावर मी इतर प्रश्न विचारले.

ह्या आश्रमाला सरकारकडून एक ट्रॅक्टर, पधरा–सोळा डिझेल-पप व एक विजेवर चालणारा पंप अशी दोन लाखाची मशिनरी मिळालेली आहे व्हाइट लेग हॉर्न जातीची दोनशे पिले मिळाली होती; पण सरकारी मार्गदर्शनाखाली बाधलेले कोंबड्याचे खुराडे मात्र आज रिकामे पडलेले आहे ऑस्ट्रेलियन जातीची चार डुकरेही मिळाली होती त्यापैकी दोन मेली व दोन आश्रमात उन्हाळ्याने सत्रस्त लोळत होती.

ही जनावरे व पाखरे मरण्याचे कारण त्याना लागणारा फीड बाहेरून आणावा लागतो व तो परवडत नाही. इजेक्शने देणेही परवडत नाही; त्यामुळे कोंबड्या हाती लागल्या नाहीत

यत्राची चौकशी करता ट्रॅक्टर सेहतीस हॉ. पॉ.चा असून ताशी एक लिटर डिझेल त्याला लागते व त्याचा खर्च १–५० रु येतो. ट्रॅक्टरचे फायदे . ट्रॅक्टरने चार तासात एक एकर जमीन चारदा नागरून, पेरा करायला तयार होते व जमीन एकवीस इंच खोल खोदून मोकळी होते. हेच काम साध्या नागराने केल्यास दोन नागराचे तीन दिवस व तीन नागराचा एक दिवस जातो. जमीनही तीन–चार इंचच मोकळी होते. प्रत्येक नागराचा खर्च रोज रु पाच, म्हणजे सगळ्या कामाचा खर्च सरासरी पचेचाळीस रुपये येतो. उलट ट्रॅक्टरने हा खर्च सहा रुपये येतो व काम ३९ रुपयांनी स्वस्त पडते.

मी पुढचा प्रश्न केला, 'ह्या ट्रॅक्टरची किंमत काय आहे ?'

'रु. ८०,०००|–'

ह्या तुम्हाला सरकारने कर्जाऊ दिला आहे का अनुदानात ?'

'कर्जाऊ.'

'त्या पैशावर व्याज किती द्यावे लागते ? शेकडा दहा ?'

'शेकडा चौदा आकारतात म्हणे' केदारनाथ.

'किती हप्त्यात फेडावयाचे आहे ?' ह्याचे उत्तर कोणाजवळ नसल्याने मी साधारणत वीस हप्ते पडतील असा अंदाज केला. त्याशिवाय मोबील–तेल, रिपेअर सर्व धरून खर्च वर्षाला निदान १००० रु तरी येईलच. ह्या सर्व गोष्टी विचारात घेता ट्रॅक्टरचा वार्षिक खर्च ११,२०० रु. व्याज, ४००० रु हप्ता व १००० रु. रिपेअर म्हणजे १६,००० रु. तरी येईल ट्रॅक्टरने निदान ४०० एकर जमीन नागरली, तर बचत झालेल्या पैशातून वरील खर्च करता येईल; पण इथल्या डोंगराळ जमिनीत सलग जमीन फार थोडी; आहे त्या शेतीचेही तुकडे पडलेले. अशा स्थितीत वर्षाचे रु. १५,००० रु. मोठ्या प्रमाणावर अंगावरच पडणार हे उघड आहे. त्याचे उत्तर

ट्रॅक्टर स्वच्छ करणाऱ्या तरुणाने दिले. 'सरकारी पैसा, परत करतो कोण ?' आपल्या खेड्याची विचारसरणी ही अशी आहे.

एका, जरा समजूतदार माणसाला मी म्हटले, 'ह्यापेक्षा, ट्रॅक्टर-ऐवजी, जुने लाकडाचा फाळ असणारे नांगर सोडून लोखंडी फाळाचे नागर घ्या. ते परवडतील व जमीन खोलवर खोदली जाईल. पैसा मजुरीच्या रूपाने खेड्यातच राहील.'

त्याने ठरलेली उत्तरे दिली 'प्रदेश फार गरीब आहे. आमच्या बैलांना आम्ही खायला घालू शकत नाही. त्यामुळे त्याना लोखंडी नागर ओढण्याची ताकद नाही. चांगले बैल, योग्य त्या वैरणीच्या अभावी जगवता येत नाहीत. ट्रॅक्टर आम्हाला त्यापेक्षा स्वस्त पडतो.'

ट्रॅक्टर स्वस्त पडतो खराच : पण सरकारी एक लाख रुपये बुडवून ! ही मशिनरी फार तर १५-२० वर्षे काम देईल. ती 'फुकट' असल्याने तिचा पूर्ण उपयोग केला जाणार नाही 'फुकट' मिळालेल्या पपाना आजच पाय फुटले असून, काही पप-सेट्स् टुंडी-बाहेर गेल्याच्या तक्रारीही नतर माझ्या कानी आल्या. आपल्या शेतीत पैसा गुंतवण्याच्या कल्पना अशाच व्यवहारात उतरणार असतील तर नवे सरकार दक्ष न राहिल्यास, वरील पायडा बदलणार नाही. कारण खालच्या थरावरच्या सरकारी अधिकाऱ्याना, शेतीत पैसा गुतविणे ह्याचा एकच अर्थ समजतो-ट्रॅक्टर्स, पप-सेट्स् इत्यादि महाग मशिनरी देणे. खेडोपाडी वीज देण्याचे सरकारी प्रकल्प वरील अधिकाऱ्याच्या कल्पनेला पाठिंबाच देत असतात.

साडेदहाला आम्ही चहा घेऊन पोखरिया सोडले. मरडी प्रदेशात हिंडलेला, पण पायी, म्हणून पाऊलवाटा त्याच्या ओळखीच्या इथून पुढे रस्ते असे आढळलेच नाहीत. गाडीवाही केव्हा तरी अदृश्य होत. त्यामुळे अनेकदा मरडी व ड्रायव्हर जगन्नाथ खाली उतरून रस्ता पाहू लागत व मग पुन्हा वाटचाल सुरू होई असेच आम्ही मछियाराला पोचलो येथील नव्वद घरांची वस्ती सरमिसळ होती. त्यांत सथाळाप्रमाणेच तुरी व कोल हे आदिवासी, गोसाई-हे वाणी तर रविदास हे अस्पृश्य व मुसलमान-घरे होती. कोलांजवळ जमीन मुळीच नसल्याने, मिळेल ती मजुरी व जगलामधील मोहाची फुले, फळे इत्यादि वस्तूवर त्याची गुजराण होते. बैंशी येथे कधी नव्हतीच, त्यामुळे भर इतर प्रश्नावर द्यावा लागला.

पिण्याच्या पाण्यासाठी ओहोळाच्या पात्रात शेवड्या खणलेल्या. त्या मात्र सुकत नाहीत. त्याना इकडे डाढी-क्षरना असे म्हणतात.

'ऋण-मुक्ती व आदिवासी जमिनी परत देण्याचे कायदे जनता सरकार आल्यावर रद्द झाले.' असा प्रचार टुडी विभागात कुठे-कुठे होत होता. तसा प्रचार मछियाराला नाही. इथला एक-मात्र सावकार, एक 'गोसाई' गृहस्थ बाहेरून कमी व्याजाने पैसे आणून, जास्त व्याजाने कर्जाऊ देऊन गुजराण करीत असे. त्याचा धंदा बसला. आता तो तयार कपडे विकून थोडे पैसे मिळवीत आहे.

मछियारा सोडून आम्ही अखेर उडार्टांड येथे पोचलो तो बारा वाजून गेले होते. येथील वस्तीही नव्वद घराची. त्यात मुख्यत्वे संथाळाचा भरणा. काही महतो ( कुणबी ) व काही बुरुड व तेली उबरठेही आहेत. शाळा पाचवीपर्यंत असून, मुलाप्रमाणेच बऱ्याच मुलीही शाळेला जातात. कारला वेढा घालणारी मुले पाहूनच, शिक्षणाचा प्रचार स्पष्ट होत होता.

खेड्याच्या सरपंचाशी बोलणे झाले. बैंशी ह्या खेड्यात नव्हती. पिण्याच्या पाण्यासाठी एक विहीर होती. शिवाय 'डाढी.' ऋणमुक्ती व जमिनीची स्थिती पूर्ववत् होती; पण गहाण ठेवलेल्या वस्तू फारशा परत मिळाल्या नाहीत, 'बहुत सारा पच गया.' लोकाना शिक्षणाचे महत्त्व वाटते असे ध्यानात आल्याने, त्याबद्दल प्रश्न विचारले.

'मुलाना शिक्षण देण्याचा काय उपयोग समजता ?' 'त्याचे जीवन सुकर होते. बाहेरच्या जगात काय चालले आहे ते वर्तमानपत्रांत वाचता येते...'

जीवन सुकर होते म्हणज काय ? मुले आठवी पास झाली म्हणजे त्यांनी धनबादला जाऊन खाणीत काम मिळवावे नाही तर कोर्टात चपराशाचे काम त्याना देण्यात यावे, असेच ना ?.. ......'चार-दोन मुले शिकतील तोवर ही मागणी पूर्ण करताही येईल, पण उद्या सगळ्याच मुलांना शाळेत पाठविणे आवश्यक झाले आणि सर्वच 'आठवी पास'चे सर्टिफिकेट मिळवू लागली तर त्याना बाहेर काम मिळेल काय ? "

'मग मुलांना काय शिकवावे असे वाटते ?' बऱ्याच विचारान्ती सरपंच म्हणाला, 'आम्ही शेतकरी चासा लोक. आमची मुले शेतीतच काम करणार तेव्हा शेती सुधारता येईल असे'शिक्षण आमच्या मुलांना पाहिजे ' नवीन शिक्षणाबद्दल इतकी चर्चा वृत्तपत्रात चालू असताना, पालकाना ह्याची काहीच माहिती नाही त्याचे मत कोणी विचारलेलेही नाही. त्यामुळे वरील मत मला स्वतंत्र व म्हणून बहुमोल वाटले.

आम्ही जाता-खूंटा येथे पोचलो तो साडेबारा होऊन गेले होते. उन्हे तडाख्याची होती. सरपंचाच्या दारामधल्या देवडीवर थोडा विसावा घेतला, कारण त्याची जेवणे होत होती.

जाता-खूंटाचे वातावरण बरेचसे कुंद वाटले. येथे पूर्वी बरीच कामे होत होती. सामूहिक शेती व धान्य साठविणारा ग्रेनगोला, रात्रिपाठशाला, बैंशी, सामूहिक पशुपालनाची इमारत उभी राहिली होती. आज ह्या कामापैकी काहीही उरलेले नाही. मी ज्याच्याशी बोलत होते तो एक तरुण अध्यापक गेले दीड वर्षे येथे अध्यापन करतो आहे. त्याला माझ्या कामाबद्दलची परिभाषाही समजत नव्हती. तेव्हा मी शाळेची चौकशी केली. इथली शाळा तिसऱ्या वर्गापर्यंतच होती. मास्टर ट्रेंड असल्यामुळे नवीन ('१० + २ + ३') शिक्षापद्धती त्याच्या शाळेला लागू होणार आहे का ? असा प्रश्न मी विचारला. 'लागू हो गयी है,' मला उत्तर मिळाले. म्हणजे काय फरक झाला ? आता वर्गांना 'नई पहली, नई दूसरी और तीसरी कहना है.' अभ्यासात काय फरक ? अजून काही नाही, नवी पाठ्यपुस्तके आलेली नाहीत. वर्क-एक्सपीरियन्स हा शब्द तर त्याने ऐकलेलाच नव्हता; पण मुलांकडून काम करवून घ्यावयाचे आहे हेही त्याला माहीत नव्हते. परिस्थिती अशीच राहिली तर नई तालीमच्याच मार्गाने 'नवीन शिक्षाप्रणाली'ची दुर्गती होणार हे स्पष्ट होते.

मास्तराशी बोलत असतानाच मडळींची जेवणे संपली व आम्ही आत गेलो. जेवायच्या वेळेचा पाहुणा न जेवता जाऊ देणे त्याच्या ग्रामीण मनाला पटत नव्हते. संथालीत 'जेवणार ना ?' अशी पृच्छा झाली-म्हणजे 'मी त्याच्या घरी जेवणार ना ?' असा प्रश्न होता. वेळ भुकेची होती. चित्रा बरोबर होती; पण अन्नाच्या लोभात पडल्यास इथेच संध्याकाळ होईल म्हणून मी बोलले नाही.

इथल्या बैंशीचा सभापती व सेक्रेटरी बाप-लेक होते. बाप म्हातारपणामुळे बहिरा झालेला आहे. तेव्हा मी मुलाशी बोलत होते. त्याचा एक चुलतभाऊ त्याच्या मदतीला होता. मी प्रश्न विचारीत होते; पण सर्व उत्तराना टाळाटाळ होत होती. 'चाललेच आहे; होतेच आहे,' अशी भाषा येत होती. शेवटी मी भोवताली

बसलेल्या बघ्याना—त्यात मास्तरही होता—तेथून जावयास सागितले. इतर मडळी गेल्यावर मरंडीनेही सेक्रेटरीना धीर दिला. तेव्हा हळूहळू सान्या कहाण्या बाहेर पडू लागल्या.

बैशीची बैठक १९७६ नतर झाली नाही, कारण गावात दोन तट पडले 'तट पडले कारण शिबू सोरेन आमच्या विरुद्ध झाले. शिबू सोरेन विरुद्ध झाले, कारण पडितजी—शिबू सोरेनचे सहकारी कृषि-पडित झगडूना पैसे पाहिजे होते. ते आम्ही देऊ शकलो नाही.' 'पैसे कशाचे ?' 'माझ्याकडे स्वस्त धान्याचे सरकारी दुकान होते.' 'किती पैसे मागितले ?' 'पाचशे, दोनशे दिले, जास्त परवडेनात. तेव्हा माझ्याविरुद्ध तक्रार करवून दुकान दुसऱ्याला दिले.. गावात पाच वर्षापर्यंतच्या मुलाना सरकारी खिचडी मिळते, तेही काम काढून घेवविले अजून खिचडी मिळते; पण तिच्यासाठी येणारे तेल खिचडीत पडत नाही !'

रात्रि—पाठशाला बद पडली, कारण दिव्याला तेल नव्हते एकटा सेक्रेटरी कुठवर देणार ? इतराचा सहकार नाही सहकारी शेती थाबली; कारण पप आला तो झगडू आपल्या शेतीवर गिरिडीह जिल्ह्यात घेऊन गेला हरकत घेण्याचा उपयोग झाला नाही, कारण शिबूजीच त्या पपाचे पैसे देणार आहेत तर इतराना हरकत का असावी ?

शिबूजीनी पुष्कळसे काम लाठीच्या जोरावर उभे केले, त्याची लाठी सैल पडल्यावर कामाचा जोर मोडला. सर्वत्रच काम थडावले, त्याला जाताखूंटा अपवाद नव्हता. मरडीलाही हे म्हणणे मान्य होते.

माझ्यापुढे एक मोठा प्रश्न होता. लाठी दाखविल्यावाचून-सामान्य लोकांना धाक दाखविल्यावाचून खेड्यात कुठलीच कामे उभी राहू शकत नाहीत. उभी राहिलेली कामे लाठीवरची पकड सैल होताच थाबतात आणि धाक न घालावा, लाठी न दाखवावी तर कामांचा आरभही होत नाही. माझा प्रश्न मी समोरच्या लोकांपुढे टाकला. ते बापडे काय उत्तर देणार ?

ह्या प्रश्नाचा आणखीही एक पैलू माझ्या मनात धुमाकूळ घालीत होता स्वत: शिबू सोरेन अत्यत कळकळीचे व प्रामाणिक कार्यकर्ते होते. लोकाना त्याचा धाक होता, त्याच्याबद्दल आदर व अभिमानही होता. राजकारणाची कुठलीही समज नसलेल्या, फ्रान्सच्या जोन ऑफ आर्कप्रमाणे एका स्वप्नाने भारलेल्या ह्या माणसाविरुद्ध समाजाच्या साऱ्या संघटित शक्ती उभ्या होत्या त्याच्या क्षेत्रात झालेल्या प्रत्येक दगलीत, प्रत्येक चोरीदरवडयात त्याचे नाव पोलिसच्या एफ्-आय्-आर् मध्ये गुतलेले होते. प्रत्येक खुनात त्याचे नाव नमूद होते. त्यापैकी बहुतेक सर्व गुन्ह्याशी शिबूचा कोणताच सबंध नव्हता, ह्याची शासनाला स्पष्ट जाणीव होती, पण सावकार-जमीनदाराला हा माणूस विषवत वाटत होता व आपल्या पैशाच्या जोरावर समाजाच्या नियत्रक-शक्ती तो वर्ग विकत घेत होता. आणीबाणी आल्यावर तर त्या शक्ती मोकाट सुटल्या. वीस कलमी कार्यक्रमाला शिबूजीचा पाठिंबा मिळवून त्याना मुक्त करण्यात आले. नतर वीस कलमीची व्याख्या स्थानिक अधिकाऱ्यानी मन.पूत केली. त्यात नसबदीही होती व तिच्यात ह्या माणसाची मान गोविली मोबदल्यात त्याना पुष्कळ सोयी करून दिल्या व त्या देताना आपले उखळही पाढरे केले. निरसा येथील नसबदीकॅंपमध्ये संथाळा-वर गोळीबार झाल्यावर, शिबूजीची प्रतिष्ठा शून्याच्याही खाली गेली !

ही घटना व ही शोकातिका एकटया टडीची नाही, ही साऱ्या ग्रामीण भारताची आहे. ह्याला काही उत्तर आहे का ? विषण्ण मनाने मी जाताखूंटा सोडले. जाताना मला सेक्रेटरी म्हणाला, 'सध्या बैशी फक्त पिटवार्टांड येथे चालू आहे असे वाटते.'

दुपारचे दोन वाजून गेले होते. आकाशात थोडे मळभ आल्याने उन्हाची धार मोडली होती. जाताखूंटाला जायला रस्ता नव्हता, तेव्हा गाडवाटेने मागे न जाता पुन्हा वाट पुसत पुढे निघालो. रस्त्यात एक-दोन ओढे लागले पावला-पावलाने पुढे जात होतो, मध्येच उतरून दिगम, जगन्नाथ गाडी काढण्याजोगी जागा पाहात होते नि चित्रा त्यात लुडबुडत होती मी आपल्याच विचारात बुडलेली होते

पाच मैलावरच्या पिटवार्टांडला पोचायला आम्हाला अर्धा तास लागला. हे गाव मात्र पक्क्या रस्त्यावर आहे. गाव पाहताच मी नुकतीच येथे येऊन गेले त्याची आठवण मला झाली. येथला सरपच कार्य करीत आहे थोडी सहकारी शेती आणि 'ग्रेन-गोला'मध्ये थोडे धान्य शिल्लक आहे. रात्री पाठशाला चालू आहे. विहीर खोदायला कर्ज मिळविले. विहीर खोदून झाली. बाधकामही थोडेसे उरले आहे. विहिरीसाठी मिळविलेला पंप लवकरच विहिरीवर बसेल. कर्जाच्या पहिल्या फेडीची रु. १०५०/— ची नोटिस आली आहे. कर्ज बुडविण्याची भाषा अजून तरी सुरू झालेली नाही.

मी शोधीत असलेली बैशी येथे बसते आहे; काम-काज करते आहे मागच्या बैठकीत निवडणुकीचा विचार झाला काही भाडणेही बैशीपुढे येतात. जमीन, आपसामधली भाडणे, बायकाबद्दल झगडे इत्यादी. बैशीचे दफ्तर सथाळीत होते, तेव्हा प्रत्येक कागद भाषातर करून मला सागावा लागत होता, मी टिपणे घेत होते.

माझे काम सपेतो दुपारी साडेतीन झाले होते सर्वांना भुका लागल्या होत्या, तेव्हा आम्ही घराकडे वळलो.

सध्या शेतीमध्ये, मोठ्या प्रमाणात भाडवल गुतविण्याच्या योजना सरकारी पातळीवर होत आहेत. कारण 'शेतीत गुतविलेला एक रुपया, उद्योगातील एका रुपयापेक्षा पुष्कळ अधिक रोजगार उत्पन्न करतो', असा अर्थज्ञाचा दावा आहे. त्याच्या सिद्धाताच्या मर्यादाचा अभ्यास मात्र अजून सुरू झालेला नाही गुतविलेला पैसा, रोजगार, उत्पादन ह्याचे समीकरण अजून तयार झालेले नाही. उत्पादनावाचून रोजगार निर्माण करता येतो. दर वर्षी, भोवतालची खणलेली माती सडकेवर टाकण्यात येते ती अशीच. वितरणाचे नाते उत्पाद-नाशी जोडण्याचा विचारही अजून आपल्या मनात रुजलेला नाही

ह्या सर्व अभ्यासानंतर, शेतीत साभाळून पैसा गुतविल्यास, तो यश देऊन जाईल. नाहीपेक्षा पोखरिया आश्रमाचे पीक सवंत्र येईल व शातिनिकेतन युनिव्हर्सिटीच्या ग्रामीण प्रकल्पाच्या डायरेक्टर-प्रमाणेच म्हणावे लागेल—'तळा-गाळाचे लोक नेहमी वचितच राहतात.'

मार्चमध्ये डायरेक्टर श्री. प्रभास सेन ह्याच्याशी सहज बोलणे झाले. 'खेड्यापाड्यात सतत उत्पादक परिश्रम करूनही, भुकेकगाल राहू-णाऱ्या लोकाना सरकारी योजनाचा फायदा कसा करून देता येईल ?' ह्याच प्रश्नावर त्यांचे चिंतन व प्रयोग चालले होते, असे दिसले. अखिल भारतीय पातळीवर असे सशोधन लागलीच सुरू न झाल्यास दहा वर्षानंतर ही समस्या, शेतीत ओतलेला पैसा गट्ट करून, आपल्या मानगुटी बसलेली असेल. ह्याची जाणीव आपल्याला जितकी लवकर होईल तितकी बरी ! □

पुस्तके

# हमीद

## हृद्य, रंजक परिचय

दा. गो. देशपांडे

हे एका दाढीवाल्याने बिनदाढीवाल्यावर लिहिलेले पुस्तक आहे – नव्हे पुस्तिका आहे हा बिनदाढीवाला बऱ्याच बाबतीत 'बिन–वाला' होता. जो मुस्लीम म्हणून जन्मला त्याची वास्तविक मुस्लीम म्हणून मेल्यावरही सुटका नसते येथे तर या बिन-दाढीवाल्याने चक्क आदेश देऊन ठेवला होता की, 'आपले चदनवाडीच्या विद्युत-वाहिनीत दहन करावे, प्रेत चिपळूणला नेऊ नये, कुठल्याही धर्माचे सस्कार वा प्रार्थना करू नयेत, शेवटची भाषणे वा स्मारक करू नये.'

जगताना, मरताना आणि मेल्यावरही अशी व्यक्त होणारी तडफ आणि जिद्द अगदी विरळा होय. हमीद दलवाई असा माणूस होऊन गेला आणि उरलाही. या हमीदच्या जीवनीचे अकन करणारे अनिल अवचटाचे हे पुस्तक. हमीदच्या जगण्या–जगवण्याने आविष्कारलेले. तुफान सत्र व सूत्र बेमालूमपणे टिपून तेवढ्याच समर्थपणे, तसेच हमीदचा अंत जसा धोककारक धक्का देणारा ठरला तद्वत या पुस्तकातही त्याचे प्रयाण विव्हल करून सोडणारे ठरते.

ऐशी पानाचे हे पुस्तक एकदा हातात घेतल्यावर झपाटून सोडते. पानामागून पाने जातात. ज्यांनी हमीद प्रत्यक्ष पाहिला नाही त्याच्यापुढेही हमीदचे मुक्त, झंझावाती, गतिमान व्यक्तिमत्त्व साकारू लागते.

हमीदचे पोटतिडकीने आणि आग्रहाने बोलणे, डोळे मिचकावीत कोंकणी उच्चारातून उमटून पडणारा उपरोध, उपहास यांचे साद-पडसाद ओळीओळीतून कानावर पडत असल्याचा अनुभव येतो. असा अनुभव येत असतानाच व त्याची धुदो चढत असतानाच पुस्तकाचा शेवट आला असे वाटावयाच्या ऐवजी हमीदचा शेवटच सामोरा येतो. पुस्तक मात्र मनात राहते. त्यातील शब्द, प्रसंग, विश्लेषण काही म्हणजे काही मनातून हालत नाही.

माझ्या वाचण्यात बरीच व्यक्तिचित्रे आणि चरित्रे आली आहेत; परतु अवचटाचे हे हमीदवरचे लेखन वाचताना जी स्थिती मला जाणवली ती पूर्वी कधीही जाणवली नव्हती. हमीदवर वर्णनात्मक लिहिण्यासारखे पुष्कळ आहे. ती खोगीरभरतीही वाचनीय व रंगक करता येण्यासारखी आहे अवचटानी त्याचा आश्रय केलेला नाही अवचटानी एकामागून एक प्रसग आणि आठवणी सादर केल्या आहेत. त्याची मांडणी सहजतेनं होत गेली आहे. त्यातून हमीद उभा राहिला आहे.

हमीद हा एक 'सोशल प्राणी' होता. त्याला स्वस्थ बसता येत नव्हते, गप्प राहता येत नव्हते. त्याचप्रमाणे तो अतिशय सवेदना-क्षम होता. त्यामुळे लगेच प्रतिक्रियाचे वलय मनात तरंगे ही वलये त्याला वैयक्तिक आणि सामाजिक पातळीवर अस्वस्थ करून टाकत. त्याची साहित्यनिर्मिती आणि सामाजिक कार्य याचे मूळ असे होते. अर्थात त्याच्या साहित्यनिर्मितीवर समाजकार्याने मात केली आणि हमीदच्या जीवनात (मराठी साहित्यातही) साहित्यनिर्मिती ही एक स्मृतीच राहिली.

हमीदच्या साहित्यनिर्मितीची जातकुळी पाहिली तर त्यातही त्याच्या कलावत मना-बरोबरच सामाजिक समस्याबाबतची बौद्धिक विफलता सहप्रवासी होती असे दिसते. हमीदच्या 'इधन' कादबरीतली बरीच पात्रे त्याच्या गावातली आहेत. 'स्वातत्र्योत्तर काळात गावातले वातावरण कसे बदलत गेले, हिंदु–मुसलमान ताण कसा वाढत गेला, इरेस पेटलेल्या दोन्ही कडच्या लोकानी गावाचे एरवीचे वातावरण कसे ढवळून काढले, त्याचा परिपाक मुसलमानाकडून आक्रमकी आणि पाशवी सामुदायिक कृती करण्यात कसा झाला, त्यात हिंदु व मुसलमानातल्या निरप-राध स्त्रिया कशा भरडल्या गेल्या याचे चित्रण आहे.' असे अवचटानी जे लिहिले ते अगदी बरोबर आहे. भारतीय जीवनात मुसलमानांच्या सामाजिक समस्यांच्या सबधा-तली त्याची ही बौद्धिक विफलता शब्दांचे बांध सोडून प्रत्यक्ष कार्यात विनियोगित झाली. या बुद्धिवादानेच त्याच्या कार्याला गती आणि मती दिली; परतु त्या कार्याला बळ मात्र हवे तसे लाभले नाही. हमीद फार लवकर निर्णयाप्रत पोहोचला आणि त्याने चळवळीस आरंभ केला. त्याला मुसलमान सहकारी लाभले, नाही असे नाही, पण त्याला आधार, पाठिंबा, उत्तेजन आणि अभय देणारे सगळे हिंदूच होते व राहिले अवचटानी हे फार कौशल्याने आपल्या निवेदनातून सूचित केले आहे.

आणखी एक खुबी अवचटाच्या या पुस्त-कात मला दिसली ती हमीदच्या व्यक्ति-मत्त्वाचे व्यक्ती म्हणून समाजात मिसळण्याचे जे पदर होते त्याबाबत. त्याचे कलावत मन साहित्यनिर्मिती सोडून समाजकार्यात आले त्याचा स्वतःचा स्वत.बरोबरचा सवाद सुसगत राहिला नाही त्याला वाट फुटली ती माणसे जोडणे व त्याच्याशी बोलत राहणे याद्वारा. समाजकार्य हे बहुतेक महान सहन-शक्तीचे आणि रुक्ष असते. या कार्याचे फळ लगेच दिसत नाही केव्हा केव्हा त्या त्या व्यक्तीचे आयुष्यही सपून जाते. म्हणून बऱ्याच वेळा समाजकार्य करणारी माणसे गभीर किंवा अबोल वाटतात हमीदने स्वत वर आणि इतरावर विनोदी मिस्किल-पणाचा मुलामा चढवून हा रुक्षपणा घाल-विला होता किडनीच्या आजाराने त्रस्त असताना हमीदला लघवी झाली त्या रुग्णा-ईत अवस्थेतील हमीदचे उद्गार अवचटानी उद्धृत केले आहेत ते या पार्श्वभूमीवर लक्ष-णीय होत. हमीद म्हणाला, 'आजची सन-सनाटी बातमी तुम्ही ऐकलीत का? हमीद दलवाई आता मुतले. होय आम्ही किती तरी महिन्यांनी प्रथम मुतलो; पण हे कुणा पेपर-वाल्याला सागू नका हो! नाही तर ते बातमी छापायचे की प्रसिद्ध मुस्लीम समाजसुधारक हमीद दलवाई आज जसलोक हॉस्पिटलात मुतले!'

प्रस्तुत पुस्तकात अवचटांनी हमीदच्या खुमासदार शब्दाचे, बिनोदाचे, खवचटपणाचे अनेक मासले पेश केले आहेत. हे करताना त्यांनी हमीदच्या स्वभावाचे सुद्धा ओघाने दर्शन होईल अशी चतुराई अवलबिली आहे. हमीदचा स्वभाव खरेच काय होता? त्याचे बालपण भावानिक पोषणाने फारसे घडले

गेलेले नव्हते. उलट त्याला तो वंचित झाला होता. तो ज्या समाजात जन्मला तो मुस्लीम समाज अंधश्रद्धा आणि कर्मठपणा, कडवेपणा आणि असहिष्णुतेकडे झुकलेला होता समाज आणि व्यक्तीच्या विकासाकरिता, राष्ट्राच्या स्वातंत्र्याकरिता हिंदु समाजातील नेते जे प्रयोग व प्रयत्न करीत होते त्याच्या तुलनेने मुस्लीम समाजातले बहुतेक पुढारी एकेरी विचार-आचारात गुरफटलेले हमीदच्या बालवयात व यौवन–सुलभ उसळत्या पर्वात दिसले. त्यातूनच त्याचे पुढचे कार्य आणि प्रचारही फोफावला

हमीदची गमत अशी की त्याच्यात एक कौतुकास्पद अलिप्तता होती. त्यामुळे त्याच्या विनोदात विश्लेषण जे असायचे ते निरोगी-पणाचे साक्ष देणारे होते. पतौडीचा नबाब ९० धावावर पळतानाची न्यूज पाहताना हमीद म्हणाला, 'जगात ऑलिंपिकमध्ये पळायचे गोल्ड मेडल कुणाला द्यायला पाहिजे, ते मुसलमांनाना. पळायचं कसं ते याना-बरोबर ठाऊक. कस माहीत आहे का? महंमद पैगंबरानं काय केलं? मक्केहून मदिनेला (जरा थाबून, भर देऊन) पळाला. अरब–इस्रायल युद्धात अरबानी काय केलं? पाय लावून पळालेच. भारत–पाक–युद्धात पाकिस्तानी पळाले. हमीद दलवाईही बॉबे सेंट्रलला मुस्लीमापुढ निदर्शन करायला गेला, जमाव अगावर आल्यावर तो पोलिसाच्या गाडीतून का होईना; पण पळालाच ना? मग आता पटल ना? मुसलमानांना ऑलिंपिकच पळण्याच गोल्ड मेडल द्यायला नको का?'

हा झाला एक भाग; दुसरा भाग हमीदच्या अंतरीच्या अतृप्त इच्छा बाहेर धावण्याचा. त्याचे खाणे, पिणे, सिगारेट ओढणे, जोक्स् करणे इ. इ. त्याला असह्य, अप्रिय, गैरसोयीच्या आणि नावडत्या बाबीचा साधा प्रतिकार जणु मान्य नव्हता. जे कृतीत परवडण्यासारखे नसायचे ते उक्तीत यायचे, परंतु आक्रमक नसायचे. किडनी बसविल्यानतर त्याच्या आचरणाला जो अनावरपण आला त्याची बीजे यातच शोधता येतील व ती उद्बोधकही ठरतील. कर्मशील मनुष्याला आयुष्याचा अत जेव्हा नजरेपुढे येतो तेव्हा त्याच्यात एक प्रकारचा 'डेस्परेटनेस' येतो. अवचटानी म्हटले 'पथ्य-पाण्याविषयी सांगताच पोटावर हात ठवून तो (हमीद) म्हणाला, हा दारूवाला कधी फेल होणार आहे, हे माहीत नाही. मला जे करायचय ते करू द्या. कोणी अडवू नका. यात 'दारूवाला' हा उल्लेख हमीदला जी दारूवाल्याची किडनी बसविली त्यासंबंधातला आहे.

हमीदचे मुसलमानांना सुधारण्याचे काही आडाखे ठरलेले होते. हे माझ्या आम्ही त्याला एका तपाअगोदर वाद्रघास बोलविले तेव्हा लक्षात आले. त्याला मनस्वी वाटत होते की, मुसलमानाना जसे जातीयवादी नेतृत्व पुरोगामी विचार करू देत नाही त्याचप्रमाणे हिंदूची मुसलमानांच्या बाबतीतली द्वेषाची व सूडाची भावना पण कारण आहे. हमीद या सदर्भात काही ऐतिहासिक उदाहरणे द्यायचा. ऐतिहासिक उदाहरणे ही कुणीही जरा वळण बदलून दिली की स्वत:च्या तर्काला अनुकूल अशी बनू शकतात हे त्याच्या त्या वेळेला लक्षात आलेले नव्हते. पुढेही आले नाही त्यामुळे मुस्लीम त्याच्याकडे आकृष्ट होणे दूरच राहिले, परतु ते त्याचा दु:स्वास करीत.वान्द्रघाला मी स्वत: घरोघरी जाऊन त्याच्या व्याख्यानाचे हैद्राबादी मुस्लीम नोकरांना आमत्रण दिले, परंतु कुणीही आले नाही. याचे आत्मशोधन हमीदने केलेही असेल, पण त्याची खूण काही दिसली नाही. उलट कुठे तरी त्याच्या मनात या बाबतीतल्या पराभवाचे सल त्याला टोचत राहिले हे मात्र अवचटांच्याही लक्षात आले नाही. म्हणूनच त्यानी पान ५५ ते ६३ एकतर्फी विश्लेषण करून काही अनुमाने काढण्याची घाई केलेली आहे.

भारतीय समाज (मग तो कोणत्याही जातीचा वा पथाचा असो) हा सर्वसामान्यपणे कोणत्याही बदलास स्वेच्छेने तयार होणारा नाही. हिंदूचे जे ख्रिश्चन झाले त्यापैकी काही कुकू लावीत नाहीत, पण मगळसूत्र घालतात. जे कोकणस्थ ब्राह्मणातून ख्रिश्चन झाले ते धर्मांतरित कोकणस्थ ख्रिश्चनांशी बेटीव्यवहार करतात अशा जाहिराती काही दिवसापूर्वी यायच्या. हिंदू डायनिंग टेबलावर जेवतात, ब्रेकफास्ट घेतात, ड्रिंक घेतात, पण आत देवघर असते, सत्यनारायण करतात, मुजी करतात, कुडली पाहतात, शुभाशुभ वार पाहतात इ. इ. मुसलमान येथील भाषा बोलतात, पण हिरवा, पिवळा रंग धार्मिक म्हणून जवळ करतात, मस्जिदीत नमाजापूर्वी हात कोपरापासून वरपर्यंत धुतात. आपले शासन आणि सुधारक याचे नुसते प्रेक्षक असून आपली सुधारणा वरवरची आहे आतून व खालून नाही म्हणूनच अजूनही अस्पृश्यता पूर्णपणे हटली नाही शिवाय आपण सहिष्णुतेचा अर्थ चुकीचा घेतला असून सुधारणाही सर्वस्पर्शी केलेली नाही हमीदला हे हेरता आले नाही. त्याला हिंदूच्या तुलनेने मुसलमानाना सुधारावे वाटत होते. अवचटांनी या दृष्टीने खल करून हमीदच्या कार्याला व आवाहनाला पडलेल्या मर्यादा दाखविल्या असत्या तर या पुस्तकाला एक आगळी परिपूर्णता लाभली असती. या अनुषंगाने आपण मुसलमान समाज हे कबूल करत नाही म्हणणे चूक आहे. तुर्कस्थानात कमाल अतातुर्कने भराभर सुधारणा केल्या. त्या तेथील जीवनात मार्गस्थही झाल्या. या अनुषगाने अवचटानी निदान विचार तरी करावा अशी किमान अपेक्षा अनाठायी ठरू नये.

ही वैगुण्ये सोडली तर अवचटाचा हमीद हृद्य आहे, रजक आहे, रोचक आहे ज्याना जवळ असून हमीद कळला नाही त्याना पण तो समीप ओढणारा आहे, हसवणारा आहे, विचार करावयास लावणारा आहे, चटका लावणारा आहे. पुस्तकाचे चित्र दिलीप भंडारे या तरुण चित्रकाराचे आहे. ते मनावर अतिशय जबरदस्त ठसा उमटविणारे आहे, भारदस्त आहे व त्यात कारुण्याची छटाही आहे. एकूण हे पुस्तक वाचनीय आणि संग्राह्य आहे. ◻

**हमीद**

अनिल अवचट
नीलकठ प्रकाशन, पुणे
पृष्ठे ८+८०
किंमत : सहा रुपये.

सर्वोत्तम लेखक ('टाइम' वरून)

# सॅम्युअल बेकेट

परिचय : जे. एन्. पोंडा
फिनिक्स लायब्ररी, पुणे

सॅम्युअल बेकेट हा एकदम प्रकाशझोतात आला तो त्याच्या waiting For Godot या नाटकामुळे. त्याचे हे नाटक रंगभूमीवर आले तेव्हा युरोपियन रंगभूमीला अवकळा आली होती. बेकेटच्या या सुप्रसिद्ध नाटकामुळे युरोपियन रंगभूमीला एक वेगळीच कलाटणी मिळाली. जेम्स जॉइसचे युलिसिस जसे इंग्रजी गद्यातला milestone, Eliot चे Waste Land जसे पद्यातला milestone तसेच बेकेटचे 'Waiting for Godot' हा नाटकातला milestone समजला जातो.

जेव्हा मी Waiting For Goadot वाचून खाली ठेवले तेव्हा हा प्रकार चिमटीने पारा उचलण्यासारखा आहे असे वाटले. मला कदाचित हे पुस्तक चांगले कळले नसेल. (कारण मी नाटके फारशी वाचत नाही) असे वाटले.

काही इतर वाचकाना विचारले तेव्हा त्या लोकानीही 'नाटक डोक्यावरनं गेलं' असे सांगितले. त्यानंतर परत एकादा Waiting For Godot वाचले. थोडी कात्रणे जमवली व काही संदर्भग्रंथ चाळले तेव्हा कुठे हे नाटक कळले.

या नाटकासाठीच सॅम्युएल बेकेटला १९६९ मध्ये नोबेल पारितोषिक मिळाले होते. अर्थात नोबेल पारितोषिक मिळाले म्हणून पुस्तक चांगलेच असले पाहिजे असे मी मुळीच मानत नाही. या नाटकाविषयी एक चुटका चांगलाच प्रसिद्ध आहे. नाटकाचा मुख्य भाग म्हणजे एका झाडाखाली Vladimir व Estragon नावाचे दोन भटके Godot ची वाट पाहात असतात. या नाटकाचा प्रयोग चालू असताना एका समीक्षकाच्या डावीकडे दोन अमेरिकन्स बसले होते. नाटकाचा थोडा भाग गेल्यानंतर हे दोन अमेरिकन्स ताडकन उठले व पुटपुटले, 'It is not clear why these two bums are waitng!' अर्धे नाटक सोडून ते बाहेर निघून गेले. त्याच माणसाच्या उजवीकडे एक इंग्लिश जोडपे बसले होते. त्या जोडप्याने मात्र (इंग्रजी शिष्टाचार सोडून) हळूहळू कुजबूज करून नाटकातील रूपकाचा अर्थ काढला आपल्या समीक्षकाच्या मागे नोबेल पारितोषिक कमिटीतले तीन स्वीडिश लोक बसले होते. नाटकाच्या रूपकात जेव्हा माणसाची बिकट अवस्था' 'अस्तित्वाचा हेतू' वगैरे अर्थ निघू लागले तेव्हा हे नोबेल कमिटीवर असलेले स्वीडिश गृहस्थ पुटपुटले 'या नाटकाला नोबेल पारितोषिक मिळालेच पाहिजे' असे बोलून पुरे नाटक न बघताच ती त्रिपुटी बाहेर निघून गेली! ज्या वाचकानी आयर्विंग वॉलेसची 'द प्राईज' ही कादंबरी वाचली असेल त्यांना असले प्रकार माहिती असतीलच.

विषय नोबेल पारितोषिकाचाच आहे म्हणून जाता जाता त्याविषयी थोडे सांगून टाकतो. नुकतीच एका भारतीय लेखकाने स्वीडिश नोबेल कमिटीच्या किंवा बोर्डाच्या सभासदाची मुलाखत घेतली होती. या मुलाखतीत त्याने भारतीय लेखकांविषयी फार अनुदारपणे उद्गार काढले होते व असे म्हटले होते की भारतातून नोबेल पारितोषिकासाठी शिफारस केलेल्या साहित्याचा विचारसुद्धा करता येत नाही अशी ती शिफारसपत्रे असतात व ते साहित्यही त्याला तसेच वाटत असावे अशा रीतीने तो स्वीडिश माणूस बोलत होता. अगदी अलीलडे J. P. चे नाव नोबेल पारितोषिकासाठी सुचविले गेले होते. भारतावर अशी चिखलफेक करणाऱ्या नोबेल पारितोषिक बोर्डाला कुणीही कसलीही शिफारसपत्रे पाठवू नयेत. मला राहून राहून एका गोष्टीचे आश्चर्य वाटते ते हे की पारितोषिकासाठी आपल्या भारतातले उद्योगपती काय ८-१० लाखाचा निधी दरवर्षी उभारू शकत नाहीत काय? साहित्यासाठी ते एवढे सुद्धा करणार नाहीत काय? उत्तमोत्तम साहित्यकृतीला दरवर्षी एकदम मोठे पारितोषिक दिले तर साहित्याच्या दर्जात एकदम फरक पडेल. भारताचा एवढा अवाढव्य पसारा लक्षात घेता ही एवढी रक्कम निश्चितच जास्त नाही. आयुष्य लांबविण्यासाठी हॉस्पिटल्सना लाखानी देणग्या देण्यात येतात; परंतु आयुष्य चांगले जगणे हे आयुष्य लांबविण्यापेक्षा जास्त महत्त्वाचे आहे आणि आयुष्य चांगले जगण्यासाठी साहित्याची जेवढी मदत होते तेवढी दुसऱ्या कोणत्याच गोष्टीची होत नाही; पण दुर्दैव हे की या गोष्टीची दखल उद्योगपती किंवा सरकार घेतच नाही. हा आणखीन असाच एक उफराटा प्रकार म्हणावा लागेल.

असो. इतर बऱ्याच कलावंतानी व बेकेटनी पॅरिस येथे तळ ठोकले. (तो स्वतः आयरिश आहे) पॅरिसमधून तो फ्रेंचमध्ये पुस्तके लिहू लागला! आणि नंतर स्वतःच्या मातृभाषेत म्हणजे इंग्रजीत भाषांतर करू लागला! त्याला एकदा मुलाखतीत कैलाश बाजपेयीनी विचारले, 'आपण परक्या भाषेत साहित्य का लिहिता?' तेव्हा बेकेट म्हणाला, 'परक्या भाषेत मनुष्य जबाबदारीने बोलतो. वाटेल तशी वटवट तो परक्या भाषेत करू शकत नाही!'

बेकेटनी कविता लिहिल्या त्याचे नावही ('Whoroscope') विलक्षण दिले आहे. Whore म्हणजे सरवी. बेकेट माणसाच्या मनातले layers एकामागून एक कांद्याच्या सालीप्रमाणे सोलून काढतो व शेवटी काहीच उरत नाही असे दाखवतो तरी त्याची स्वतःची अशी एक विनोदबुद्धी आहे व तो ती काळ व वेळ हेरून अगदी परिणामकारक रीतीने वापरतो.

बेकेट हा प्रसिद्ध लेखक जेम्स जॉइस ('युलिसिस'कार)चा सेक्रेटरी होता. म्हणून जॉइसचा प्रभाव बेकेटवर पुष्कळ प्रमाणात पडला; परतु वरवर जरी बेकेटची काही पुस्तके जॉइससारखी खुमासदार, अतिरेकी, अलकारिक दिसली तरी खऱ्या अर्थाने ती जोनाथन स्विफ्टसारखी गभीर व उपहासात्मक आहेत.

मॅकफॅरसनच्या Ossian या कलाकृतीला जशी जगभर प्रसिद्धी मिळाली तशीच Waiting For Godot याला मिळाली आहे Godot चे भाषांतर २२ भाषात झाले आहे. युजिन आयोनेस्को याची छाप बेकेटवर ठसठशीत पडली. किंबहुना आयोनेस्कोच्या नाटकाशिवाय 'गोदो' अस्तित्वातच आले नसते ज्याला Theatre of the absurd म्हणतात त्यात आयोनेस्को व बेकेट अग्रगण्य आहेत. absurd चा खरा अर्थ 'हास्यास्पद' असा आहे, परतु साहित्याच्या संदर्भात त्याचा अर्थ माणसाचा एकाकीपणा, रितेपणा असा लावण्यात येतो. जीवनात कोणताच हेतू, अर्थ नाही व माणूस हा शेवटी वाळूचा एक कण जसा दुसऱ्या कणाला बिलगून असला तरी त्या वाळूच्या कणात गारगोटी असल्यासारखा एकटा असतो. या absurd साहित्याचे पडसाद

बेकेट व कामूखेरोज Pinter, Pirandello, Alain Robbe-Grillet व सार्त्र या लेखकात बघावयास मिळतात. Communicate करायला भाषासुद्धा थिटी पडते असे absurd वादी म्हणतात. Godot हे नाटक ख्रिश्चन धर्माच्या द्योतकावर आधारलेले आहे असे वाटते मेंढरे, झाड (Cross), Crosses वर चोर, द्राक्षाच्या मळयातील मजूर व इतर साकेतिकांचा वापर केला आहे याशिवाय भटक्याचे वादविवाद, श्रीमताचे अतिरेकी खाणे, गरिबाचे श्रम असे इतर द्योतकही बेकेटनी Godot मध्ये घेतले आहेत. नाटकाचा अगदी १०० टक्के अन्वयार्थ कोणी लावू शकणार नाही याची बेकेटने काळजी घेतली आहे यामुळेच त्याला घवघवीत यश मिळाले असावे !

बेकेटच्या नाटकातील केंद्रबिंदू उन्हात भिंग ठेवल्यासारखा प्रखर असतो. तेवढ्या-पुरताच तो मर्यादित असतो. व्यापकता ही बेकेटला अजिबात रुचत नाही. त्याची पात्रे जणू त्या केंद्रबिंदूत जळण्यासाठीच बंदिस्त असतात. त्याना त्या बिकट अवस्थेतून सुटण्याचा कोणताच मार्ग दिसत नाही. एकदा तर Vladimir आणि Estragon त्या झाडावर फास लावून आत्महत्या करायला तयार होतात. या झाडाला ४ ते ५ च पाने असतात. हे झाड म्हणजे ज्ञानाचे झाड (Tree of Knowledge), जीवनाचे झाड, (Tree of Life), व बिनमुळाचे (Rootless Tree) असते. आपल्या उत्कर्षासाठी आपला त्राता इथेच मेला असा ख्रिश्चन लोकाचा समज आहे. असल्या द्योतकांचा वापर बेकेट इतक्या कौशल्याने करतो की, त्यामुळे आशा व निराशा या दोन्ही भावनाचा आविष्कार Godot मध्ये होतो बेकेटच्या नाटकात action अजिबात नसते व सवादात तोचतोचपणा व परस्पर-विरोधी विधाने जाणवतात. नायक-नायिकाच्या भानगडीत बेकेट कधीच पडत नाही. तरी त्याच्या साहित्यात कमालीचे गांभीर्य व एक विचित्र प्रकारचा विनोद असतो. त्याची पात्रे धड जग सोडूही शकत नाहीत व जगाशी तडजोडही करू शकत नाहीत. डीडी, गोगो, श्रीमत माणूस व त्याचा गुलाम पॉझो हे बुडते जीव एकमेकास बिलगून असतात. एकाचे अस्तित्व म्हणजे दुसऱ्याच्या अस्तित्वाची जणू हमीच. या गोष्टीत थोडी आशेची किनार दिसते; पण त्या माणसांना याची जाणीवच नसते ! आणि ती शोकान्तिका होऊन बसते. बिलगण्याच्या बाबतीत किंवा Communicate करण्याच्या बाबतीत बोलायचे झाले तर, दोन मनुष्यात जवळीक साधायची असेल तर तिसऱ्याची निंदा करावी हा एकच मार्ग आहे असे कधीकधी वाटते.

बेकेटचा एक 'खुमासदार' विनोद बघा. त्याच्या एका पात्राने कुठे तरी म्हटले आहे, 'Ah, Morvan, you would be the death of me if were sufficiently alive !' १९६६ मध्ये एकदा तर बेकेटनी एक ३० सेकंदाचेच नाटक लिहिले त्यात फक्त श्वास घेऊन उसासा सोडलेला असतो ! एका समीक्षकाने एकदा बेकेटच्या पात्राला विकृत Cartesian म्हटले होते अर्थात Cartesian हा शब्द *Descartes या गणित-तज्ज्ञ व तत्त्वज्ञावरून* प्रचलित झाला आहे. या Deseartes तत्त्वज्ञाचे एक ब्रीदवाक्य प्रख्यात आहे. ते असे, 'I think, therefore I am' त्या समीक्षकांनी बेकेटच्या पात्रांच्या बाबतीत त्या ब्रीदवाक्यातला एकच शब्द बदलला. 'I stink, therefore I am.'

वाट बघत बसणे हा बेकेटच्या पात्राचा मुख्य उद्योग होऊन बसतो. आपण विजेच्या झगमगीत प्रकाशात बसलो असता अचानक ब्लॅक आउट होतो व आपण आतुरतेने दिवे परत कधी येतील याची वाट बघत असतो. त्याचप्रमाणे माणसाच्या संस्कृतीत ब्लॅक आउट झाला असून नवीन नीतिमूल्याची, अस्तित्वाच्या नव्या अन्वयार्थाची वाट माणूस बघत बसला आहे असाही एक संकेत निघू शकतो. कधी कधी त्याच्या रितेपणात बेकेट *कमालीचा आत्मसतुष्ट वाटतो या* absurd (साहित्याच्या अर्थाने) जगात काहीच न केलेले, कोणतीच निवड न केलेली बरी असे त्याला वाटत असावे.

वेळ जावा या हेतूने बेकेटच्या नाटकातले दोन भटके खेळ खेळतात इथे खेळ हा जीवनाचे द्योतक असतो. त्या भटक्यातला विदुषक स्वत.ची अवहेलना करून दुसऱ्याचे मनोरंजन करतो. माणूस हा विश्वातील असाच विदुषक आहे असे बेकेट सूचित करतो, पण त्या माणसाच्या बिकट अवस्थेमुळे बेकेट रडतो.

'मोलॉय', 'मेलॉन डाईज्' व ध अननेमेबल' या तीन पुस्तकातल्या पात्रात बेकेट जणू त्या पात्राच्या मेंदूत घुसून सशोधन करतो. कवी स्टीफन स्पेंडर एकदा बेकेट-विषयी असे म्हणाला होता, 'तो गृहस्थ पात्राच्या अस्तित्वाच्या खेरीज इतर गोष्टी-बद्दल उपरोधाने बोलतो.' 'मेलॉन डाईज' या पुस्तकातला मृत्युशय्येवरचा एक म्हातारा कोणतीच गोष्ट हातची राखून न ठेवता सत्य किंवा वास्तवता शोधण्यासाठी लिहीत असतो आणि स्वत शी पुटपुटत असतो त्याने आधीच ठरवलेले असते की, 'माझी गोष्ट' लिहिण्याचे माझे पेन्सिलीचे थोटूक, व माझे आयुष्य, हे सर्व मी एकाच वेळेला सपवीन.' त्या म्हाताऱ्या माणसाचे वैफल्य, नपुसकत्व (figurative), एकाकीपणा हे सर्व परत एकदा सूर्यप्रकाश जसा भिंगाखाली केंद्रित होतो तसे बेकेटच्या लेखणीखाली आले आहे. अर्थात् हा म्हातारा माणूस म्हणजे मानव-जातीचा गमक होय.

पाण्याचा एक थेंब म्हणजे समुद्राचे द्योतक आहे, तसेच जनमानसातला एखादा झपाटलेला व सवेदनाशील माणूस लेखक बनून त्या जनसागराला सागता येत नाही अशा गोष्टी सागून जातो त्या जनसागराची तो वाचा फोडतो. परिणामकारक लेखक हा नेहमी काळाच्या पुढे असतो व त्याच्या बाबतीत पुष्कळ वेळेला गैरसमज झालेले असतात. काळ जेव्हा त्याच्या दृष्टेपणाइतपत पोहोचतो तेव्हा दुसराच लेखक आणखी पुढे बघतो. हे असे नेहमीच चालत आले आहे.

मी बेकेट वाचण्याच्या आधीच माझे स्वत चे वाक्य २–३ वेळा 'माणूस' मध्ये दिले होते. ते असे, 'Universal scheme of things is sado-masochistic' या माझ्या वाक्याला बेकेटच्या साहित्यात पुष्टी मिळाली हे वाचून मला थोडे आश्चर्य वाटले. 'Becket is convinced that there is a universally malignant force.' असल्या अक्राळविक्राळ शक्तीची ज्याला प्रचिती आली आहे त्याने नतमस्तक होऊन कला, साहित्य, संगीत व कला यातच जो काही विरगुळा मिळेल त्यात समाधान मानावे.

इथे परत एकदा जी. ए. कुलकर्णीची आठवण येते. 'दाहक द्रवाच्या थेंबाप्रमाणे माझे शब्द हाडापर्यंत जळत जाऊन हाडात उतरत. परतु त्या माणसाना नेमक तेच नको होत. पृष्ठभागावर ओरखडा न उठवता सळदिशी सरकणारा नटवा सुबक आनद, किंचित् ओलसरपणा निर्माण करून क्षणात पुन्हा हवेत वाफ होऊन जाणार आटोपशीर, समजूतदार दुःख त्याना हव होत.'

बेकेटचे शब्द सुद्धा असे हाडापर्यंत जळत जाऊन हाडात उतरतात. ज्याना फक्त नटवा, सुबक आनद हवा असेल त्यांनी बेकेट वाचू नये. □

बाबा आढाव यांना अनावृत पत्र : पृष्ठ ९ वरून

शकत नाही; जशी त्याग, बुद्धिमत्ता याची मक्तेदारी नसते. एस. एम. जोशींनी आपल्या नातवाना अनेक स्फूर्तिदायी स्थळाची यात्रा घडविली नि त्या संस्काराना मौजीबंधन असे नाव दिले; पण मुंजीचे कसलेही सस्कार आपल्या मुलांवर न करणारे अनेक लोक संघात आहेत. मिश्र विवाहाची तीच गोष्ट माझ्यासमोर दोन ताजी उदाहरणे आहेत. मुलगा ब्राह्मण तर मुलगी आगरी, नि मुलगी ब्राह्मण तर मुलगा भंडारी. विशेष म्हणजे दोन्ही विवाहसमारंभप्रसंगी कुटुंबातली वृद्ध मंडळीही मनापासून सामील झाली होती. ही जोडपी संघाबाहेरची असती तर त्यांनी स्वत:चे केवढे टॉमटॉमिंग करून घेतले असते! पण संघाला वायफळ प्रसिद्धीचा तिटकारा आहे म्हणूनच हे विवाह गाजले नाहीत. अर्थात प्रसिद्धिविमुखता हा अनुकरणीय गुण मी मानतो आपले काय मला ठाऊक नाही.

बाबा, अशा शेकडो गोष्टी सागता येतील. तुम्हालाही त्यातल्या काही तुरुंगात माहीत झाल्या असतील; पण तुमचे पूर्वग्रह सुटत नसले तर आपले प्रबोधन कोण करू शकेल? आनंनाची गोष्ट अशी की, मधू लिमये, मधू दंडवते, एस. एम. जोशी, नानासाहेब गोरे, मृणाल गोरे, बगाराम तुळमुळे आदी आपल्या माजी पक्षातल्या मित्राची मने स्वच्छ आहेत. विरोधी पक्षाचे ऐक्य अपरिहार्य होते. इंदिरा गांधीचे राजकारण व आणीबाणी यानी या ऐक्याला गती दिली, अशी त्यांची धारणा आहे आणि भारतीय लोकशाही भक्कम राहावी, तिच्यावर पुन्हा हुकुमशाहीचे संकट कोसळू नये, यासाठी हे ऐक्य चिरेबदी व्हावे, अशी त्यांची मनःपूर्वक इच्छा आहे, तसे त्यांचे प्रयत्न आहेत. कोथरूडला नुकतेच जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांचे शिबिर झाले. त्याचा वृत्तात आपल्या कानावर आलाच असेल. जनता पक्ष कायम स्वरूपाचा असावा का, हा आपला सवाल हवेतच विरून जाणार, हे त्यावरून आपल्या ध्यानात यायला हरकत नसावी.

पूर्वदूषित तेच राहतात की, माणसाची मते व मने बदलू शकतात यावर ज्याची श्रद्धा नसते. बाबा आढाव हा एक श्रेष्ठ ध्येयाने झपाटलेला माणूस आहे; अशा माणसाचे काही पूर्वग्रह असले तरी त्याचे मन पुन पुन्हा सत्यदर्शन झाल्यानंतर बदलल्याखेरीज राहाणार नाही असा माझा विश्वास आहे. म्हणूनच या पत्राचा प्रपंच. कळावे

आपला,
सजय

# कै. स. गो. कात्रे यांचा चांपा येथील भारतीय कुष्ठ निवारक संघ

प्र. शं. धाकस

कै. सदाशिव गोविंद कात्रे ह्यानी आपल्या आयुष्याची साठी उलटून गेल्यानतर 'भारतीय कुष्ठ निवारक संघ' नावाची एक संस्था स्थापन केली. ह्यासंबंधी डॉ. शिवाजीराव पटवर्धन, अध्यक्ष, विदर्भ महारोगी सेवा मडळ, तपोवन, हे एके ठिकाणी म्हणतात–

'छत्तीसगढ में कुष्ठरोगिओकी सख्या बडी तादाद में है और वहाँ मिशनरी लोग कुष्ठरोगिओकी सेवा बहुत वर्षों से कर रहे हैं. वहां के कुष्ठरोगी लाचार बनकर कृतज्ञभावना से ख्रिश्चियन धर्म का स्वीकार करते हैं. यह बात सभी को विदित है. हिंदुओ की सस्था छत्तीसगढ में निकालनेका साहस अभीतक किसीने भी नही किया है.

श्री. सदाशिव गोविंदराव कात्रे वृद्धावस्था में कुष्ठरोग का शिकार बनकर हमारी संस्था में आए और ईश्वर कृपासे दो तीन वर्ष में कुष्ठनिर्मुक्त हो गए. साठ वर्ष की आयु होते हुए भी आपने कुष्ठरोगिओकी सेवा करने का निश्चय कर, चाम्पा में जाकर वहाँ एक सस्था निकाली. इनका यह साहस कहांतक फलीभूत होगा, यह शंका मेरे मनमें बहुत दिनोतक थी.

आज दस वर्ष के बाद यह दिखाई देता है कि सस्था अपने पैरो पर खडी हुई है और दो ध्येयनिष्ठ सुशिक्षित युवकोने भी इस काम के लिये अपना जीवन समर्पित किया है. पर आज शासन का ध्यान इस ओर नही है. जनता भी मदद करने को तैयार नही है.'

### कुष्ठ निवारक संघाची स्थापना

श्री कात्रेजी जरी रोगमुक्त झाले होते तरी समाजाच्या विशिष्ट दृष्टिकोनामुळे आपल्याला समाजात स्थान मिळणार नाही ही जाणीव त्यांना होती. ते प. पू. श्री. गुरुजीना भेटले व आपली व्यथा त्याना सांगितली. प. पू. गुरुजी त्याना म्हणाले, 'आपण हेच कार्य करावे अशी परमेश्वरी इच्छा दिसते. तरी आपण छत्तीसगड भागात जाऊन हे कार्य करावे.' प. पू. गुरुजीकडून प्रेरणा मिळाल्यामुळे श्री. कात्रेजीनी कुष्ठरोग्याच्या सेवेसाठी उर्वरित आयुष्य वेचण्याचा निर्णय घेतला व १९६२ साली ते छत्तीसगड भागात आले. कुष्ठरोग ह्या विषयावर ठिकठिकाणी व्याख्याने देऊन त्यांनी समाजजागृतीचे काम केले. त्याचे दृश्य फळ म्हणजे सन १९६४ साली कार्यरत झालेली भारतीय कुष्ठ निवारक सघ ही सस्था.

नागपूर–कलकत्ता रेल्वे लाइनवर नागपूरपासून सुमारे २५० मैल अंतरावर चाम्पा हे रेल्वेस्थानक आहे ह्या ठिकाणी मेल–एक्स्प्रेस सर्व गाड्या थाबतात. ह्या चाम्पा गावापासून सुमारे ३ मैल अतरावर सस्थेचा आश्रम आहे. त्या ठिकाणी जाण्यासाठी रिक्शा वा खाजगी मोटारकंपनीची बस आहे.

माझा व ह्या संस्थेचा परिचय योगायोगाने झाला. मुबईच्या विवेक साप्ताहिकात डॉ. पटवर्धनानी उल्लेख केलेल्या दोन तरुणांचा परिचय आला होता. सर्वश्री दा. ग. बापट, सचिव, भारतीय कुष्ठ निवारक संघ व गंगाधर ना. वैद्य हेच ते दोन तरुण. त्यानतर त्याच साप्ताहिकात ह्या संस्थेचे मदतीचे आवाहन आले. मला मिशनरी पद्धतीने काम करणाऱ्या मंडळीबद्दल नेहमीच आपुलकी असल्यामुळे मी संस्थेला पत्र लिहून त्याच्या आवाहनाला प्रतिसाद देण्याचे ठरविले. त्याच सुमारास आमच्या घरी पुतण्याच्या मुंजीही झाल्या

होत्या. ह्या निमित्ताने काही रक्कम अशा संस्थांना द्यावी हे मी मनाशी ठरविले होते ह्या पत्रव्यवहारातूनच पत्रमैत्री निर्माण झाली अन् ह्या सस्थेसाठी काम करण्याचे मी मनोमन ठरविले. श्री. बापट ह्यांची मला जी पत्र येत त्यापैकी एका पत्रातील भाग मुद्दाम खाली देत आहे

जा क्र. ५६६–४६१–७६

दिनाक २३ मार्च १९७६

बन्धुवर परम आदरणीय श्री. घाक्रसजी यांसी

सादर प्रणाम.

आपले कृपापत्र मिळाले. मजकूर समजला. 'विवेक'मधील आमच्या प्रार्थनेला आपण त्वरित प्रतिसाद देऊन ह्या कार्याचा गौरवच केला आहे. इतक्या जागरूकतेने देशबांधवाच्या मदतीला आपण धावून आल्याने, आपल्या महाराष्ट्राबद्दल आम्ही हृदयी बाळगलेल्या आशा फोल ठरणार नाहीत हे निश्चित झाले...

कुष्ठसेवेत सदैव आपला,

दा. ग बापट

मत्री, भारतीय कुष्ठ निवारक सघ, चाम्पा.

अशासारख्या काही पत्रामुळे स्नेह अधिक वाढत गेला व एकदा ह्या सस्थेला प्रत्यक्ष भेट देऊन ह्या मंडळीशी ओळख करून घ्यावी अशी ओढ वाढत गेली.

श्री. वैद्य हे ठाण्याचे. पूर्वी मला एक पत्र लिहून त्यानी माझे कुतूहल जागृत केले होते. आपली २८ वर्षांची नोकरी सोडून ते ह्या कार्यात सहभागी झाले आहेत. श्री. नाबणकर हे ह्या सस्थेतील आणखी एक सहकारी. ते चंद्रपूरजिल्ह्यातील असून ह्या संस्थेची वैद्यकीय जबाबदारी साभाळतात

श्री. वैद्य ह्यांचेकडून रात्रीच्या गप्पांतून संस्थेसंबंधी माहिती मिळाली सस्थेजवळ चाम्पा येथे ४७ एकर जमीन आहे. प. पू. गुरुजीनी आपली रायपूरजवळील १८ एकर जागा ह्या सस्थेला दिली होती. (मध्यप्रदेश सरकारने ती जागा धरणाच्या कामासाठी घेतल्याचे समजते.) ही सर्व ४७ एकर जागा एके ठिकाणीच आहे सस्थेचे कार्यालय व ह्या जीवनव्रती (मिशनरी) योजनेत काम करणाऱ्याची रहाण्याची सोय एके ठिकाणी आहे संस्थेतर्फे १५–१६ एकरात भातशेती केली जाते पाऊस जर व्यवस्थित पडला तर २३–२४ एकरात गहू, जवस, करडई, चणा, भाजीपाला आदी पिके घेतली जातात. बाकी सर्व जमीन पडीत आहे पावसावर सर्वस्वी अवलबून असलेल्या ह्या जमिनीला जर पाण्याचा पुरवठा करता आला तर सस्थेच्या कार्यात अधिक प्रगती करता येईल असा विश्वास त्यानी व्यक्त केला.

## 'माधव सागर' योजना

अशा तऱ्हेच्या भरपूर पाण्याच्या पुरवठ्यासाठी सकल्पित 'माधव सागर' तलाव बाधण्याचे काम चालू आहे. जसजसे पैसे उपलब्ध होत जातील तसतशी त्या कामात प्रगती होईल. ह्या कामासाठी सुमारे ३० हजार रुपये खर्च येईल असेही ते म्हणाले.

शासनाकडे वीज मिळविण्याचे प्रयत्न चालू आहेत. त्याला यश झाल्यावर बोरिंगवर पाणी घेऊन अधिक जमीन लागवडीखाली आणण्याचा कार्यक्रम सस्थेने डोळ्यासमोर ठेवला आहे तसेच आश्रमवासीयाना 'तपोवन वा आनन्दवन'सारखे विजेवर चालणारे उद्योग उपलब्ध करून देता येतील अशी त्याची आकाक्षा आहे.

## आश्रमाचे कार्य

मी गेलो तेव्हा आश्रमवासी म्हणून ४० रुग्ण तेथे राहात होते. त्याची निवासाची व्यवस्था संस्थेच्या जागेवर ठिकठिकाणी छोटी छोटी घरे बाधून करण्यात आली आहे सस्थेतून ३० कुष्ठरुग्ण बरे होऊन आपल्या घरी परत गेले असून ते शेती करीत असल्याचेही त्यानी सागितले. सस्थेच्या आश्रमात अजूनपर्यंत १८२ कुष्ठरुग्ण राहून गेल्याची माहिती त्यांनी दिली. शिवाय २०० रुग्ण हे बाहेर राहून सस्थेकडून औषध-पाण्याची सेवा घेतात. आश्रमवासीयाची संपूर्ण जबाबदारी संस्था घेतेच, त्याशिवाय ह्या कुष्ठरुग्णाच्या मुलासाठी एक बालकाश्रम काढून त्याचीही सोय करावी असा संस्थेचा मानस असल्याचे श्री वैद्य ह्यांचेकडून समजले.

सकाळी ७–३० च्या सुमारास प्रत्यक्ष रुग्णाच्या वसाहतीकडे गेलो. सुरुवातीला श्री. कात्रेजी ह्याची भेट झाली. सुमारे ७५ च्या पुढे वय असलेले हे गृहस्थ. डोक्याला टक्कल. वाटोळा चेहरा. चेहऱ्यावर व शरीरावर काही प्रमाणात सूज आलेली पण सर्व अवयव शाबूत असलेले. हे गृहस्थ ह्या सस्थेचे संस्थापक. मी आश्रम पाहाण्यासाठी आलो आहे हे समजल्यावर त्याना फार आनद झाला अन् त्यानी तो शब्दानी व्यक्तही केला. ते म्हणाले, 'समाजामध्ये

चातुर्मासांत व वर्षभर पारायणासाठी
'श्री मयूरेश प्रकाशनचा'
'श्री गणेश प्रताप' ग्रंथ
( प्राकृत ओवीबद्ध गणेशपुराण )
मोठा टाइप, मोठा साईज, बाउंड स्वरूप,
अष्टविनायकदर्शन
मुखपृष्ठावर ऋद्धिसिद्धीसह गणेशाचे मोहक दर्शन.
पृष्ठे ४००, अध्याय ५६, ओव्या ५६६५
मूल्य ३५ रुपये □ सवलतीचे मूल्य २५ रुपये
अधिक र. ट खर्च ३ रु. (व्ही. पी. पद्धत नाही)
मनाला शाती व समाधान देणारा रसाळ व सुबोध
लोकप्रिय ग्रंथ आजच विकत घ्या.
सवलतीची विक्री सर्वत्र चालू आहे.
बलवंत पुस्तक भांडार, गिरगांव–मुंबई ४

ह्या रोगाबद्दल भीती आहे, त्यामुळे आमच्या येथे सदृढ माणूस येण्याचे टाळतो आपण आल्यामुळे आमच्या कार्यकर्त्यांना उत्साह येईल.' त्याच्याशी काही वेळ गप्पा करून व अन्य मंडळींशी परिचय व गप्पा करून आम्ही परत मुक्कामावर आलो.

दुपारी मला परत निघायचे होते. आलेल्या पाहुण्याला वेळेवर जेवण मिळणे आवश्यक होते म्हणून ती मंडळी जेवणाच्या मागे लागली.

मी तेथून निघण्यापूर्वी श्री. कात्रेजी मला भेटावयास मुद्दाम आले. ते मला म्हणाले– 'धाऋससाहेब, आपण पहाताच, ह्या मंडळीचे जेवणाचे कसे हाल होतात. तरी त्यांच्यासाठी एखादा माणूस मिळाल्यास पहा. त्याची सर्व व्यवस्था संस्थेमार्फत होईल आपण येथील सर्व गोष्टी पाहिल्या आहेतच. त्याची माहिती महाराष्ट्रातील मंडळींना करून द्या.' मी त्याना 'हो' म्हटले व त्या मंडळीचा निरोप घेतला.

श्री. बापट ह्यांचेकडून दिनांक १७ मे १९७७ ला लिहिलेले पत्र मला मिळाले. पत्रातील मजकूर पुढीलप्रमाणे होता–

बडे दुःख के साथ जानकारी दी जा रही है कि कल दि. १६-५-७७ सोमवार को श्रद्धेय श्री सदाशिव गोविंद कात्रे (सस्था के भूतपूर्व सचीव) का निधन हो गया.

भवदीय

**दा. म. बापट**

(साप्ताहिक 'विवेक'वरून साभार)

# समग्र क्रांतीसाठी सहकार्य

## सरसंघचालकांचे जयप्रकाशजींना आश्वासन

सरसंघचालक मा बाळासाहेब देवरस यानी 'समग्र क्रातीची कल्पना साकार करण्यासाठी सर्व प्रकारचे सहकार्य देण्याचे आश्वासन' लोकनायक श्री. जयप्रकाश नारायण यांना मुबई मुक्कामी झालेल्या भेटीत दिले.

ही भेट 'एक्स्प्रेस टॉवर' या श्री. जयप्रकाश नारायण याच्या सध्याच्या निवासस्थानी गेल्या शनिवार दि. ११ ला झाली. सरसघचालकाच्या समवेत सरकार्यवाह श्री. माधवराव मुळे व सह–सरकार्यवाह श्री. भाऊराव देवरस होते.

अहिंदू व विशेषतः मुस्लिम समाजाविषयीच्या सघाच्या भूमिकेविषयी जयप्रकाशजीशी बोलताना सरसघचालक म्हणाले की 'मुस्लिम हे या देशाबाहेरील नाहीत. राष्ट्रीय जीवनात त्याना निश्चित असे स्थान आहे अशी रा. स्व. सघाची भूमिका आहे. सवधितांशी चर्चा करूनच संघप्रवेशासंबंधीचा निर्णय करणे आवश्यक आहे जमाते इस्लामीशी वार्तालाप चालू आहे. परतु इतर मुस्लिम–सघटणाशीही चर्चा करणे आवश्यक आहे तसेच ख्रिश्चन आणि इतर अ–हिंदू यांच्याबरोबरही बोलणी झाली पाहिजेत. याबाबतीत क्रमाक्रमाने वाटचाल करणे लाभदायक ठरेल.'

यानंतर संघावर होणाऱ्या टीकेसंबधाने बोलणे निघाले. जयप्रकाशजीच्या पृच्छेवर श्री. देवरस म्हणाले, आणीबाणीत एकत्र काम केले व एकत्र तुरुगवास भोगला. त्यामुळे सघ, समाजवादी, जमायते इस्लामी, सर्वोदयी, सघटणा कॉंग्रेस, जनसघ इत्यादी पक्ष व सघटनांच्या कार्यकर्त्यांत परस्परांना समजून घेण्याची प्रवृत्ती वाढीला लागली. पूर्वग्रह नाहीसे होण्यास वेळ लागतो, म्हणून काही काळ अजूनही जाऊ द्यावा लागेल. राष्ट्रवादी व लोकशाहीवादी शक्ती वाढीस लागलेल्या ज्याना पहावत नाहीत असा वर्ग मात्र सघाविषयी कलुषित वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न करतो

ही भेट स्नेहपूर्ण वातावरणात झाली; परतु जयप्रकाशजीचे प्रकृतिमान पहाता विविध विषयावर विस्तृत चर्चा होऊ शकली नाही. सुदृढ व स्वच्छ समाजनिर्मितीसाठी अस्पृश्यता, जातीयता, आर्थिक विषमता इत्यादी दोष नष्ट झाले पाहिजेत याविषयी उभयाचे एकमत झाले.

□


सरसघचालक

मा. बाळासाहेब देवरस यांचे परखड सामाजिक विचार

**सामाजिक समता व हिंदू संघटन**

पुस्तक रूपाने पुन्हा प्रकाशित झाले । मूल्य केवळ १ रुपया

प्रमुख विक्रेते

**विवेक वितरण केंद्र**

३६४ न. चि. केळकर रस्ता, लादीवाले जोशी आधार, दादर, मुबई ४०० ०२८.

# टेक इट लाइटली

संजीव मंगरूळकर

## विधानसभांचे निकाल

नुकत्याच झालेल्या बहुसंख्य विधानसभा-निवडणुकाचे निकाल आता आपल्या हाती आले आहेत. लोकसभा निवडणुकीच्या वेळी अचानक उपटलेल्या जनता–लाटेचे काय झाले या प्रश्नाचे उत्तर या निकाला-मधून मिळणार होते कांग्रेसप्रेमी मंडळीना अगदी प्रथमपासूनच ही जनतालाट ओसर-ल्याची खात्री वाटत होती आणि त्याच्या आशावादी विचारसरणीला असे काही तरी वाटणे अगदी साहजिकच होते; पण याहून विशेष म्हणजे कित्येक जनताप्रेमी मंडळीही आताशा या लाटेविषयी जरा साशंकच बनून राहिली होती आणि विधानसभाच्या निकालासारख्या जिव्हाळयाच्या विषयी-देखील जबाबदारीने आणि जपून विधाने करू लागली होती; पण या वेळीही निवडणु-काच्या निकालांनी थोडाफार धक्का दिला आणि जनतालाटेने पुन्हा एकदा कांग्रेसला अस्मान दाखविले.

कांग्रेस पडली यात आता तसं काही नवीन आणि आश्चर्यकारक 'थ्रिल' उर-लेलं नाही लोकसभा निवडणुकीपासून त्याची आम्हाला आणि कांग्रेसवासियांनाही सवय झाली आहे; पण या निवडणुकीचं वैशिष्टय आहे ते वेगळंच. साधारणपणे भारतात कुठ-लीही विशेष राजकीय घटना घडली की त्यावर पोटभर प्रतिक्रिया आम्हाला ऐका-यला मिळतात. अगदी दोन्ही बाजूनी यथेच्छ तोडसुख घेणारी मातब्बर राजकारणी मंडळी त्यावर मनसोक्त बोलतात; पण या वेळी मात्र एवढया निवडणुकाचे असे निकाल लागूनदेखील पुरेशा प्रतिक्रियाच ऐकू आल्या नाहीत. नाही म्हणायला, बहुतेक सर्व वर्त-मानपत्रातून त्यावर एखादा अग्रलेख आणि 'दृष्टिक्षेपात विधानसभा निकाल' वगैरे-सारखी सदरे आलीच; पण असल्या अळणी, समतोल, चिकित्सक वाङमयात आम्हा सामान्याना काय रस वाटणार? आम्हाला आपली पुढाऱ्याची मसालेदार, झणझणीत मुक्ताफळे चाखण्याची सवय जडलेली! जनतापक्षनेत्यांकडून थोडयाफार प्रतिक्रिया आम्ही ऐकून आहोत; पण त्या तशा खुस-खुशीतई नाहीत आणि अगदीच तुरळक आहेत, पण हे आम्ही समजू शकतो. विजयाच्या बेहोषीत असल्यामुळे सध्या काही काळ तरी त्यांचा बोलण्यापेक्षा कृतीवर भर असणे साहजिकच आहे; पण कांग्रेसच्या माघाडीवरची ही सामसूम मोठी असह्य वाटते. कांग्रेसकडून आम्हाला ही अपेक्षा नाही 'आजवर त्याच्याकडून आम्ही बोलण्या-चीच तर केवळ अपेक्षा बाळगून होतो आणि लोकसभेच्या त्या महान पराजयानंतरही आपले हे ब्रीद कांग्रेसने मुळीच सोडले नव्हते. पराजयानंतरच्या या काळात तर अगदी आणीबाणीतल्या चुकाची कबुलीही त्यानी दिली. इतकेच नव्हे तर इतक्या चुका होऊ-नही, मूलत आणीबाणी पूर्णपणे वैध आणि आवश्यकच होती असेही घसा फोडून सागि-तले. आणीबाणीतले अत्याचार, भ्रष्टाचार याची वर्णने ऐकून आम्ही अवाक झालो; पण कांग्रेसने आपले आणीबाणी–माहात्म्य–गायन अगदी उच्चरवाने चालूच ठेवले. अगदी निवडणुका जवळ आल्या तरी आपल्या या सुरात त्यानी जराही फेरबदल केला नाही; पण निवडणुकाचे निकाल लागल्यावर त्याची ही जिद्द एकदम ओसरावी, त्यांचा सूर असा एकदम हरवून जावा याचे आश्चर्य वाटते. त्यांची अडचणही आम्ही पूर्णपणे समजू शकतो. तेच तेच आणीबाणीपुराण चघळून त्याना कटाळा आला असणे साह-जिकच आहे. कदाचित जनसामान्याप्रमाणेच आणीबाणीच्या प्रचाराचे वैयर्थ्य त्यांच्याही ध्यानात आले असावे सारख खोट बोलण्या-चाही कित्येक वेळा कंटाळा येतो. त्यातून खोट बोलण्याचा काहीच उपयोग होत नसेल तर हे नैराश्य वाढण्याचीही शक्यता असते. तसे काही तरी कांग्रेसश्रेष्ठीच्या बाबतीत घडले असावे.

पण कांग्रेसश्रेष्ठीनी असा धीर सोडून चालणार नाही ते त्याच्या ब्रीदाच्या विरुद्ध आहे. विधानसभेचा हा पराजयही नैतिक कसा हे त्यानी पटवून दिलं पाहिजे किंबहुना हा सकृतदर्शनी पराभव वाटला तरी तो पराभव नसून विजयच आहे हेही त्यांना सिद्ध करता येणे शक्य आहे. त्या दृष्टीने उत्तरप्रदेश, बिहारसारख्या राज्यातही त्याना काही मते मिळाली आहेतच असेही त्याना दाखविता येईल याचा अर्थ कांग्रेसला लोकांचा वाढता पाठिंबा असून लोकाचा कांग्रेसवरील राग कमी होत आहे असाही काढता येईल आणि पुढे जाऊन आपण याचाच निष्कर्ष आणीबाणीला लोकाचा विरोध नव्हता, उलट लोकाना आणीबाणी आवडतच होती असाही काढू शकतो.

आणि हेही जमले नाही तरी कांग्रेसला एक मुद्दा उपस्थित करता येणे सहज शक्य आहे. तो असा – जनतापक्षाच्या या विजया-मागे महत्त्वाचे कारण हे लोकाचे 'जनते'-वरील प्रेम नसून, मुख्यत लोकाचा कांग्रेस वरील राग हे आहे. खूप दूरवर विचाच केल्यास हा मुद्दा कांग्रेसच्या फायद्याचार-आहे हे सुज्ञाच्या ध्यानात येईलच.

ते काहीही असो. कांग्रेसश्रेष्ठीनी असे गप्प राहून चालणार नाही. त्यानी बोललेच पाहिजे. कांग्रेसच्या पराजयाचे समर्थन केलेच पाहिजे. आणीबाणीचे गोडवे अगदी शेवट-पर्यंत गायलेच पाहिजेत, मग भले त्यापायी असे पन्नास पराजय होवोत. तेही पचवून गोड करता येतील, पण आणीबाणीचा पुरस्कार झालाच पाहिजे. कारण अगदी कसेही किळस-वाणे, विद्रूप, भोगळ असले तरी आणीबाणी हे कांग्रेसचे लाडके अपत्य आहे! □

## आणि राजनारायणांची गंमत

तर अशा रीतीने विधानसभा-निवडणुकाच्या निकालावरच्या मंडळीच्या प्रतिक्रिया तरी अशा सपक आहेत, पण तरीही आपल्याला हताश होण्याचे कारण नाही. इतरही काही गमती निवडणुकाच्या निमित्ताने घडत आहेतच. त्यानाही भरपूर दाद देणे आवश्यक आहे.

एक मोठी गंमत राजनारायणांच्या राय-बरेली मतदारसघात घडलेली आहे लोक-सभेच्या निवडणुकीत राजनारायणानी पंत-प्रधान श्रीमती इंदिरा गांधींचा पराभव करून

रायबरेली गाजविली खरी पण त्याच मतदारसंघात राजनारायणांनी उभे केलेले पाचही जनता उमेदवार विधानसभा निवडणुकीत चारी मुंड्या चीत झाले आहेत. पुन्हा एकदा रायबरेली गाजत आहे आणि त्याबरोबर रायबरेलीचे राजनारायणही.

झाली ही घटना गमतशीर आहे हे खरेच; पण खरी गंमत त्यापुढल्या निष्कर्षातच आहे. कारण या घटनेचा अर्थ रायबरेलीतील लोकांचा राजनारायणावरील विश्वास उडाला आहे असा होतो आणि मग ज्या तत्त्वानुसार जनता सरकारने विधानसभेच्या निवडणुका होणे भाग पाडले त्या तत्त्वानुसार राजनारायणानीही राजीनामा देऊन फेरनिवडणुकीला उभे राहाणे आवश्यक आहे या तत्त्वाच्या जोडीला निवडून दिलेल्या उमेदवाराला परत बोलाविण्याचा जनतेला हक्क आहे असेही स्वत: जयप्रकाशानी पूर्वीच म्हटले आहे. अशा रीतीने राजनारायणाच्या राजीनामा-मागणीचे एक नवीन टुमणे काही काँग्रेस खासदार आणि त्याबरोबर काही जनता कार्यकर्तेही वाजवू लागले आहेत.

आता ही मागणी म्हणजे एक नैतिक गमत आहे विधानसभा निवडणुका घेण्यात जनतापक्ष रास्त होता काय या प्रश्नावर वाद होणे शक्य आहे. तरी आता या निवडणुका झाल्याच असल्याने तूर्त हा वाद बाजूला ठेवू; पण हाच नैतिकतेचा खेळ सारखा खेळू लागलो तर राजनारायणासारखे असे किती खासदार लोकांच्या मनातून उतरले आहेत हे ठरविण्यासाठी एक कमिशन नेमावे लागेल. या सर्व ठिकाणी पुन्हा फेरनिवडणुका होतील आणि अशाच काही योगायोगाने रायबरेलीतून पुन्हा राजनारायणच निवडून आले तर? तर पुन्हा त्या पाच आमदारांनी राजीनामा देणे नैतिकदृष्ट्या आवश्यक ठरेल. हा खेळ बराच वेळ चालणे शक्य आहे. त्यातून रायबरेलीसारख्या ठिकाणी मतदारानीही सहकार्य दिल्यास हा खेळ अगदी अखंड चालविता येणे शक्य आहे.

म्हणजे पुन्हा पुन्हा निवडणुका! भाषणे! मान्यामान्या! धमालच धमाल...आणि वर पुन्हा नैतिकतेचे समाधान! मग यासाठी भारतीय राज्यव्यवस्था ही एक निवडणूक-यंत्रणाच बनली तरी बेहत्तर...कारण मुळात आम्हाला समाजकल्याणापेक्षा राजकारणातच खरा रस आहे. नीतीपेक्षा नीतीचा देखावाच प्रेक्षणीय असतो. एकमेकाचे पाय खेचण्यात जी मजा आहे त्याची सर राष्ट्राचा पाया भक्कम होण्याला थोडीच येणार? □

## जनतेने कौल दिला : पृष्ठ १० वरून

मध्ये एकही जिंकली नाही. त्या वेळी मार्क्सवादी पक्षाने एक जागा जिंकली. या वेळच्या निवडणुकीत दोन्ही कम्युनिस्ट पक्षाना एकही जागा मिळाली नाही.

राजस्थानात लोकसभा निवडणुकीत फक्त एक जागा मिळविणाऱ्या काँग्रेसने विधानसभा-निवडणुकीत ४१ जागा मिळविल्या ही अल्पशी प्रगती असली तरी पूर्वीच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर ही पीछेहाट फार जाणवते १९५२ पासूनच्या सहा निवडणुकात काँग्रेसने ८२, ११९, ८८, ८९, १४५ व ४१ अशा जागा मिळविल्या १९७२ चे यश हा तिचा उच्चांक, पण जनतापक्षाने या वेळी १५० जागा जिंकून त्या उच्चांकालाही मागे सारले. जनतांतर्गत पक्षाना १९५२ पासून १९७२ पर्यंत अनुक्रमे १, ७, ५८, ७९, २४ अशा जागा मिळाल्या होत्या. दोन कम्युनिस्ट-पक्षांपैकी उजव्या कम्युनिस्टांनी सर्वांत जास्त ५ जागा १९६२ मध्ये व त्याखालोखाल ४ जागा १९७२ मध्ये मिळविल्या होत्या. या वेळी दोन्ही कम्युनिस्ट पक्षाना फक्त एकेक जागा मिळाली आहे. मार्क्सवाद्याना यापूर्वी राजस्थानात एकही जागा मिळाली नव्हती. विधानसभेत त्यांचा पहिल्यादाच प्रवेश होत आहे.

उत्तरप्रदेशात जनताविजयाची घोडदौड चालूच राहिली, एकूण ४२५ जागापैकी ३५० जागा त्याने जिंकल्या. १९५२ पासूनचे निकाल पाहिले तर काँग्रेसचे बळ कसे वदलत गेले याची कल्पना येईल.

**उत्तरप्रदेश विधानसभा निवडणुका**
**काँग्रेसने जिंकलेल्या जागा**

| वर्ष | काँग्रेस |
|---|---|
| १९५२ | ३९० |
| १९५७ | २८६ |
| १९६२ | २४९ |
| १९६७ | १९८ |
| १९६९ | २११ |
| १९७४ | २१५ |
| १९७७ | ४६ |

या आकड्यावरून असे दिसते की, काँग्रेसचे बळ १९६७ पर्यंत सतत घसरत गेले. त्यानंतर दोन निवडणुकात ते थोडे सावरले. १९७४ मध्ये काँग्रेसने जेमतेम दोन जागाचे बहुमत मिळविले; पण १९७७ मध्ये ते ४६ पर्यंत घटले. त्यातून पक्ष पुन: लौकर वर येण्याची चिन्हे सध्या तरी दिसत नाहीत.

कम्युनिस्टाना ९ व मार्क्सवाद्याना १ जागा मिळाली. कम्युनिस्टाचे बळ ६ वरून ९ पर्यंत घटले; पण मार्क्सवाद्याचे वाढले नाही.

उत्तरप्रदेशाच्या मानाने बिहारमध्ये काँग्रेसने आपली स्थिती थोडी सावरली तेथे ३२० पैकी ५७ जागा काँग्रेसला मिळाल्या; पण पूर्वीच्या मानाने हे बळ फारच कमी आहे. पचवीस वर्षातील काँग्रेसच्या बदलत्या बळाची कल्पना पुढील आकड्यावरून येईल

**बिहार विधानसभा निवडणुका**
**काँग्रेसने जिंकलेल्या जागा**

| वर्ष | काँग्रेस |
|---|---|
| १९५२ | २४० |
| १९५७ | २१० |
| १९६२ | १८५ |
| १९६७ | १२८ |
| १९६९ | ११८ |
| १९७२ | १६७ |
| १९७७ | ५७ |

काँग्रेसचे बळ १९६९ पर्यंत सतत घसरत गेले. १९७२ च्या इंदिरालाटेत ते थोडे सावरून काँग्रेसला ८ जागाचे बहुमत मिळाले; पण १९७७ मध्ये ते ५७ पर्यंत घटले. त्यातून नजीकच्या काळात तरी काँग्रेस सावरेल असे दिसत नाही. काँग्रेसच्या पाठिंब्याने कम्युनिस्टाचे बळ वाढत वाढत १९७२ च्या निवडणुकीत ३५ पर्यंत गेले होते. या वेळी काँग्रेसच्या पराभवाची झळ त्यालाही लागली व ते २१ पर्यंत घटले.

ओरिसामधील चित्र निराळे नाही. तेथे जनतापक्षाने १४७ पैकी ११० जागा जिंकल्या व काँग्रेसला अवघ्या २६ जागा मिळाल्या. ओरिसातील काँग्रेसचा हा पराभव अनपेक्षित नव्हता. कारण १९५२ पासूनचे निकाल पाहिले तर १९६१ चा अपवाद वगळता काँग्रेसला निर्णायक बहुमत कधीच मिळाले नव्हते. पुढील आकड्यावरून हे स्पष्ट होईल.

ओरिसा विधानसभा निवडणुका
कॉंग्रेसला मिळालेल्या जागा

| वर्ष | कॉंग्रेस |
|---|---|
| १९५२ | ६७ |
| १९५५ | ५६ |
| १९६१ | ८२ |
| १९६७ | ३० |
| वर्ष | कॉंग्रेस |
| १९७१ | ५१ |
| १९७४ | ६९ |
| १९७७ | २६ |

यापैकी १९७१ पर्यंतच्या जागा १४० पैकी व १९७४ व १९७७ च्या जागा १४७ पैकी आहेत. सात निवडणुकात फक्त १९६१ मध्ये कॉंग्रेसने निर्णायक बहुमत मिळविले. या वेळच्या पराभवासारखाच मोठा पराभव १९६७ मध्ये झाला होता. त्यानंतरच्या दोन निवडणुकात पक्षाचे बळ वाढले, पण इंदिरा-लाटेच्या काळात सुद्धा निर्णायक बहुमत तो मिळवू शकला नाही त्यात गटबाजी पक्षात सुरुवातीपासूनच आहे. त्यात आणीबाणीतील हुकूमशाही पद्धतीच्या कारभाराची भर पडल्याने कॉंग्रेचा एकदा दणदणीत पराभव झाला.

जनतापक्षाच्या हाती सत्ता आली असली तरी ओरिसात त्या पक्षाचे नेतृत्व एका काळच्या कॉंग्रेसच्याच नेत्याकडे आहे पक्षाची सूत्रे बिजू पटनाईक याच्याकडे आहेत. कॉंग्रेसचे मुख्य मंत्री असताना त्याच्याविरुद्ध भ्रष्टाचाराचे व सत्तेच्या गैरवापराचे आरोप करण्यात आलेले आहेत. कॉंग्रेसमधील फुटी-नंतर इंदिरा गांधीची कॉंग्रेस किंवा संघटना-कॉंग्रेस यापैकी कोणत्याच पक्षास न मिळता उत्कल कॉंग्रेस हा स्वत:चा सवता सुभा त्यानी स्थापन केला. त्यामागे कोणतीही तात्त्विक भूमिका नव्हती, तर काही काळ वाट पाहून जिकडे फायदा तिकडे मिळू या, असा सरळ संधिसाधू हिशेब होता. १९७१ च्या निवडणुकीनतर त्यांनी काही काळ स्वतत्र पक्षाशी आघाडी केली. सयुक्त मन्त्रिमडळ अधिकारावर आले; पण काही महिन्यातच आघाडी मोडून आणि उत्कल कॉंग्रेसचे विसर्जन करून ते कॉंग्रेसला मिळाले; पण कॉंग्रेस-प्रवेशाने मनासारखे काही मिळाले नाही. तेव्हा त्यानी कॉंग्रेसबाहेर पडून पुनः उत्कल कॉंग्रेसचे पुनरुज्जीवन केले. पुढे प्रगति पक्ष, भालोद असे पक्ष त्यानी काढले व भालोदबरोबर ते जनतापक्षात आले. दुसऱ्या नेत्या नदिनी सत्पथी. आणीबाणीत त्यानी हुकूमशाहीपद्धतीनेच कारभार केला. संजय गांधीच्या कारवायामुळे त्याचे मुख्य मन्त्रिपद गेले नसते तर त्या कॉंग्रेसबाहेर पडल्या असत्या की नाही याची शका आहे. त्याना तिकिट देण्यावरून पक्षात मोठा वाद झाला. त्यांना तिकिट दिल्याच्या निषेधार्थ सर्वोदय कार्यकर्त्या श्रीमती मालती चौधरी त्याच्याविरुद्ध उभ्या राहिल्या. जयप्रकाशजीनी श्रीमती चौधरीना पाठिंबा दिला. श्रीमती सत्पथी २७ हजार मताच्या आघाडीने निवडून आल्या, पण सत्तेचे राजकारण की तत्त्वनिष्ठ राजकारण हा या वादातील मुख्य प्रश्न होता. तो लोकापुढे नीट माडलाच गेला नाही. बंडखोराना विरोध करून पक्षशिस्त पाळायला हवी हे सर्वसाधारणपणे खरे आहे; पण पक्षाचे निर्णय चुकतात, सत्तेच्या राज-कारणासाठी तत्त्वनिष्ठा बाजूला सारली जाते तेव्हा तत्त्वनिष्ठ कार्यकर्त्यांनी अन्याया-विरुद्ध ठामपणे उभे राहावयासच हवे श्रीमती चौधरीनी ते धैर्य दाखविले; पण मतदारा-पर्यंत त्याची बाजू नीट गेलीच नाही. उलट *पक्षद्रोही, बंडखोर या त्याच्याविरुद्ध झालेल्या* प्रचाराचाच मतदारावर अधिक प्रभाव पडला असे दिसते. नदिनीबाईंना निवडण्यात मतदारानी पुरेशी जागरूकता दाखविलेली नाही.

मध्यप्रदेशातही कॉंग्रेसचा पराभव झाला असला तरी इतर राज्याच्या तुलनेने सर्वांत जास्त ८४ जागा कॉंग्रेसने तेथे मिळविल्या आहेत. मुख्य मंत्री श्यामाचरण शुक्ल पराभूत झाले, पण कॉंग्रेस पुन. सावरू शकेल अशी आशा या निकालानी कॉंग्रेस-कार्यकर्त्यांना वाटेल. यापूर्वीच्या निवडणुकात मध्य-प्रदेशात कोणत्याही विरोधी पक्षाने एवढ्या जागा मिळविलेल्या नाहीत. लोकसभा-निवडणुकातील पराभवाच्या हादऱ्याच्या पार्श्वभूमीवर या निकालाचा विचार करा-यला हवा. जनतापक्षाने ३२० पैकी २३० जागा जिकल्या. यापूर्वी १९७२ च्या निवड-णुकीत कॉंग्रेसने सर्वांत जास्त २२० जागा मिळविल्या होत्या. जनतापक्षाने त्या विज-याला मागे सारले आहे दोन्ही कम्युनिस्ट पक्षाना तेथे एकही जागा मिळाली नाही. मार्क्सवाद्याना तर तेथे एकाही निवडणुकीत एकही जागा मिळालेली नाही; पण कम्यु-निस्टाना १९६२ मध्ये ५ व १९७२ मध्ये ४ जागा मिळाल्या होत्या. कॉंग्रेसचा मित्रपक्ष म्हणून जनतेने कम्युनिस्टाना दूर सारले.

पश्चिम बगालमध्ये मार्क्सवाद्यानी पुन. सत्ता मिळविली हा या वेळच्या निवडणुकाचा एक महत्त्वाचा विशेष मार्क्सवादी आघाडी-लाच नव्हे तर एकटया मार्क्सवादी पक्षाला तेथे निर्णायक बहुमत मिळाले आहे. मार्क्स-वादी आघाडीने २९४ पैकी २२९ जागा मिळविल्या. त्यात मार्क्सवादी पक्षाच्या १७८ आहेत. निर्णायक बहुमतासाठी आवश्यक असलेल्या किमान १४८ जागांपेक्षा ३० जागा मार्क्सवाद्यानी अधिक मिळविल्या आहेत. मनात आणले तर एकटयाच्या बळावर सुद्धा


## प्रकाशित झाले

**प्रियदर्शिनी** । पडित महादेवशास्त्री जोशी । बारावा डेमी १०८ । रुपये ४।–

**याच संचातील**

**पं. महादेवशास्त्री जोशी यांची इतर पुस्तके**

**राजवाहन** । बारावा डेमी १०४ । रुपये ३।–

**अग्निदिव्य** । बारावा डेमी १०४ । रुपये ३।–

**बालरत्न** । बारावा डेमी ११८ । रुपये ४।–

## विश्वकर्मा साहित्यालय

२०३५।२ सदाशिव पेठ, टिळक रोड,

पुणे ४११ ०३० ☐ दूरध्वनी ४१२०९

ते सरकार बनवू शकतील, पण ते तसे करणार नाहीत अशी आशा आहे. यापूर्वी १९६९ च्या निवडणुकीत डाव्यांच्या आघाडीने २८० पैकी २१४ जागा जिंकल्या होत्या. त्या वेळी काँग्रेसला फक्त ५५ जागाच मिळाल्या होत्या. १९७७ च्या निवडणुकात मार्क्सवादी आघाडीने १९६९ च्या यशाला मागे सारले. तसेच काँग्रेसने फक्त २० जागा जिंकून पराभवाची सर्वांत खालची पातळी गाठली जनतापक्षालाही अवघ्या २९ जागा मिळाल्या. जनतापक्षाच्या नेत्यानी स्वतःच्या सामर्थ्याबद्दल फाजील आत्मविश्वास बाळगला वस्तुस्थितीचा अदाज त्याना आला नाही गोव्याबाबत त्यांचा अदाज चुकला त्यापेक्षाही मोठ्या प्रमाणात तो पश्चिम बगालमध्ये चुकला. पक्षाने मार्क्सवादी आघाडीशी समझोता करायला हवा होता आता पक्षाला तेथे आपले बस्तान बसविणे कठीण जाणार आहे. पूर्वीच्या चुका मार्क्सवादी- नेते या वेळी सुधारतील अशी आशा आहे. नामोहरम झालेल्या डाव्या पक्षाना मार्क्सवादी आघाडीचे यशाने नवा दिलासा दिला आहे आणि मार्क्सवादी आघाडीच्या रूपाने आणखी एक पर्यायी पक्ष देशात उभा राहील अशी आशा निर्माण झाली आहे

तामिळनाडूच्या निकालांनीही जनतापक्षास हादरा दिला. तेथेही त्याचे अदाज चुकले. अण्णा द्र मु. क. ने २३४ पैकी १२९ जागा जिंकून निर्णायक बहुमत मिळविले. द्र. मु. क. ची जागा अण्णा द्र. मु. क ने घेतली हे उघड झाले. द्र. मु. क. ला ४८ जागा मिळाल्या. काँग्रेसने २७ व जनता पक्षाने अवघ्या १० जागा जिंकल्या. राष्ट्रीय पातळीवरच्या दोन पक्षाना दोन प्रादेशिक पक्षापुढे माघार खावी लागली आणि त्याचा तिसरा व चौथा क्रम लागावा ही शोचनीय घटना आहे; पण प्रादेशिक राजकारणावर नुसते प्रादेशिक म्हणून टीका केल्याने त्याचा प्रभाव कमी होणार नाही. प्रादेशिक पक्षाच्या मागण्यातील न्याय्य भाग राष्ट्रीय पातळीवरच्या पक्षानी मान्य करून त्यानुसार निर्णय घेतले पाहिजेत देशाच्या एकसधतेला बाधा येऊ न देता राज्याना स्वायत्तता कोणत्या मर्यादेपर्यंत देता येईल या प्रश्नाचा या अनुषगाने पुन विचार होणे आवश्यक आहे.

निवडणुका सपल्या. आता देशापुढील निकडीचे प्रश्न सोडविण्यावर जनतापक्षाने व सरकारने लक्ष केंद्रित केले पाहिजे. चलनवाढ व भाववाढ रोखणे हे सर्वांत महत्त्वाचे प्रश्न आहेत. ते यशस्वीपणे सोडविण्यात जनता सरकारची खरी कसोटी लागणार आहे. केंद्राप्रमाणे सात राज्यात आता जनतापक्षाची सरकारे व पजाबमध्ये अकाली जनता व मार्क्सवादी याच्या आघाडीचे सरकार आले आहे १९६७ नतर अधिकारावर आलेली विरोधी पक्षाची सरकारे थोडयाच अवधीत अतर्गत भाडणानी गडगडली त्याची पुनरावृत्ती होऊ द्यावयाची नाही, मतभेद विचारविनिमयाने व लोकशाही मार्गाने मिटवावयाचे अशी अंतर्गत लोकशाही कार्यपद्धती जनतापक्षाने निर्धाराने अंमलात आणली पाहिजे. देशापुढील आव्हाने मोठी आहेत. ती पेलण्यास जनतापक्ष कितपत समर्थ ठरतो हे त्याच्या एकजुटीवर अवलबून राहील.

मतदाराचा कल अजमावयाचे दृष्टीने जिंकलेल्या जागापेक्षा मते किती मिळाली याला अधिक महत्त्व आहे सर्व राज्याचे आकडे अजून उपलब्ध नाहीत; पण काही राज्यांच्या आकडयावरून लोकसभा निवडणुकीपेक्षा काँग्रेसला या वेळी अधिक मते मिळाल्याचे दिसते.

**काँग्रेसची शेकडा मते**

| राज्य | लोकसभा | विधानसभा |
|---|---|---|
| उत्तर प्रदेश | २५·०४ | ३२·२७ |
| ओरिसा | ३८·१८ | ३१ |
| मध्यप्रदेश | ३२·५० | ३५·८८ |

या आकडयावरून असे दिसते की मध्यप्रदेशात ३ टक्के व उत्तर प्रदेशात ७ टक्के मते काँग्रेसने अधिक मिळविली तर ओरिसात काँग्रेसच्या मतात ७ टक्के घट झाली. उत्तर प्रदेशात १९७४ च्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसला ३२·२९ म्हणजे जवळजवळ या वेळेइतकीच मते मिळाली होती. मताचे प्रमाण दोन्ही वेळा सारखेच असूनही काँग्रेसने १९७४ मध्ये २१६ जागा जिंकून बहुमत मिळविले तर या वेळी अवघ्या ४६ मिळविल्या. विरोधकाची मते विभागल्याचा फायदा काँग्रेसला १९७४ मध्ये मिळाला होता तो या वेळी मिळाला नाही.

याबाबतीत राज्यात जनतापक्षाला पुढीलप्रमाणे मतदान झाले

**जनतापक्षाची शेकडा मते**

| राज्य | लोकसभा | विधान सभा |
|---|---|---|
| उत्तर प्रदेश | ६८०३ | ४८·३५ |
| ओरिसा | ५१·७७ | ४९·५० |
| मध्य प्रदेश | ५७ ९५ | ४७ २८ |

यातील जनतापक्षाच्या मतात लोकशाहीवादी काँग्रेस पक्षाची मतेही समाविष्ट आहेत. या आकडयावरून असे दिसते की ओरिसात जनतापक्षाच्या मतात फक्त २ टक्के घट झाली असली तरी उत्तर प्रदेशात २० टक्के आणि १० टक्के प्रमाणात ही घट झालेली आहे. या तीन्ही राज्यात जनतापक्षाला ५० टक्क्यापेक्षा अधिक मते पडलेली नाहीत. अल्पसख्य मते मिळवून काँग्रेस सत्ता मिळवील अशी टीका विरोधी पक्ष पूर्वी काँग्रेसवर करी; पण या वेळी जनता पक्षाच्याबाबतीतही वरील तीन राज्यात तसेच घडले आहे आणि इतर राज्यातील चित्रही फारसे निराळे असेल असे वाटत नाही.

विधानसभा-निवडणुकीनतर राज्यांमध्ये नव्या नेत्याची निवड होऊन नवी मंत्रिमंडळेही अधिकारावर आली नेते निवडताना व मत्रिमंडळ बनविताना जनतापक्षाने काँग्रेसपेक्षा काही निराळे पायंडे पाडले का? इंदिरा गांधींच्या पद्धतीप्रमाणे नेते लादले गेले नाहीत तरीही केंद्रीय नेतृत्वाने हस्तक्षेप केल्याची तक्रार बिहारमध्ये सत्येद्र नारायण सिंहा आणि उत्तर प्रदेशात रामधन यानी केली आहे नेतानिवडीत जनतापक्षाच्या घटकापैकी जनसघ आणि भालोद यानीच आपसात सर्व जागाचे वाटप करून घेतले. हिमाचल प्रदेश, राजस्थान, मध्यप्रदेश व दिल्लीत नेतेपद जनसंघाकडे गेले तर उत्तर प्रदेश, बिहार, ओरिसा आणि हरियानात ते भालोदकडे गेले. समाजवादी, सघटना काँग्रेस आणि काँग्रेसमधून गेल्या एक दोन वर्षात फुटलेला मोहन धारिया, चद्रशेखर आदींचा गटनेता निवडीत डावलले गेले घटक पक्ष अजून एकजीव झालेले नाहीत या घटकाच्या वेगवेगळया सभा होत होत्या अशा सभा यापुढे न भरविण्याचा इशारा पक्षाच्या ससदीय मडळाने नुकताच दिला एकात्मपक्ष निर्माण झाला नाही तर जनता पक्षात काँग्रेससारखीच गटबाजी निर्माण होण्याचा धोका आहे. तो टाळण्यासाठी एकसध पक्षसघटना उभारण्यावर कार्यकर्त्यांनी लक्ष केंद्रित केले पाहिजे

मुख्य मंत्र्याने दिल्लीत जाऊन मत्र्याची यादी मंजूर करून घ्यावयाची ही काँग्रेसचीच प्रथा जनतापक्षाने चालू ठेवली वास्तविक मुख्य मत्र्याला आपले सहकारी निवडण्याच्या बाबतीत पूर्ण मोकळीक द्यावयाची. पुढे तक्रारी येतील तेव्हा तेवढया वेळेपुरताच केंद्रीय नेतृत्वाने हस्तक्षेप करावयाचा अशी प्रथा जनतापक्षाच्या केंद्रीय नेतृत्वाने पाडायला हवी होती. काँग्रेससारखी गत होऊ द्यायला नको असेल तर काँग्रेसच्या चुका प्रथमपासून टाळण्याची दक्षता जनतापक्षाने घ्यायला हवी. □

हिंदी चित्रपट । शिरीष सहस्रबुद्धे

# किनारा

## अरेरे ! गुलजारचे तारूही काठालाच बुडाले !

'रात्र वैऱ्याची आहे,' असा इशारा हिंदी चित्रपटसृष्टीला द्यायची वेळ आता आली आहे असं अगदी नकडीनं वाटलं ते गुलजारचा 'किनारा' पाहून भरपूर जाहिरात करून प्रदर्शनाआधीच गजबजलेला हा किनारा गाठण्यापेक्षा भर समुद्रात बुडून मेलेलच काय वाईट असा प्रश्न मला सध्या पडलेला आहे. हिंदी चित्रपटसृष्टीचे आत्ता-आत्तापर्यंत बुलंद वाटणारे बुरूज असे एकाएकी ढासळू लागले तर गुणवत्तेच्या दृष्टीने आधीच मुडदूस झालेला हा व्यवसाय दीर्घकाळ पागळा होण्याखेरीज मार्ग राहणार नाही असं दिसतं. राजकपूर आणि देव आनंद आपापल्या संस्था आणि स्कूल ऑफ ॲक्टिंगसह संपले तेव्हा 'चालायचंच' यापलीकडे विशेष काही वाटलं नव्हतं; पण परवा 'कर्म' पाहिला आणि वक्त, कानून, हमराज, गुमराह, इत्तेफाक असे सिनेमा काढणाऱ्या बी. आर्. चोपडा फॅक्टरीचं दिवाळं निघणार असल्याची खूण पटली. रजनीगंधामध्ये स्वतः उंचावलेल्या अपेक्षा बासू चतर्जींनी चितचोरपर्यंत पुरेशा उतरवून ठेवल्या आहेतच. 'आनंद'नंतर त्या तोडीचा एकही चित्रपट हृषिकेश मुकर्जी देऊ शकलेले नाहीत हे कडू सत्य आहे. राहता राहिलेल्या गुलजारमध्ये खुशबूपर्यंत थोडी तरी धुगधुगी शिल्लक राहिल्यासारखी वाटत होती. किनारा पाहिल्यानंतर मात्र त्यानंही आपली काव्यप्रतिभा जुन्या बाजारात मोडीत काढल्याची दुःखद जाणीव झाली. जुना बाजारच म्हटला पाहिजे. कारण बाजारी हिंदी सिनेमात ज्या ज्या म्हणून जुनाट चिजा दिसतात त्यातल्या बऱ्याच गुलजारनं किनाऱ्यात गोळा केल्या आहेत. एक हॅपी बर्थडे टू यू पार्टी आणि भलामोठा पियानो वाजवण्याचं सोंग करताना त्याच्या त्रिकोणी पट्ट्यातून नायिकेकडे पहात नायकानं रचलेले सिम्बॉलिक विरहगीत एवढ्या दोन चिजा जमा केल्या असत्या तर किनाराला इतर कुठल्याही धंदेवाईक हिंदी सिनेमाप्रमाणे पुराणवस्तुसंग्रहालयाचा दर्जा देता आला असता. अर्थात गुलजार पुढील चित्रपटात अशा किरकोळ चुका दुरुस्त करीलच अशी आशा-अपेक्षा आहे.

किनाराबद्दल अधिक काही लिहिण्याआधी एक गोष्ट स्पष्ट केली पाहिजे. सर्वसाधारण हिंदी चित्रपटाच्या तुलनेने 'किनारा' काही वाईट नाही चालू फॉर्म्युला सिनेमाशी तुलना करणारा प्रेक्षक किनारा सुखासमाधानानं पाहून गुलजारला दुवा देत बाहेर पडू शकेलही; पण 'गुलजार'चा सिनेमा म्हणून मात्र किनारा तिसऱ्या दर्जाचाही नाही. किनाऱ्यावर मी टीका करतो ती तो गुलजारचा आहे म्हणूनच. अर्थातच गुलजारच्या सिनेमाला देव आनंद, मनमोहन देसाई किंवा कुणी जे. ओमप्रकाश नाही तर नडियादवाला याची स्टॅंडर्डस् लावायची आणि मग तो चांगला ठरवायचा असला उफराटा व्यवहार मला अजिबात मान्य नाही. ती गोष्ट गुलजारलाही काही फारशी शोभादायक आहे असं नाही. गुलजारनं गुलजारसारखेच सिनेमे काढावेत आणि ते जमणार नसेल त्या वेळी विश्रांती किंवा निवृत्ती पत्करावी. ज्यूलियस सीझर आपल्या मारेकऱ्यामध्ये ब्रूटसला पाहून 'ब्रूटस तुसुद्धा ?' असं म्हणाला होता. किनारा पाहिल्यानंतर आमच्यासारख्या गुलजारच्या चाहत्याची प्रतिक्रिया नेमकी अशीच आहे.

'किनारा'ची कथा भूषण वनमाली याची आहे आणि पटकथा, संवाद, गीते आणि दिग्दर्शन गुलजारच्या नावे आहे. तेव्हा चित्रपटाच्या यशापयशात त्याचाच वाटा सर्वांत मोठा धरला जावा हे रास्तच आहे. एक तर गुलजारने अशी सरधोपट कथा निवडावी हेच आश्चर्य आहे. आजपर्यंत फॉर्म्युला लव्ह स्टोरीज रुपेरी पडद्यावर काय कमी आल्या आहेत ? त्यात आणखी एक इतक्या पारंपरिक प्रेमकथेची भर टाकण्यात काय हशील ? आरती सन्याल ( हेमामालिनी ) ही एक प्रसिद्ध नर्तिका, तिच्या जीवनात आलेल्या दोन पुरुषाची ही कहाणी. चंदन आर्य (धर्मेंद्र) हा त्यातला कालानुक्रमे पहिला आलेला पुरुषोत्तम. चंदन आर्य (नाव तर झक्क आहे. ) हा म्हणे इतिहासाचा प्राध्यापक. इतिहासाचा प्राध्यापक असला तरी तो ( चुकून ) बहुधा एखाद्या माजी संस्थानिकाच्या घरात रहात असावा असे वाटते. प्राध्यापकाची घरं अशी अलिशान असतात काय ? आणि तीही इतिहासाच्या ? आणि तेही त्यानी औषधापुरताही उद्योगधंदा न करता ? प्राध्यापक-संघटनानी याची दखल घ्यावी आणि गुलजारला चवीदाखल तरी आपल्या घराचे नमुने दाखवावेत अशी माझी शिफारस आहे. हा चंदन आर्य अभ्यास-शिकविणे असले उद्योग सोडून इतर सर्व धंदे करतो--गाणी गातो, आरतीच्या अंगाखांद्यावर खेळतो-तिला खेळवतो आणि एक अपघात करून मरतो. जाता जाता मांडूगडासंबंधी एक संशोधनात्मक पुस्तक लिहून जातो एवढीच काय ती त्याची आणि गुलजारची इतिहासाला श्रद्धांजली. हा चंदन एके दिवशी आरतीकडे एक गाडी विकत घेऊन येतो, खेळण्यातली गाडी आणावी तशी, तिला सरप्राइज म्हणून. गाड्या उडविण्याचा हा नवा शौक गुलजारला 'व्हिक्टोरिया 'वाल्या ब्रिजच्या सहवासानं पैदा झाला की काय कोण जाणे. त्यातून चंदन आर्य हा एक युवा बन्सीलालचा मुलगा आहे किंवा नेहरूंचा नातू आहे असं काही पुढे दाखविलं असतं तर त्याच्या गाडी-बंगल्याला हरकत घ्यायची काय टाप होती कुणाची ? पण तसंही नाही. एवढे चमत्कार कमी पडले म्हणून की काय कविभूषण गुलजार यानी आपल्या प्रतिभेचाही एक खेळ जाता जाता करून दाखविला आहे. एकदा हे चंदनसाब आरतीला एक गद्य वाक्य ऐकवतात आणि नंतर तिच्या मागणीनुसार त्याला चाल लावून गाऊन दाखवतात. गुलजारच्या सिनेमातल्या त्याच्या स्वतःच्या एखाद्या गानाची प्रेक्षकांनी दर खेळाला मनसोक्त टर उड-

बिल्याचं दुर्मिळ उदाहरण या गाण्याच्या वेळी घडतं. जुन्या सामाजिक जसबाती प्रेमकथांमध्ये दिवसभर बागेत–डोंगरात हुंदडल्यानंतर रात्री नायकानं (आपल्या) बेडरूममधून नायिकेला (तिच्या) बेडरूममध्ये फोन फिरवायचा आणि फोनवरच तिला व प्रेक्षकांना ग्लानी येईलसं एक मंदसांद्र गाणं ऐकावायचं अशी प्रथा असे, तिचा हा गुलजारियन आविष्कार दिसतो. आपल्या जुन्या कलात्मक आणि वास्तववादी हट्टांचा त्याग करून गुलजारजी हिंदी चित्रसृष्टीच्या बुडापर्यंत गाडलेल्या नवनव्या परंपरा शिकू लागले हे बरे झाले.

आरती संन्याल या नावानं एक कचकड्याची कळसूत्री बाहुली गुलजारनं 'किनारा'मध्ये उभी केली आहे किंवा नाचविली आहे म्हणा. ही, भरतनाट्यमचा फिल्मी प्रकार अस्सलाशी फार संपर्क येणार नाही अशा बेतानं नाचते. साधारणपणे उपराष्ट्रपतिनिवास म्हणून शोभेल अशा अलिशान घरात राहते. गाडी वगैरे इतर सर्व इतमाम नेहमीप्रमाणे; पण कै. चंदनगुरुजींचे पुस्तक छापून प्रसिद्ध करायला मात्र तिच्यापाशी पैसा नसतो. इथे तिनं व गुलजारनं अकारण गरिबीचा आव आणून प्रेक्षकांची व मुख्यतः जितेंद्र ऊर्फ इंदरची सहानुभूती मिळविण्याचा प्रयत्न केला आहे. पैकी इंदर सहानुभूतीच काय, वाटेल ते द्यायला दोन पायांवर (होय, जितेंद्र असूनही दोन पायांवर) उभाच असतो आणि प्रेक्षकांनी अगोदरच तिकिटाचे पैसे दिलेले असतात. शेवटी आरतीला आंधळी झाल्यानंतरही एक नाचकाम करून हे पैसे मिळवावे लागतात. पुन्हा आरतीच्या नाचाचा दर्जा, तिच्या कार्यक्रमाचं स्वरूप आणि तिला मिळणारे पैसे यांचा काही ताळमेळ बसत नाही ते वेगळंच; पण 'अचानक'च्या गुलजारला शोभेल इतक्या सुसंगत विचार–बैठकीची अपेक्षा 'किनारा'च्या गुलजारकडून करण्यात अर्थ नाही. बरं, ही आरती संन्याल कोण, कुठली, तिला या जमिनीत काही मूळ वगैरे आहे की नाही याबद्दल काही संदर्भ दिलेला नाही; पण फक्त आरतीच का, आरती, इंदर आणि चंदन ही यातली तीनही पात्रं आत्ता आकाशातनं पडली आणि आत्ता धरणीनं झेलली अशाच प्रकारची आहेत. वर्तमानकाळ आणि त्यात फक्त शारीरिक ओढ यापलीकडे कोणत्याही पातळीवर माणसाला अस्तित्वच असू शकत नाही की काय? आँधी, अचानक, अगदी मेरे अपने अशा गुलजारच्या जुन्या चित्रपटांवरून माणसाच्या या अनेक पदरी अस्तित्वाची त्याला जाणीव असावी असं दिसतं; पण मग किनारामधला हा पात्रत्रिकोण स्त्री–पुरुषसंबंधांच्या एकच एक पातळीवर का फिरतो? 'किनारा' ही मूलतः आणि मुख्यतः प्रेमकथा असल्याने प्रेमभावनेला महत्त्वाचं स्थान मिळावं हे ठीक; पण किनारामधली नायक-नायिका ही पूर्ण वेळ प्रेमकर्ते असल्याचं दिसतं त्याचं काय? त्यातल्या त्यात आरतीला (चंदनशी संबंधित असा) थोडासा तरी भूतकाळ आहे आणि नृत्यकलेची एक जादा बाजू (dimension) आहे; पण चंदन आणि इंदन ही पात्रे अगदी flat आहेत, बिलकुल इंटरेस्टिंग वाटत नाहीत. पुन्हा आरतीची नृत्यकला ही तिच्या इतर अस्तित्वापासून पूर्णपणे वेगळी पडते. तिच्याद्वारे गुलजारला सिनेमात चार नाचगाणी घुसडता आली आहेत यापलीकडे चित्रकथानकाच्या आणि आरतीच्या पात्रचित्रणाच्या व तिच्या कहाणीच्या दृष्टिकोनातून नृत्यकलेला काहीही स्थान नाही. आरतीची कहाणी ही essentially एका श्रेष्ठ नर्तिकेची कहाणी होत नाही, ती कोणत्याही श्रीमंत आणि सुंदर तरुणीची कहाणी, थोड्याफार फरकानं होऊ शकते. सारांश आरती आणि चंदनचं गुलजारच्या आवडत्या फ्लॅशबॅक तंत्रानं दाखविलेलं पूर्वायुष्य म्हणजे निव्वळ वासनेचा खेळ वाटतो. या उभयतांचे प्रेमप्रसंग बरेच नैसर्गिक, अकृत्रिम व मनःपूर्वक घेतलेले दाखवून गुलजारनं ही वासना सौम्य आणि सुखद बनविण्याचा आटोकाट प्रयत्न केला आहे; पण गुलजार ज्या पद्धतीचे ज्या nature चे प्रेम दाखवू इच्छितो त्यात वासनामय शरीरक्रियेपेक्षा पुष्कळ काही अपेक्षित आहे असं मला वाटतं. अगदी रोमँटिक प्रेमाचासुद्धा हा अशारीरभाग किनारामध्ये बिलकुल प्रस्थापित होत नाही. आरती-चंदन यांच्यातल्या नाजुक आणि हार्दिक प्रेमप्रसंगाचे बरेचसे unconventional, वेगळे वाटणारे चित्रण गुलजारने केले आहे याची दाद द्यायलाच हवी; पण त्याचबरोबर प्रेम म्हणजे फक्त दोघांनी एकमेकांना अखंड कुरवाळीत चुंबनालिंगने देत–घेत राहणेच नव्हे हे गुलजारमधल्या कवीनं त्याला ओरडून सांगितलं नाही याची खंतही करायला हवी. चंदन–आरतीमधलं प्रेम शंभर टक्के दाखवलंय तेवढंच असतं तर चंदनच्या मृत्यूनंतर आरतीपाशी फक्त त्याच्या शरीराच्या आठवणी आणि खाणाखुणा शिल्लक उरल्या असत्या. तस झालेलं नाही. तेव्हा त्यांच्या प्रेमप्रसंगांच्या चित्रणात गुलजारचाच पाय घसरला, तोल ढळला असं म्हणायला हवं.

किनारामधल्या प्रेमत्रिकोणाचं तिसरं टोक–इंदर–ही तर ठार फसलेली व्यक्तिरेखा आहे. हा गृहस्थ म्हणे एका बड्या आर्किटेक्टचा (डॉ. श्रीराम लागू) पुतण्या. हा काकाबरोबर मधनंमधनं ऑफिसात डोकावताना दिसतो एवढंच. एरवी त्याचा सगळा वेळ आरतीच्या मागे हिंडण्यात जातो.



मध्यंतरानंतर तर तो आरतीच्या घराची गुरखा (किंवा कुत्रा) काय करील इतक्या इमानानं चोवीस तास राखण करीत असतो. तीही स्वत नाचते त्यापेक्षा काकणभर अधिकच त्याला नाचविते. मध्यंतरानंतरचा सर्व वेळ तर तो चेहऱ्यावर एकच एक निष्ठावंत लाचारीचा भाव ठेवून तिचं प्रियाराधन करण्यात घालवितो. जितेंद्रानं ह्या भूमिकेच्या एकसुरी अवघडलेपणात भरच टाकली आहे. आत्मविश्वासाचा अभाव–जो परिचय किंवा खुशबूतसुद्धा जाणवला नव्हता तो–इथे त्याच्याबाबतीत प्रकर्षानं जाणवतो. चेहरा हालता ठेवण त्याला बिलकुल जमलेल नाही. एकच दुबळा भाव चेहऱ्यावर ठेवून तो अवघडलेला, stiff असा वावरतो. तो काही शोकसदृश अभिनय करतो, विशेषत. रडतो, तेव्हा इंदरऐवजी स्वत जितेंद्रचीच दया येते मनात काही एक दोषगड (guilty complex) घेऊन पापाचं प्रायश्चित्त आणि प्रेम यांच्या कात्रीत सापडलेल्या सज्जन पण मानसिकदृष्ट्या कमकुवत तरुणाची ही गुतागुतीची गंभीर भूमिका जितेंद्रच्या सामर्थ्यकक्षेबाहेरचीच होती. त्याच्या निवडीतच गुलजारकडून चूक झालेली आहे. त्यामुळेच धर्मेंद्रपेक्षा मोठी, वैविध्यपूर्ण व प्रभावी भूमिका मिळूनही परिणामाच्या दृष्टीनं तो उणा पडतो डॉ. श्रीराम लागू यांनी मोठ्या सफाईन रगविलेली इंदरच्या काकाची पोशाखी व्यक्तिरेखा ह्या किनारामधल्या व्यक्तिचित्रणाचा एकमात्र प्लसपॉइंट. डॉ. लागूच्या छाप पाडणाऱ्या व्यक्तिमत्त्वाला शोभेल अशी ही प्रभुत्वपूर्ण (dominating) व्यक्तिरेखा डॉक्टरानी आपला घन आवाज, सहजसाध्य मुद्राभिनय व आंगिक अभिनय आणि वेधक नजर ही नेहमीची आयुधं नेहमीपेक्षा जास्त तयारीनं वापरून जिवत केली आहे. त्याच्या सवादफेकीत पूर्वी क्वचित आढळणारे मराठीच्या प्रभावासारखे दोषही या वेळी जाणवत नाहीत फक्त मान उजवीकडे कलती ठेवून डोळे चष्म्यातून (किंवा चष्म्यावरून) डाव्या कोपऱ्यात वर रोखण्याची त्यांची जुनीच लकब–जी या भूमिकेसाठी 'सामना'इतकी आवश्यक नव्हती–वाजवीपेक्षा जास्त डोकावते ते खटकतं. एरवी माझ्या पाहण्यात आलेल्या हिंदी चित्रपटात त्याची ही भूमिका सर्वांत मोठी व सरसही ठरावी. 'किनारा'-मध्ये अभिनयाच्या दृष्टीनं तेवढाच एक रिलीफ आहे, बाकी सगळा आनदीआनंदच ! धर्मेंद्र–हेमा–जितेंद्र हे तीनही सितारे त्याच्या त्याच्या भूमिकासाठी बिलकुल फिट वाटत नाहीत. इथे अॅटलेटसपेक्षा अॅक्टरसंची जरुरी जास्त होती, ही गोष्ट गुलजारला समजली नसेल किंवा संजीवसारखे अभिनेते त्याला उपलब्ध नसतील या दोन्ही गोष्टी अशक्य वाटतात. जितेंद्रला पुनःपुन्हा नव्या आवेशाने वापरण्याची त्याची urge तर मला कधीच समजलेली नाही. गुलजारच्या सिनेमात जितेंद्र बरी sober काम करतो हे खर; पण शेवटी त्याच्या कामगिरीला काही नैसर्गिक मर्यादा पडतातच. मूळचेच वेणे जास्त घेऊन आलेला एखादा अस्सल अभिनेता त्या भूमिका सस्मरणीय करू शकला नसता काय ? पुन्हा जितेंद्रला शोभतीलसे सिनेमे काढणाऱ्याचा तोटा नाही आणि पददलिताचा असा उद्धार करण्याचा काही विडा वगैरे गुलजारने उचललेला नाही ना ? धर्मेंद्र–हेमा–जितेंद्रसारखी मंडळी निवडण्याच एक कारण अस सागितलं जात की, ती दिग्दर्शकाच्या प्रांतात ढवळाढवळ करीत नाहीत; पण ही भीती गुलजारच्या श्रेणीतल्या दिग्दर्शकाला कुणासबधीच वाटायच कारण दिसत नाही.

### अनेकपदरी अपयश

तेव्हा दिग्दर्शक या नात्यानं गुलजारचं अपयश अनेक पदरी आहे या चित्रपटाला गडगज श्रीमंतीचं जे अनावश्यक अस्तर त्यान जोडलं त्याच समर्थन काय करता येईल ? गुलजारनं गरिबाच्या कथाव्यथाच सिनेमातन उगाळाव्यात अशी सक्ती मुळीच नाही; पण त्याच्या सिनेमात एरवी त्याचं वास्तवतेच, विश्वसनीय राहण्याच जे भान सुटत नाही, ते इथ सुटल्यासारख वाटत चागली प्रेमकथा निर्माण करण्यासाठी नायक-नायिका हे फुलटाइम लव्हर्स असण्याइतके निरुद्योगी सधन असलेच पाहिजेत अस नाही हे गुलजारला कळत नसेल असं थोडच आहे ? पुन्हा त्याच्या श्रीमतीचा मूळ कथेशी अगदी आवश्यक असा दुवा नाही. इदर आणि त्याचा काका याचा बिलियर्डस्चा खेळ हा एक असा प्रकार. हा इतक्या वेळा दाखवलाय् की शेवटी मी त्यातन काही प्रतीकात्मक अर्थ निघतो की काय हे शोधायला लागलो होतो. इंदरची श्रीमती त्यातनं दाखवायची असेल तर ती त्याच्या गाडी–बंगल्या-


माळशिरस व इंदापूर तालुक्यांतील सभासदांच्या सक्रीय सहकार्याने कार्यान्वित झालेला

## यशवंत सहकारी साखर कारखाना लि., अकलूज

तालुका : माळशिरस — जिल्हा : सोलापूर
तार : 'यशवंत' — फोन : अकलूज ४८ व २४८

**शुभ्र दाणेदार साखरेच्या घाऊक खरेदीसाठी संपर्क साधा.**

मा. सहकारमहर्षि, श्री. शंकरराव नारायणराव मोहिते–पाटील यांच्या प्रभावी नेतृत्वाने व एकजुटीच्या कारभाराने अल्पावधीत नेत्रदीपक प्रगती करून सन १९७६–७७ चे गळित हंगामात ३,१३,४२९ पोती साखरउत्पादन केले आहे.

**डी. जी. माने बी. ए.** कार्यकारी सचालक — **वि. शं. मोहिते–पाटील** संचालक — **रा. कों. धारमाळकर** व्हा. चेअरमन

**मा. ग. दोशी**
चेअरमन

**यशवंत सहकारी साखर कारखाना लि., अकलूज**


वरूनही कळते.

आपल्याजवळ काय योग्यतेचे अभिनेते आहेत याचा विचार न करता दणादण क्लोजप्स् टाकलेत. धर्मेंद्र आणि जितेंद्र हे गृहस्थ एरवी अनुक्रमे बॉडी–ब्यूटिफुल आणि मसलकंट्रोलमध्ये नाणावलेले असले तरी त्यांचा चेहऱ्यावरच्या स्नायूंवर फारसा ताबा नाही हे काही गुपित नाही. त्यांच्या क्लोजप्स-मधून मानसिक त्रासाखेरीज काहीही निष्पन्न होत नाही. हेमाला मध्यंतरानंतरचा आंधळे-पणाचा अभिनय अजिबात जमलेला नाहीच, वर गुलजारनंही तिचं आंधळेपण फारसं मनावर घेतलेलं नाही. शिवाय तिचं वाढतं आकारमान त्यामुळे तिचेही क्लोजप्स्, विशेषत: ती नाचत नसेल तेव्हा, सुखद ठरत नाहीत. मध्यंतरापाशीच आरती संन्याल आंधळी झाल्याचं कळत असूनही मध्यंतरा-नंतरची पहिली बारा-पंधरा मिनिटं ती आंधळी होण्याच्या समारंभात खर्च घातलेली आहेत. ते नेहमीचंच डोळ्यांवरची बॅंडेजेस् सोडणं वगैरे गंमत म्हणजे ती fetinal haemorrhage नं आंधळी होते असं सांगि-तलं जातं, तर डोळ्यांवर बॅंडेजेस् कशा-साठी ? काही बाह्य दुखापत तर झालेली दिसत नाही. ते एक सोडा, मध्यंतरानंतरची उरलेली सगळी वेळ जितेंद्रच्या आरतीसेवे-साठी खर्ची घातलेली आहे; तिथे तर गुल-जारचं अस्तित्वच जाणवत नाही. इंदरचा काका रोजच्या रोज गाण्याची शिकवणी घेतो, तिथे शिकलेलं गाणं तो रोज आरतीकडे जाऊन गातो आणि त्यावर म्हणे ही ख्यातनाम भरतनाट्यम नर्तिका आंधळेपणात नाचाची तालीम करते. नृत्यगायनकलांची एवढी सवंग हेटाळणी पुरेशी झालेली नाही म्हणूनच की काय आरतीच्या फिल्मी स्टाइ-लच्या अर्धशास्त्रीय नृत्यात आणखी काही गमतीजमतीही केलेल्या आहेत. ती नाचत असताना इंदरनं परात फेकण्याचा प्रकार आठवावा. याचा अर्थ कुणी तज्ज्ञ समजावून सांगेल काय ? निने परातीत नाचावं अशी काही गेम नसावी. कारण गुलजारचा सिनेमा हा डोंबाऱ्याचा खेळ आणि व्ही. शांतारामचा सिनेमा यापेक्षा वेगळा असतो अशी खात्री वाटत आलेली आहे. नाचताना ती थांबते काय, मग इंदरदेव गाऊन तिला पुन्हा नाचती काय करतात, सगळाच अतिनाटकी मामला !

भडक. गुलजारनं या संपूर्ण सिनेमाभर रंगही असेच मद्रासी सिनेमाशी स्पर्धा करण्याइतके भडक वापरलेत. त्याच्या खुशबूसारख्या चित्रपटातलं छायाचित्रण रंगांचा वापर डोळ्याला थंडावा देणारे असतात. किनारा-मधले रंग, विशेषत: या धनिकबाळांची घर-सजावट अंगावर धावून आल्यासारखी वाटते. चित्रपटाचा शेवट तर केविलवाणा व हास्या-स्पदसुद्धा आहे. पारंपारिक हिंदी सिनेमातल्या खलनायकाचं जसं चित्राअखेरीस क्षणार्धात हृदयपरिवर्तन होतं तसंच किनारामधल्या हेमामालिनीबद्दल घडलं आहे. तो सगळा प्रसंगही गुलजारनं आपली हळुवार काव्य-वृत्ती विसरून अत्यंत बटबटीत, ढोबळ आणि कुरूप रंगविला आहे. त्यामुळं हे परिवर्तन ना धड तर्कनिष्ठ वाटत, ना भावुक. यापैकी निदान एक धागा शेवटचा काही काळ develop करीत नेला असता तरी हे परि-वर्तन असं अनपेक्षित, अशक्य, कृत्रिम, नाटकी वाटलं नसतं. हाच बटबटीतपणा गुल-जारनं सिनेमातल्या माफक विनोदातही राबविला आहे. केश्तो मुकर्जीनं यात केलेलं काम– जे न पिताही झिंगल्यासारखं वाटतं– हा याचा उत्तम नमुना. गुलजारनं त्याला तृतीयपंथी प्राण्यासारखं हिडीस अंगविक्षेप करायला लावलं आहे. विनोदाचा हा प्रकार गुलजारनं वापरावा ? इतर हिंदी सिनेमात जसं कथानकाला विनोदी पात्राचं उपरं ठिगळ चिकटवितात तसाच प्रकार गुल-जारनंही केला आहे आणि तब्बल सोळा रिळांचा एक लांबलचक रटाळ सिनेमा काढून ठेवला आहे.

लेखक म्हणून गुलजारचं अपयश तर दिग्दर्शनातल्या अपयशापेक्षा विदारक आहे. कारण गुलजारला आम्ही मूलत: एक प्रतिभा-वंत लेखक–कवी म्हणूनच ओळखतो. चमक-दार, अकृत्रिम आणि लोभस संवाद हे गुलजारच्या मेरे अपने, आंधीचं वैशिष्ट्य 'किनारा'त कुठेच दिसत नाही. दिसतो तो तोचतोचपणा. इंदरच्या काकानं इंदरच्या अपघाताबद्दल बोलताना अमजादखानच्या अपघाताचा उल्लेख करणं ही अशीच एक वापरून जुनी झालेली कल्पती. इंदर आणि प्रकाश हे एकच आहेत हे आरतीला समजतं ते इंदर चंदनचं प्रकाशित पुस्तक तिच्याकडे घेऊन येतो तेव्हा. तो प्रसंग गुलजारच्या लेखणीनं जुन्या जमान्याची याद यावी असा लिहिला आहे. त्या संवादाखेरीज दाद द्यावी असं फारसं काही आढळलं नाही. गुलजारनं यातली गीतंही पूर्वीच्या ताकदीनं लिहिलेली नाहीत. 'कोई नहीं है रे कहीं' ही ओळ व 'किनारा मिलेगा यहीं' ही ओळ यांचा परस्पर संबंध काय ? आणि त्या दोहोंचा कथाप्रवाहाशी दुवा काय ? मुळात 'किनारा' या शीर्षकाचाच चित्रपटाशी ओढूनताणून बादरायणसंबंध लावलाय. धर्मेन्द्रनं म्हटलेलं गद्य गाणं तर बोअर आहे. 'हमने देखी है उन आँखों की महकती खुशबू,' 'जीवनसे लंबे है बंधु' आणि 'इस मोडसे जाते है' सारख्या अस्सल कविता लिहिणारा गुलजार पुन्हा कधी दिसणार आहे की नाही ?

असो. गुलजारचा सिनेमा म्हणूनच किनाराची एवढी दखल घेतली. किनारामध्ये एकही प्लसपॉइंट नाहीच, असं मी म्हणू शकणार नाही. अमर अकबर अॅन्थनी आणि कर्मसारखे डोकेफोड सिनेमे पाहिल्यानंतर ही जाणीव प्रकर्षानं झाली. आर. डी. बर्मनच्या कर्णसुखद संगीताचा उल्लेख एक प्लसपॉइंट म्हणून करता येईल. अर्थात असे प्लसपॉइंटस् मला सविस्तर देता आले नाहीत. तसेच सगळे मायनस पॉइंटस्ही दाखवता आलेले नाहीत हेही खरं आहे. अर्थात सर्व टीका मी लेखाच्या सुरुवा-तीस म्हटल्याप्रमाणे गुलजारच्या पार्श्व-कर्तृत्वाच्या मोजमापानं केली आहे आणि ते अपरिहार्य आहे. गुलजार पूर्ण संपला असेल असं मला म्हणायचं नाही, किंबहुना तो नसेल अशीच आशा मी करतो आहे. अखेर गुलजारही माणूस आहे आणि त्यानं वाईट सिनेमा काढूच नये अशी सक्ती कशी करता येईल ? पण खेद चुकांपेक्षा अप्रामा-णिकपणाचा जास्त वाटतो. एनी वे, माणूस चुकतो, तसाच सुधारूही शकतो हे गुलजारच्या लक्षात आलं म्हणजे खूप आहे, आशादायक आहे.



# साप्ताहिक भविष्य

## कृष्ण माईणकर

२१७१७७ ते ८१७१७७

### महाराष्ट्रात राजकीय वादळाचा वेग वाढेल

महाराष्ट्राची राजधानी मुंबई धनु राशीच्या वर्चस्वाखाली असून महाराष्ट्र-देखील याच राशीखाली आहे या धनु राशीला दशमस्थानी राहू आला तेव्हाच महाराष्ट्राच्या राजकीय स्थित्यंतराला कुठे तरी धक्के बसू लागणार हे स्पष्ट होते काँग्रेसमध्ये निर्माण झालेला बडखोर गट हे त्याचेच प्रत्यंतर होते. आता या बडखोर गटाची हालचाल सुरू झाली आहे व त्याची ३ जुलैला बैठक होणार आहे वसंतदादा पाटील याचे व त्याचे फारसे एकमत होणार नाही व हा गट बाहेर पडेल. मात्र त्यामुळे महाराष्ट्रात उलथापालथ होईल असे मुळीच नाही. कारण दि. ८ जुलैला मगळ सातवा होत आहे. तो विरोधकानाही धडा शिकवण्याचा प्रयत्न करील मुख्य मत्री वसंतरावदादा पाटील याच्या स्थानाला धक्का बसण्याची शक्यता नाही. मात्र राजकीय वादळाचा वेग वाढणार आहे व त्याचे वारे दिल्लीपर्यंत पोचून ते श्री. यशवतराव चव्हाण यानाही झोंबणार आहेत. ◻

**मेष :** आव्हाने मिळतील

या वेळी तुम्हाला चद्र दहावा-अकरावा आहे तो तात्पुरत्या स्वरूपाच्या कामाला यश प्राप्त करून देईल. मगळाचे सामर्थ्य या आठवड्यापुरतेच तुम्हाला मिळणार आहे. त्यामुळे सर्व महत्त्वाची कामे या वेळी पुरी करा. नतर नवी आव्हाने समोर उभी राहणार आहेत व त्याला तोड द्यावे लागणार आहे बुधाची कृपा आहे व्यापारात हात घुऊन घ्या एखादे नवे दुकान घालावयाला अनुकूलता आहे पैसा कमी पडणार नाही. सुखस्थानी शनी आहे तो नवे नवे मार्ग दाखवणार आहे, पण धाडस करताना जपून करा नोकरीत ठीक आशाअपेक्षा पुऱ्या होऊ शकतील बेकाराना दिलासा शुभ दि ४-७

**महिलाना** कौटुबिक जीवनात काही अपेक्षेप्रमाणे घडेल

**विद्यार्थ्यांना** परिश्रमाचे चीज होईल

**वृषभ :** नवे पर्व

बाराव्या मगळाने तुम्हाला फार छळले होते, पण तो आता थोडे दिवसच बारावा आहे. त्यामुळे तुम्ही कोणतेही काम विश्वासाने हाती घ्यायला हरकत नाही आठवड्याच्या शेवटी बुध तिसरा होत आहे तो तुम्हाला नव्या योजना प्रत्यक्षात आणायला सहकार्य देणार आहे व्यापारी, कारखानदार, सरकारी क्षेत्रातील उच्चपदस्थ याची मदत होईल राजकारणात नव्या कल्पना प्रत्यक्षात येतील. व्यवसायात नवे पर्व सुरू होईल अनेकाचे सहकार्य मिळेल. प्रवासाचा बेत तडीस जाईल अनेक दिवस रेगाळत पडलेली महत्त्वाची कामे पार पडतील नोकरीची परिस्थिती समाधानकारक राहील अडचणी कमी होतील. पैशाच्या अडचणी दूर होतील शुभ दिनाक ३-५.

**महिलांना :** नोकरीत अपेक्षा सफल होतील.

**विद्यार्थ्यांना .** शालेय अडचणीवर मात होईल.

**मिथुन :** प्रवास टाळा

या आठवड्याअखेरील मगळ अकरावा आहे तुम्हाला काही तरी देईल. विशेषत आर्थिक बाजू बरीच भक्कम करील. रेस-लॉटरी यापासून लाभ होईल. व्यापारात अभिवृद्धी होईल. कायद्याच्या क्षेत्रात राहून तुम्हाला हवे ते मिळविता येईल इतर अनेक व्यवसाय योग्य ते रूप घेतील. इजिनियर व वकील याची चलती राहील लेखकाच्या लेखनाला चागली मागणी येईल पडून राहिलेली हस्तलिखिते प्रसिद्ध होतील. नोकरीची काळजी नको. वरिष्ठाची मर्जी राहील अडचणी कमी होतील. प्रवासाला मात्र शक्यतो फाटा देणे उचित होईल. मित्र व सहकारी चागले वागतील मगलकार्यात भाग घ्यावा लागेल. शुभ दिनांक ३-६.

**महिलाना** नोकरीत मोठेपणा मिळेल.

**विद्यार्थ्यांना :** बुद्धीचा प्रभाव वाढेल.

**कर्क :** प्रतिष्ठा वाढेल

शनि पहिला व त्यालाच भेटावयाला बुध दि ७ रोजी येणार आहे. बुध हा पैसा व बढीचा कारकग्रह असल्यामुळे तुमची सार्वजनिक जीवनात फार मोठी प्रतिष्ठा वाढणार आहे. विशेषत साहित्य-शास्त्र-राजकारण या क्षेत्रात उत्तम प्रगती होईल यातून चागले वैचारिक लेखन होईल. कलावत लोकाना सहकार व जनता याची मदत मिळेल लोकप्रियता वाट्यास येईल उपेक्षा सपेल नोकरीची परिस्थिती सुधारेल. मालक व नोकर यातील दुरावा दूर होऊन वरिष्ठाची मर्जी राहील एखादी तरी जबाबदारी सोपवण्यात येईल बेकाराना नोकरी मिळेल इजिनियर व वकील याचा उद्योग एकदम तरारेल शुभ-४, ६.

**महिलाना :** मन प्रसन्न राहील. ससारात शुभवार्ता

**विद्यार्थ्यांना** साशक मनाला स्वास्थ्य मिळेल.

**सिंह :** अडचणीची चाहूल

या आठवड्यापुरते रवि व बुध अकरावे आहेत त्याचा फायदा घ्यावा वेळ निघून गेली की फायदा तर सोडाच पण अडचणी उभ्या राहणार राजकारणात परदेशी मुत्सद्देगिरीने पावले टाकलीत तर तुमचे कौतुक होईल मोठेपणा मिळेल. परिश्रम केलेल्याचे सार्थक होईल पैशासाठी अडचण येणार नाही धद्यासाठी भाडवल हवे असेल तर त्याची जमवाजमव आजच करा. नोकरीत सारे काही मनासारखे घडेल या भ्रमात राहू नका वरिष्ठाची चचल वृत्ती तुम्हास त्रासदायक ठरू शकेल. म्हणून त्याच्या तत्राने वागा बेकाराना काम मिळेल. पैशासाठी त्रास नाही. रेस व लॉटरीमध्ये लाभ होईल. साडेसाती असली तरी त्यामुळे नुकसान येणार नाही शुभ-५, ८.

**महिलाना ।** नोकरीत जादा काम करावे लागेल.

**विद्यार्थ्यांना :** अभ्यासाच्या व्यवस्थेतील अडचणी दूर होतील.

**कन्या :** आर्थिक परिस्थितीवर मात

सध्या तुम्हाला अनेक ग्रह अनुकूल आहेत. आठवडयाच्या शेवटी मगळ भाग्यस्थानी येणार आहे व बुध अकरावा होणार आहे. त्यामुळे या दोन्ही ग्रहाचे तुम्हाला चागले सहकार्य मिळणार आहे व्यापारात लाभ होईल. सन्मार्गाने वागलात तर काही तरी मनासारखे पदरात पडेल. रेसमध्ये फायदा होईल. पण तुम्ही तो उद्योग कराल्च असे नाही वकिली व्यवसाय यशस्वी होईल सर्व प्रकारची सकटे दूर होतील घरगुती अडचणीवर मात करण्यात यश येईल नोकरी समाधानकारक राहील वरिष्ठाकडून चागले सहकार्य मिळेल. बेकाराना अडचणी नाहीत प्रवासाचे जमेल पत्रव्यवहार यशस्वी होईल दुय्यम धद्याला गती येईल. शुभ दि -३, ४.

**महिलांना** . कौटुबिक अडचणी कमी होतील.

**विद्यार्थ्यांना :** मन प्रसन्न राहील.

**तूळ :** पैशाची काळजी नको

सध्या राहू-मगळाचा षडाष्टक योग सप्तम व व्ययस्थानातून होत आहे त्याची थोडीफार झळ तुम्हाला बसली आहेच या आठवडयाच्या शेवटी मगळ आठवा येत आहे तो आर्थिक समृद्धी देणार आहे देशी-परदेशी प्रवास अचानक घडू शकेल. कोणत्याही सरकारी कारणासाठीदेखील हा प्रवास असेल जमिनविक्री व घरविक्री यापासून लाभ होईल मात्र घराची अगर शेतीची प्रगतीदेखील होईल. वारसासबधीची कामे व्यवस्थित पार पडतील नोकरीत तुम्ही काळजी करू नका सावधगिरीने व नम्रतेने वागलात तर वरिष्ठाच्या मर्जीचा लाभ होईल. बेकाराना नजीकच्या काळातच नोकरी मिळेल आरोग्याची थोडीफार काळजी घेणे आवश्यक आहे. एरवी सारे ठीक आहे शुभ दि -६, ७

**महिलांना** भाडणात पडू नका. अपेक्षित घटना घडेल

**विद्यार्थ्यांना** या वेळी अभ्यासात काळजी घ्या.

**वृश्चिक :** मंगळाचे वरदान

तुमच्या राशीचा स्वामी मगळ सहावा आहे व तो दि ८ रोजी सातवा होणार आहे. हा मगळ तुमचा दोस्त आहे तो तुमचे सारे मनोरथ पूर्ण करणार आहे. धदा व नोकरीत अनेक प्रकारे सहाय्य करून लाभ दृष्टिपथात आणणार आहे तुमचे वर्चस्व वाढवणार आहे विरोधकाना तुमच्याकडे वाकडा डोळा करून पाहण्याची हिंमत होणार नाही हाती घ्याल ते सफल होईल. बेकारीची आता काळजी करू नका नोकरी मिळेल आश्वासन पुरे होईल चाल नोकरीत तुमच्या मनासारखा कामात वदल होईल. वरिष्ठाच्या मर्जीचा प्रत्यय येईल. प्रभाव वाढेल. अनेक क्षेत्रात तुमचे कर्तृत्व झळाळून निघेल. आरोग्याची काळजी करू नका शुभ दिनाक ६-७

**महिलांना** नोकरीत एकंदर परिस्थिती सुखाची आहे

**विद्यार्थ्यांना :** भाडणापासून अलिप्त राहावे

**धनु :** विरोधक नरमतील

गुरूचे वर्चस्व असलेली तुमची रास खरे म्हणजे शात स्वभावाची असते कुणाच्या भाडणात नाही वा कुणाच्या भानगडीत नाही तरी पण अधूनमधून दुष्ट माणसे डोके वर काढनात मात्र या वेळी दि ८ रोजी मगळ दहावा होत आहे ही एक अनुकूल अशी घटना आहे. विरोधकाना नरम करणे हे त्या मगळाचे काम राहील आता कुणी काय बोलले व बोलतो याची काळजी करू नका धदा-व्यवसाय कसा सुधारेल यात जास्त लक्ष घाला काही नव्या योजनाची आखणी करा पैशाची टचाई भासणार नाही तात्पुरता का होईना पैसा मिळेल विशेषतः कर्ज काढावे लागणार नाही. आरोग्याची चिंता नको शुभ दिनाक ५-६.

**महिलांना** धद्यात मोठे यश पदरात पडणार आहे

**विद्यार्थ्यांना** अभ्यासात मन रमेल.

**मकर :** नोकरीत समाधान

लवकरच चौथा मगळ पाचवा होणार आहे हा मगळ तुमचा जानी दोस्त असल्यामुळे नोकरीच्या दृष्टीने मोठेच स्थित्यतर घडणार आहे सध्याची तुमची जी परिस्थिती आहे त्यापेक्षा थोडी निराळी परिस्थिती प्राप्त होणार आहे तरी पण अजून सारी परिस्थिती ठाकठीक झाली आहे असे समजू नका कारण शनी व राहू हे तेवढेसे अनुकूल नाहीत आर्थिक बाजू सुधारेल. अचानक प्रवास घडू शकेल. तुमचा कामाच्या निमित्ताने प्रवास होईल बेकारीची परिस्थिती शिल्लक राहणार नाही व्यवसाय सुरू करायला एकूण अनुकूलता आहे. शुभ दिनाक ६-८.

**महिलांना** मन व आरोग्य सुधारेल

**विद्यार्थ्यांना :** यशाकडे वाटचाल होईल

**कुंभ :** खर्च वाढेल

बारावा केतू ही एक मोठी प्रतिकूल परिस्थिती तुमच्या बाबतीत आहे. त्याने तुम्ही घाबरून जावे असे खरे म्हणजे काही नाही; पण अचानक खर्च हीच एक मोठी परिस्थिती निर्माण होते त्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही नोकरीत सारे काही ठीक चालले आहे व वरिष्ठाची कृपा आहे असे समजून बेसावधपणे वागू नका कारण तुम्हाला गुप्त शत्रू निर्माण झाले आहेत याची जाणीव ठेवा समोर गोड बोलणारी माणसे आतून तुमच्याविरुद्ध कारवाया करावयाला कमी करणार नाहीत एरवी नोकरीत त्रास नाही बढती होईल व्यवसाय सुधारेल. व्यापारात चार पैसे मिळतील प्रतिष्ठा उचावेल. लोकप्रियता मिळेल शुभ दिनाक-४-७

**महिलांना** ' अपेक्षित घटना घडतील. सुख मिळेल

**विद्यार्थ्यांना** शिष्यवृत्ती वा मदत मिळेल.

**मीन :** महत्त्व वाढेल

दुसरा असलेला मगळ या आठवडयाच्या शेवटी तिसरा होणार आहे हा तिसरा मगळ तुमचे कर्तृत्व सर्वमान्यता देणार आहे अगात असलेल्या गुणाना वाव मिळून विरुद्ध क्षेत्रात तुमचे नाव गाजणार आहे नोकरी असो की स्वतत्र धदा असो नव्या कल्पनाना वाव मिळणार असून त्या प्रत्यक्षात आणण्यासाठी सहकार्य मिळणार आहे वरिष्ठाची मर्जी राहील गैरसमज असल्यास दूर होतील. आर्थिक बाजू तशी व्यवस्थित आहे, पण अचानक खर्च मात्र निर्माण होईल आरोग्याची परिस्थिती समाधानकारक राहील. महत्त्वाच्या कामानिमित्त नजीकचा प्रवास होईल सार्वजनिक क्षेत्रात प्रतिष्ठा उचावेल. वैवाहिक जीवनात आनद निर्माण होईल. शुभ दिनाक-७-८.

**महिलांना :** माहेरची मदत मिळून मन सुखावेल

**विद्यार्थ्यांना** . आत्मविश्वास वाढेल. □